

# वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९

महाराष्ट्र वन विभाग
महाराष्ट्र शासन

# समर्पण

*वन आणि वन्यजीव संरक्षणाच्या सेवेत कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वन कर्मचाऱ्यांच्या स्मृतीस सादर समर्पित*

# संदेश



## श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

समृद्ध वनसंपदा, वैविध्यपूर्ण जैवविविधता आणि निसर्गाशी अभिन्न नाते जोडणारा पर्यावरणीय वारसा ही महाराष्ट्र राज्याची अमूल्य संपत्ती आहे. पर्यावरणीय संतुलन राखणे, जलसुरक्षा सुनिश्चित करणे, हवामान बदलाच्या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाणे आणि शाश्वत विकासाची दिशा दृढ करणे यासाठी वनसंपदेचे संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे.

याच व्यापक दृष्टीकोनातून तयार करण्यात आलेला **"वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९"** हा आराखडा हरित, समृद्ध आणि शाश्वत महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरणारे दूरदर्शी नियोजन आहे. वनसंवर्धन, वन्यजीव संरक्षण, कांदळवन संवर्धन, परिसंस्था पुनरुज्जीवन, तंत्रज्ञानाधिष्ठित वन व्यवस्थापन आणि लोकसहभाग यांचा समन्वित विचार या आराखड्यात करण्यात आला असून, राज्याच्या पर्यावरणीय सुरक्षिततेस नवसंजीवनी देण्याची क्षमता या उपक्रमात आहे.

वन्यजीव संवर्धनाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने देशात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. राज्यातील व्याघ्र प्रकल्प, वन्यजीवांची वाढती संख्या, वैज्ञानिक व्यवस्थापन, अधिवास व्यवस्थापन आणि लोकसहभागावर आधारित उपक्रमांमुळे महाराष्ट्र आज देशातील अग्रगण्य व्याघ्रसंवर्धन राज्यांपैकी एक म्हणून गौरवला जातो. हरित महाराष्ट्र -२०४७ हे ध्येय त्यामुळेच राज्य शासनाने विकसित महाराष्ट्र-२०४७ या उपक्रमाचा अविभाज्य घटक म्हणून स्वीकारले आहे

कृत्रिम बुद्धिमत्ता, भू-अवकाश तंत्रज्ञान, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया यांचा प्रभावी वापर करून वन प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक, उत्तरदायी आणि नागरिकाभिमुख करण्याचा राज्य शासनाचा दृढ संकल्प आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांचा समन्वय साधत वन व्यवस्थापनाच्या नव्या संधींचा लाभ घेण्यावर भर दिला जाईल.

मला विश्वास आहे की शासन, वन विभाग, स्थानिक समुदाय, स्वयंसेवी संस्था, वन संशोधन केंद्र यांच्या एकत्रित प्रयत्नांतून "वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९" ची प्रभावी अंमलबजावणी होईल. या माध्यमातून वनसंवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि शाश्वत हरित विकासाच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण करेल.

**(देवेंद्र फडणवीस)**

# संदेश



**श्री. एकनाथ शिंदे**
मा.उपमुख्यमंत्री

वन हे केवळ नैसर्गिक संसाधन नसून आपल्या जनजीवनाचे, सांस्कृतिक परंपरेचे आणि शाश्वत विकासाचे भक्कम अधिष्ठान आहे. महाराष्ट्रातील वने, वन्यजीव आणि समृद्ध जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असून भावी पिढ्यांसाठी निसर्गसंपदा सुरक्षित ठेवणे ही काळाची गरज आहे.

**"वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९"** हा दूरदर्शी आराखडा वनसंवर्धन, मानव–वन्यजीव संघर्ष निवारण, निसर्ग पर्यटन, लोकाभिमुख वन व्यवस्थापन आणि ग्रामीण रोजगारनिर्मिती या महत्त्वपूर्ण घटकांचा समन्वित विचार करणारा आहे. स्थानिक समुदायांचा सक्रिय सहभाग वाढवून पर्यावरण संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची क्षमता या आराखड्यात आहे.

महाराष्ट्रातील विस्तीर्ण कांदळवन क्षेत्रे हे राज्याच्या पर्यावरणीय सुरक्षिततेचे नैसर्गिक कवच आहे. किनारी परिसंस्थांचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन, कार्बन संचयन आणि हवामान बदलाच्या दुष्परिणामांपासून संरक्षण करण्यामध्ये कांदळवन क्षेत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. राज्यातील कांदळवन क्षेत्रांचे संरक्षण, पुनर्स्थापना आणि शाश्वत व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकसहभाग यांचा प्रभावी संगम साधण्याचा शासनाचा दृढ संकल्प आहे. कांदळवन संवर्धनाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने देशासमोर एक आदर्श निर्माण केला असून भविष्यातही ही कामगिरी अधिक सक्षम व परिणामकारक करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

सुरक्षित, समृद्ध आणि हरित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असून "वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९" ची प्रभावी अंमलबजावणी राज्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा देईल, असा मला ठाम विश्वास आहे. पर्यावरणीय संतुलन, जैवविविधता संरक्षण आणि लोकसहभागावर आधारित विकासाची ही वाटचाल महाराष्ट्राला अधिक सक्षम आणि शाश्वत भविष्याकडे घेऊन जाईल.

या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कार्यरत असलेल्या वन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी, स्थानिक समुदाय, स्वयंसेवी संस्था, संशोधक आणि सर्व संबंधित घटकांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो व त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो.

**(एकनाथ शिंदे)**

# संदेश



## श्रीमती सुनेत्रा अजित पवार
मा.उपमुख्यमंत्री

हवामान बदल, परिसंस्थांचा ऱ्हास आणि वाढते पर्यावरणीय आव्हान यांच्या पार्श्वभूमीवर वनसंपदेचे संरक्षण आणि संवर्धन अधिक परिणामकारकपणे करणे ही काळाची गरज आहे.

**“वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९”** हा दस्तऐवज वन व जैवविविधता सक्षमीकरण, कांदळवन संवर्धन, तंत्रज्ञानाधारित प्रशासन, कार्बन व्यवस्थापन, लोकसहभाग आणि हरित अर्थव्यवस्था यांना एकात्मिक दिशा देणारा दूरदर्शी आराखडा आहे.

महिलांचा, युवा वर्गाचा आणि स्थानिक समुदायांचा सहभाग वाढवून पर्यावरण संवर्धनाला लोकआंदोलनाचे स्वरूप देणे आणि वनाधारित शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. लोकसहभागातून ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण, त्यांना वनाधारित उपजीविका, स्वयंरोजगार आणि नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच पर्यावरण संवर्धनातील त्यांची भूमिका अधिक बळकट करणे हे या दस्तऐवजाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे. पर्यावरणीय सुरक्षितता आणि विकास यांच्यात समतोल साधत महाराष्ट्राला अधिक हरित, हवामान-सक्षम आणि शाश्वत राज्य म्हणून विकसित करण्याचा हा संकल्प आहे.

वन विभाग आणि सर्व संबंधित भागधारकांच्या सामूहिक प्रयत्नांतून “वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९” ची उद्दिष्टे यशस्वीरित्या साध्य होतील आणि महाराष्ट्र देशासाठी पर्यावरणीय नेतृत्वाचे नवे उदाहरण निर्माण करेल, असा विश्वास आहे.

या महत्त्वपूर्ण आराखड्याच्या दस्तऐवजाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्वांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.



**(सुनेत्रा अजित पवार)**

# संदेश



## श्री.गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक
मा.मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य हे समृद्ध वनसंपदा, वैविध्यपूर्ण जैवविविधता, विस्तीर्ण कांदळवन परिसंस्था तसेच समृद्ध वन्यजीव अधिवासांनी नटलेले राज्य आहे. ही नैसर्गिक संपदा केवळ पर्यावरणीय वारसा नसून राज्याच्या हवामान स्थैर्य, जलसुरक्षा तसेच लाखो नागरिकांच्या शाश्वत उपजीविकेचा भक्कम आधारस्तंभ आहे.

हवामान बदलाचे वाढते परिणाम, अधिवासांचे ऱ्हास, मानव–वन्यजीव संघर्ष तसेच शहरीकरणाचा वाढता दबाव लक्षात घेता वनसंवर्धनाची प्रक्रिया अधिक व्यापक, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाधारित करणे अत्यावश्यक ठरले आहे. या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेला “वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९” हा आराखडा वनसंवर्धन, जैवविविधता संरक्षण, कांदळवन पुनरुज्जीवन तसेच शाश्वत पर्यावरण व्यवस्थापनासाठी एक दूरदर्शी आणि मार्गदर्शक दस्तऐवज आहे.

या दृष्टीपत्राचे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), भू-स्थानिक माहिती प्रणाली (GIS), उपग्रह प्रतिमा विश्लेषण तसेच डिजिटल प्रशासन प्रणाली यांचा वन व्यवस्थापनामध्ये वाढता समावेश होय. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालींच्या साहाय्याने वन्यजीवांचे तत्काळ निरीक्षण, वन वनव्यांची पूर्वसूचना, अधिवासातील बदलांचे विश्लेषण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी शक्य होत आहे. त्यामुळे वन व्यवस्थापन हे केवळ प्रतिक्रियात्मक न राहता पूर्वसूचक आणि प्रतिबंधात्मक स्वरूपाचे होत आहे.

वन्यजीव संरक्षणाच्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित कॅमेरा ट्रॅप्स, ड्रोन सर्वेक्षण तसेच डेटा विश्लेषण यांच्या माध्यमातून वाघ, बिबट्या यांसारख्या प्रजातींची अचूक गणना, सुरक्षित वन्यजीव मार्गिकांचे नियोजन तसेच मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविणे शक्य झाले आहे. यामुळे जैवविविधतेचे संवर्धन अधिक बळकट होत आहे.

महाराष्ट्रातील कांदळवन परिसंस्था, जी “ब्ल्यू कार्बन सिंक” म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते, तिच्या संरक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. उपग्रह प्रतिमा, भू-स्थानिक माहिती प्रणाली (GIS) तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित निरीक्षण यांच्या माध्यमातून कांदळवन क्षेत्रांचे सातत्यपूर्ण निरीक्षण, अतिक्रमणांचे त्वरित निदान, ऱ्हासग्रस्त क्षेत्रांचे पुनरुज्जीवन तसेच कार्बन संचयन क्षमतेचे मूल्यांकन शक्य होत आहे. हे प्रयत्न किनारी परिसंस्थांचे संरक्षण तसेच हवामान बदलाशी सामना करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

तसेच एकात्मिक वन व्यवस्थापन प्रणाली, GIS-आधारित जमीन पडताळणी प्रणाली तसेच डिजिटल अंमलबजावणी यंत्रणा यांच्या माध्यमातून वन प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि डेटा-आधारित होत आहे. तंत्रज्ञान व संवर्धन यांचा समन्वय महाराष्ट्राला आधुनिक, कार्यक्षम आणि स्मार्ट वन व्यवस्थापनाच्या दिशेने पुढे नेत आहे.

मला दृढ विश्वास आहे की **“वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९”** हा केवळ आराखडा नसून महाराष्ट्राला जैवविविधता संवर्धन, पर्यावरण पुनर्स्थापन तसेच शाश्वत विकासाच्या क्षेत्रात देशात अग्रगण्य स्थान प्राप्त करून देणारा एक परिवर्तनकारी दस्तऐवज ठरेल.

या प्रवासात योगदान देणारे सर्व वन अधिकारी, कर्मचारी, वैज्ञानिक, स्थानिक समुदाय तसेच संबंधित सर्व घटकांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

**(गणेश रामचन्द्र नाईक)**

# संदेश



## श्री. मिलिंद म्हैसकर, भा.प्र.से

अपर मुख्य सचिव (वने)
महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्राच्या शाश्वत विकासाच्या प्रवासात वनसंपदा, जैवविविधता आणि नैसर्गिक संसाधने यांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. राज्यातील वने ही पर्यावरणीय समतोल राखण्याबरोबरच जलसुरक्षा, हवामान अनुकूलता, ग्रामीण उपजीविका, पर्यटन विकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी नैसर्गिक संपत्ती आहेत. या अमूल्य संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करताना विकास व पर्यावरण यांचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे..

मा. वनमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेले **"वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९"** हे वनसंवर्धन, वन्यजीव संरक्षण, खारफुटी संवर्धन, सामाजिक वनीकरण, समुदाय सहभाग, हरित अर्थव्यवस्था, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि परिणामकारक वन प्रशासन यांसाठीची भावी दिशा निश्चित करणारा महत्त्वपूर्ण मार्गदर्शक आराखडा आहे.

मला विश्वास आहे की, या महत्वपूर्णन पुस्तीकेच्य माध्यमातून वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन, स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण, पर्यावरणीय आव्हानांना सक्षम प्रतिसाद तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून हरित, समृद्ध आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम महाराष्ट्र घडविण्याच्या आपल्या प्रयत्नांना नवी दिशा देईल. शासन, वन विभाग, स्थानिक समुदाय आणि सर्व संबंधित भागधारकांच्या संयुक्त प्रयत्नांतून या आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी होईल, असा मला दृढ विश्वास आहे.

मा. वनमंत्री महोदयांनी मांडलेल्या या दूरदर्शी संकल्पनेमुळे नोव्हेंबर २०२९ पर्यंत महाराष्ट्र वनसंवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि शाश्वत हरित विकासाच्या क्षेत्रात देशासाठी एक आदर्श निर्माण करेल. या दृष्टीपत्राच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी, तज्ज्ञ, स्थानिक समुदाय आणि भागधारकांना माझ्या शुभेच्छा.

(मिलिंद म्हैसकर)

# संदेश



## श्री. एम. श्रीनिवास राव, भा.व.से

प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य

वन हे केवळ निसर्गाचे सौंदर्य नाही तर जीवनाचा आधार आहे. महाराष्ट्र वन विभागाने गेल्या अनेक दशकांत पर्यावरण संवर्धन, वन्यजीव संरक्षण, तसेच लोकसहभागातून हरित महाराष्ट्र घडविण्याचे कार्य केले आहे. या प्रवासात विभागाने अनेक आव्हाने स्वीकारली जसे जंगलतोड थांबणे, वन्यजीवांचे रक्षण, हवामान बदलाचे परिणाम, तसेच ग्रामीण जनतेच्या गरजा आणि विकास यांचा समतोल राखणे.

वन हे राष्ट्राच्या पर्यावरणीय संतुलनाचे, जैवविविधतेचे आणि शाश्वत विकासाचे मूलभूत आधार आहे. महाराष्ट्र वनविभागाने आपल्या स्थापनेपासून आजपर्यंत वनसंवर्धन, वन्यजीव संरक्षण, तसेच लोकसहभागातून हरित महाराष्ट्र घडविण्याचे कार्य सातत्याने केले आहे.

वन म्हणजे केवळ हिरवाई नाही, तर जीवनाचा श्वास आहे. झाडांच्या सावलीत, पक्ष्यांच्या किलबिलाटात, आणि निसर्गाच्या कुशीत माणसाचे अस्तित्व फुलते. महाराष्ट्र वनविभागाने या जीवनदायी हिरवाईचे रक्षण करण्यासाठी अनेक दशकांचा प्रवास केला आहे.

कालच्या वाटचालीत विभागाने जंगलांचे रक्षण केले, वन्यजीवांना आश्रय दिला, आणि निसर्गाशी माणसाचे नाते जपले. अभयारण्यांची निर्मिती, तसेच कायदेशीर चौकट मजबूत करण्यावर भर दिला. आजच्या काळात विभाग आधुनिक तंत्रज्ञान, जनजागृती आणि लोकसहभागातून हरित महाराष्ट्राची स्वप्ने साकारत आहे. विभाग डिजिटल तंत्रज्ञान, जनजागृती मोहिमा, आणि शाश्वत विकासाच्या संकल्पनांद्वारे पर्यावरण संवर्धन अधिक प्रभावीपणे करत आहे.

वनक्षेत्र वाढविण्यासाठी वृक्षारोपण मोहिमा राबविण्यात आल्या, वन्यजीव अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने स्थापन करण्यात आली. या काळात विभागाने जंगलतोड रोखण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या आणि वनसंवर्धनाला लोकसहभागाची जोड दिली.

आजच्या काळात वनविभागाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. डिजिटल नकाशे, उपग्रह चित्रण, ड्रोन सर्वेक्षण यांचा उपयोग करून वनक्षेत्राचे निरीक्षण अधिक प्रभावीपणे केले जात आहे. जनजागृती मोहिमा, शालेय विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण शिक्षण कार्यक्रम, तसेच ग्रामीण जनतेच्या सहभागातून वनसंवर्धनाची चळवळ अधिक व्यापक झाली आहे. शाश्वत विकासाच्या संकल्पना राबवून विभागाने पर्यावरण संवर्धनाला आधुनिक दृष्टिकोन दिला आहे.

उद्याच्या वाटचालीत वनविभागाची भूमिका आणखी महत्त्वाची ठरणार आहे. वन विभागाला हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जावे लागेल, जैवविविधतेचे रक्षण करावे लागेल, आणि भावी पिढ्यांसाठी हिरवाईची शाश्वत हमी द्यावी लागेल.तसेच 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय ध्येयाशी सुसंगत हरित धोरणे राबविणे ही मोठी जबाबदारी असेल.

हे पुस्तक म्हणजे त्या प्रवासाची कहाणी आहे, कालच्या आठवणी, आजची जबाबदारी आणि उद्याची प्रेरणा. या पुस्तकातील माहिती वनविभागाच्या भूतकाळातील कार्य, वर्तमानातील उपक्रम आणि भविष्यातील संकल्पना यांचा समग्र आढावा घेते. वन हे आपल्या संस्कृतीचे, अर्थव्यवस्थेचे आणि जीवनाचे अविभाज्य अंग आहे. म्हणूनच वनविभागाची वाटचाल ही केवळ प्रशासनाची कहाणी नसून, ती प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी जोडलेली आहे.

हे पुस्तक वाचकांना वनविभागाच्या कार्याचा अभिमान, आजच्या उपक्रमांची जाणीव आणि उद्याच्या संकल्पनांची प्रेरणा देईल.

**(एम. श्रीनिवास राव)**

# अनुक्रमणिका


**दृष्टीकोन आणि परिणाम-केंद्रित ध्येय** ........ 12

**प्रस्तावना** ........ 14

**०१. राज्याची वन / वन्यजीव संपदा** ........ 17

१.१ वनक्षेत्र त्यातील वाढ ........ 19

१.२ वन्यजीव संरक्षित क्षेत्र व त्यातील वाढ ........ 21

१.३ व्याघ्र संवर्धनातील महाराष्ट्राचे स्थान ........ 23

१.४ बिबट्यांची स्थिती ........ 24

१.५ कांदळवने व त्यासाठी राबवलेले उपक्रम ........ 26

**०२. वर्तमान व भविष्यातील आव्हाने** ........ 28

२.१ मानव–वन्यजीव संघर्ष ........ 30

२.२ वन संरक्षण : वणवा उपाययोजना ........ 31

**०३. २०२९ पर्यंतचा विषयवार कृती आराखडा** ........ 32

३.१ वनांचे संवर्धन ........ 34

३.२ वन्यजीव व्यवस्थापन ........ 41

३.३ मानव-वन्यजीव संघर्ष व त्यावरील उपाययोजना ........ 46

३.४ महाराष्ट्र वन विकास महामंडळ ........ 50

३.५ उत्पादन वानिकी ........ 55

३.६ कांदळवन संवर्धन ........ 61

३.७ निसर्ग पर्यटन ........ 67

३.८ महाराष्ट्र बांबू विकास मंडळ ........ 71

३.९ जैवविविधता मंडळ ........ 75

३.10 गौण वनोपज (NTFP) ........ 84

# अनुक्रमणिका

३.११ तंत्रज्ञानाधारित वनीकरण .......... 88

३.१२ कॅम्पा .......... 92

३.१३ समुदायाधारित शाश्वत वनविकास .......... 97

३.१४ सामाजिक वनीकरण .......... 101

(अ) हरित महाराष्ट्राच्या दिशेने .......... 102

(ब) कृषीवानिकी .......... 106

(क) गुणवत्तापूर्ण रोप निर्मिती .......... 110

(ड) जनजागृती व विस्तार कार्य .......... 114

३.१५ अर्थसंकल्प, नियोजन व विकास .......... 119

३.१६ मानव संसाधान व्यवस्थापन .......... 122

# उद्देश्य

> *हवामान बदलास सक्षमपणे सामोरे जाणारा, पर्यावरणीयदृष्ट्या सुरक्षित व तंत्रज्ञान-सक्षम महाराष्ट्र घडविणे, ज्यामध्ये वन जैवविविधता संवर्धन, परिसंस्था सेवा, शाश्वत उपजीविका आणि हरित आर्थिक विकास हे प्रमुख आधारस्तंभ म्हणून कार्यरत राहतील तसेच वर्तमान व भावी पिढ्यांच्या समृद्धीला बळकटी देतील.*

# परिणाम-केंद्रित ध्येय

वन व वन्यजीव संवर्धनाच्या कार्यास अधिक बळकट करणे, ऱ्हास झालेल्या परिसंस्थांचे पुनर्स्थापन करणे, जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे, हवामान बदलास सामोरे जाण्याची क्षमता वाढविणे, उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे, लोकसहभागाला प्रोत्साहन देणे तसेच पर्यावरणीय शाश्वतता आणि सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करत वनसंपत्तीच्या आर्थिक क्षमतेचा शाश्वत विकास साधण्यासाठी एक धोरणात्मक मार्गदर्शक आराखडा उपलब्ध करून देणे, हा या पुस्तीकेचा प्रमुख ध्येय आहे.

### या दृष्टी दस्तऐवजाची प्रमुख उद्दिष्टे:

- सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातील वनीकरण क्षेत्राच्या विकासासाठी दृष्टीकोन निश्चित करणे व त्यानुसार धोरणात्मक प्राधान्यक्रम निश्चित करणे
- **हवामान बदल, जैवविविधता संवर्धन, जमिनीच्या वापरातील बदल तसेच शाश्वत विकासाशी संबंधित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बांधिलकींशी वन व्यवस्थापनाचे सुसंगतीकरण साधणे.**
- **भूदृश्य-आधारित संवर्धन, अधिवास जोडणी आणि परिसंस्था पुनर्स्थापनाद्वारे** हवामान बदलास तोंड देण्याची क्षमता बळकट करणे.
- **कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), भू-स्थानिक तंत्रज्ञान, डिजिटल निरीक्षण** आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रियेच्या माध्यमातून तंत्रज्ञान-सक्षम वन प्रशासनाला चालना देणे.
- **शाश्वत वनाधारित उपक्रम आणि सहभागात्मक वन व्यवस्थापनाद्वारे** स्थानिक समुदायांची उपजीविका व लोकसहभाग वाढविणे.
- हवामान बदल, वनाग्नी, आक्रमक परकीय प्रजाती आणि मानव-वन्यजीव संघर्ष यांसारख्या उदयोन्मुख आव्हानांशी सामना करण्याची **क्षमता वाढविणे.**
- नवोन्मेषी, शाश्वत आणि भविष्याभिमुख वन व्यवस्थापनाच्या क्षेत्रात महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य राज्य म्हणून स्थापित करणे.


वनेषु वसन्ति देवाः,
तत्रैव शान्ति लभ्यते।

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील वनसंपदा, जैवविविधता आणि पर्यावरणीय सुरक्षितता या केवळ पर्यावरणीय संकल्पना नसून राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा, जलसुरक्षेचा, कृषी उत्पादनक्षमतेचा, पर्यटन विकासाचा आणि स्थानिक रोजगारनिर्मितीचा महत्वपूर्ण आधार आहेत. राज्यातील अनेक जिल्हे, तालुके आणि गावे वन परिसंस्थांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जोडलेले असून वनसंवर्धनातील गुंतवणूक ही स्थानिक विकास, सामाजिक स्थैर्य आणि नागरिकांच्या जीवनमान उन्नतीसाठी देखील अत्यंत आवश्यक आहे.

हवामान बदलाचे वाढते परिणाम, वन वणव्यांची तीव्रता, मानव-वन्यजीव संघर्ष, आक्रमक परकीय वनस्पती प्रजातींचा प्रसार, परिसंस्थांचा ऱ्हास तसेच शाश्वत उपजीविकेच्या वाढत्या गरजा यामुळे वन व्यवस्थापन अधिक परिणामकारक, तंत्रज्ञान-सक्षम आणि लोकसहभागावर आधारित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या आव्हानांचा परिणाम केवळ वनक्षेत्रापुरता मर्यादित नसून शेतकरी, ग्रामस्थ, आदिवासी समाज, स्थानिक उद्योग, पर्यटन क्षेत्र आणि ग्रामीण पायाभूत सुविधांवर देखील होत आहे.

महाराष्ट्र शासनाने **सन २०२६-२७ मध्ये वन विभागासाठी ₹२६०७.२८ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित** केला असून वनसंवर्धन, वन्यजीव व्यवस्थापन, समुदाय सहभाग, जैवविविधता संवर्धन आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासन या क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांमुळे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये हरित पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती, जलसंधारण, निसर्ग पर्यटन, वनाधारित उद्योग आणि ग्रामीण विकासाला नवी चालना मिळणार आहे.

राज्य शासनाने ग्रामस्थांच्या सहभागातून वन व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन तसेच ग्राम परिस्थितिकी विकास समित्यांमार्फत वनसंरक्षण, संवर्धन आणि रोजगारनिर्मितीची व्यापक चळवळ उभारली आहे. तसेच संत तुकाराम वन ग्राम योजनेद्वारे गाव व वन यांचा एकात्मिक विकास साधण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमांमुळे गावांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळून स्थानिक पातळीवर रोजगार, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि समुदाय सक्षमीकरण साध्य होणार आहे.



मानव-वन्यजीव संघर्ष हा राज्यातील अनेक भागातील एक महत्त्वाचा विषय बनला असून शेतकरी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली, थर्मल ड्रोन, कमांड अँड कंट्रोल सेंटर, सौर कुंपण योजना, जलद प्रतिसाद यंत्रणा (Rapid Rescue Units), बचाव व उपचार केंद्रे आणि वाढीव नुकसानभरपाई यांसारख्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यामुळे नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेचे संरक्षण होऊन ग्रामीण भागातील विकास प्रक्रियेला अधिक बळकटी मिळेल.

राज्यात अटल बांबू समृद्धी योजना, अमृत वन, बेल उद्याने, ५० उच्च तंत्रज्ञानाधारित रोपवाटिका, बांबू लागवड विस्तार तसेच वनाधारित हरित अर्थव्यवस्था विकसित करण्याचे वन विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमांमुळे ग्रामीण युवक, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक संस्था आणि स्थानिक उद्योजक यांना नवीन आर्थिक संधी उपलब्ध होऊन स्थानिक पातळीवर शाश्वत विकासाचा मजबूत पाया निर्माण होईल.

वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने गोरेवाडा येथील आफ्रिकन सफारी व पक्षी उद्यान, शिवनेरी बिबट सफारी, व्याघ्र व चितळ स्थानांतरण कार्यक्रम, वन्यजीव बचाव केंद्रे, जिल्हास्तरीय लघु प्राणीसंग्रहालये आणि जनुकीय जैवविविधता संवर्धनासाठी ₹२८६ कोटींचा "महाराष्ट्र जनुक स्थापना कोष प्रकल्प" यांसारखे उपक्रम राबविले जात आहेत. या प्रकल्पांमुळे पर्यावरणीय संवर्धनासोबत पर्यटन, स्थानिक रोजगार आणि प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना मिळेल. याशिवाय, महाराष्ट्राच्या वन व्यवस्थापनाला राष्ट्रीय वन धोरण, जैवविविधता संवर्धन, हवामान बदल अनुकूलन, भूमी पुनर्स्थापन आणि शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) यांच्याशी सुसंगत ठेवणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, भू-स्थानिक तंत्रज्ञान, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया यांचा वापर करून वन प्रशासनाचे आधुनिकीकरण केल्यास शासनाच्या सेवा अधिक परिणामकारक, पारदर्शक आणि नागरिककेंद्री बनतील.

या पार्श्वभूमीवर, "**वाटचाल वनविभागाची : संकल्प २०२९**" हा केवळ वन विभागाचा विकास आराखडा नसून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या शाश्वत विकासाशी निगडित असा व्यापक लोककल्याणकारी उपक्रम आहे. वनसंवर्धन, जलसुरक्षा, रोजगारनिर्मिती, ग्रामीण विकास, जैवविविधता संरक्षण, हवामान लवचिकता, समुदाय सहभाग आणि हरित आर्थिक प्रगती यांना एकात्मिक दिशा देत हा आराखडा महाराष्ट्राला पर्यावरणीयदृष्ट्या सुरक्षित, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि भविष्याभिमुख राज्य बनविण्यासाठी आधारभूत चौकट प्रदान करेल. या प्रक्रियेत लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आणि नेतृत्व हे या उद्दिष्टांच्या यशस्वी पूर्ततेसाठी अत्यंत महत्त्वाचे राहील.



# द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक –

# 150 दिवसाचा कृती कार्यक्रम

शासन निर्णय दिनांक 30.05.2025 अन्वये राज्य शासनाच्या सर्व प्रशासनिक विभागांनी तसेच क्षेत्रीय कार्यालयांनी 150 दिवसांमध्ये त्यांचे कार्यालय ई – प्रशासनाच्या दृष्टिने सर्वंकष सुधारणा करून नागरिकांना सोयीचे कसे होईल, यासाठी विशेष सुविधा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून 150 दिवसांचा कृती आराखडा राबविणेबाबत निर्देशित करण्यात आले होते. १५० दिवसांच्या ई-शासन कृती कार्यक्रमांतर्गत वन विभागाने खालील बाबींची अंमलबजावणी केली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | WEBSITE | Improved Accessibility – **WCAG 2.1 Level AA** | Enabled **24 languages** powered by Bhashini | Nominated **CDO** & ensured the data integration standards | Improved **search functionality** of website |
| 02 | AAPLE SARKAR | Analysed RTS application historic data | Conducted IEC campaign through WhatsApp, website, print etc. | Performed Grievance analytics for informed decision making | Training & Capacity building of **1097 officers** |
| 03 | E-OFFICE | Analysed the E-Office data and **reduced pendency's** | Enabled **training of 53 officers** | Ensured the required documents in **KMS at each desk** | |
| 04 | DASHBOARD | Analysed 33 dashboards and implemented technical changes | Synced the dashboard with CM dashboard and other sources | Enhanced the mobile compatibility | Improved the Inferential data analytics maturity |
| 05 | WHATSAPP CHATBOT | Enabled **bilingual support** on E-Auction chatbot | Conducted **IEC campaign of 10 cr. plantation** drive | Enabled **RTS notification** through WhatsApp | |
| 06 | AI/ BLOCKCHAIN | Impact Analysis of AI leopard tracking & AI firewall | Impact Analysis of AI based fire detection - Pench | Use of Gen AI to analyse and assess open source plantation data | |
| 07 | GIS COMPLIANCE | Derived Innovative use cases (Ex. Risk analysis of fire sensitive zones) | Documentation of Bi-directional integration with GatiShakti | | |



# ०१

# राज्याची वन / वन्यजीव संपदा



# १.१ वनक्षेत्र

**India State of Forest Report (ISFR) 2023 नुसार राष्ट्रीय स्तरावर अग्रगण्य स्थान**

**१४,५२४.८८** चौ.कि.मी.
भारतातील **सर्वाधिक वृक्षाच्छादन** असलेले राज्य

**२१३.९३** दशलक्ष
घनमीटर वाढीव **सर्वाधिक वृक्षाच्छादन** वृक्षसाठा (Growing Stock) नोंदविला आहे

**२१.२५%**
महाराष्ट्रातील सध्याचे वन व वृक्षाच्छादन

**३३%**
राष्ट्रीय वन धोरणानुसार निर्धारित हरित आच्छादनाच्या उद्दिष्टाकडे राज्याची वाटचाल सुरू.
**देशात एकमेव हरित महाराष्ट्र अभियानाची स्थापना**

**१३,५७२** चौ.कि.मी.
बांबू क्षेत्रफळात महाराष्ट्राचा देशात **तिसरा क्रमांक**

**४६५** दशलक्ष टन
कार्बन साठ्यात महाराष्ट्राचा देशात **चौथा क्रमांक**

**१३६.४५** दशलक्ष घनमीटर
कृषिवनिकीतील वाढीव वृक्षसाठ्यात महाराष्ट्र देशात **प्रथम क्रमांक**

**१२.३९** चौ.कि.मी.
कांदळवन आच्छादन क्षेत्रवाढीत महाराष्ट्र देशात **द्वितीय क्रमांक**

- **४५७ वन तपासणी नाके (Check Post) वनसंरक्षण व अंमलबजावणीसाठी कार्यरत**
- **८४५ निरीक्षण मनोरे (observation tower) वनक्षेत्राच्या प्रभावी देखरेखीसाठी कार्यरत**
- **६८१ वन संरक्षण कुट्या (Forest Protection Huts) अवैध वृक्षतोड व बेकायदेशीर वाहतूक रोखण्यासाठी कार्यरत**



# १.२ वन्यजीव संरक्षित क्षेत्र व त्यातील वाढ

**१२९** सस्तन प्राण्यांच्या प्रजाती

**११७** सरपटणाऱ्या प्राण्यांच्या प्रजाती

**५५१** पक्षी प्रजाती

**०३** प्रमुख वन परिसंस्था

- *जलसुरक्षा, हवामान नियमन व मृदा संवर्धनास हातभार*
- *पर्यावरणीय जोडणी व जैवविविधता संवर्धनावर भर*

## वन्यजीव संरक्षण – विशेषत: व्याघ्र संवर्धनाचे प्रयत्न

**संरक्षित क्षेत्रांचे जाळे (Protected Area Network)**

महाराष्ट्रातील जैवविविधता संवर्धनाचा कणा म्हणजे राज्याचे संरक्षित क्षेत्रांचे जाळे (Protected Area Network) होय. पर्यावरणीय, जैविक, सांस्कृतिक आणि संवर्धनात्मक महत्त्व लक्षात घेऊन या क्षेत्रांना कायदेशीर संरक्षण प्रदान करण्यात आले आहे. वन्यजीव आणि त्यांच्या अधिवासांचे दीर्घकालीन संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी या क्षेत्रांतील मानवी क्रियाकलापांचे नियमन केले जाते.

या सर्व संरक्षित क्षेत्रांचे एकत्रित क्षेत्रफळ ११,०९१.७४ चौ.कि.मी. असून ते राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे ३.६ टक्के आणि वनक्षेत्राच्या जवळपास १५ टक्के क्षेत्र व्यापते.

**०६** राष्ट्रीय उद्याने (१,२६९.२७ चौ.कि.मी.)

**५४** अभयारण्ये (७,९४४.५६ चौ.कि.मी.)

**२८** संवर्धन राखीव क्षेत्रे (१,८७७.९१ चौ.कि.मी.)



# १.३ व्याघ्र संवर्धनातील महाराष्ट्राचे स्थान

भारताच्या व्याघ्र संवर्धनामध्ये महाराष्ट्राचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. राज्यात सध्या ६ व्याघ्र प्रकल्प (Tiger Reserves) असून ते मध्य भारतीय व्याघ्र अधिवास पट्ट्याचा (Central Indian Tiger Landscape) महत्त्वपूर्ण भाग आहेत. या व्याघ्र प्रकल्पांचे एकूण क्षेत्रफळ सुमारे **९,११४ चौ.कि.मी.** असून त्यामध्ये **३,९५८ चौ.कि.मी.** कोअर क्षेत्र (Core Area) आणि **५,१५६ चौ.कि.मी.** बफर क्षेत्र (Buffer Area) समाविष्ट आहे.

**राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्प पुढीलप्रमाणे आहेत:**

1. **मेळघाट व्याघ्र प्रकल्प - २,७६८.५२ चौ.कि.मी.**
2. **ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प - १,७२७.५९ चौ.कि.मी.**
3. **नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प - १,८९७.६३ चौ.कि.मी.**
4. **सह्याद्री व्याघ्र प्रकल्प - १०७७.३२ चौ.कि.मी.**
5. **बोर व्याघ्र प्रकल्प - ८१६.२७ चौ.कि.मी.**
6. **पेंच व्याघ्र प्रकल्प - ७४१.२२ चौ.कि.मी.**

या सहा व्याघ्र प्रकल्पांमध्ये एकूण **२२ संरक्षित क्षेत्रांचा** समावेश आहे.

**२०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार महाराष्ट्रात ४४४ वाघ असून देशात राज्याचा चौथा क्रमांक आहे.**

| वर्ष | २००६ | २०१० | २०१४ | २०१८ | २०२२ |
|---|---|---|---|---|---|
| व्याघ्र संख्या | १०३ | १६८ | १९० | ३१२ | ४४४ |

# १.४ बिबट्यांची सद्यस्थिती

**१,९८५**
राज्यातील एकूण बिबटे (२०२२ अंदाज)

**२९५**
२०१८ ते २०२२ दरम्यान वनक्षेत्रात २९५ बिबट्यांची वाढ

**द्वितीय क्रमांक**
देशात बिबट्यांच्या संख्येत

## मुख्य आव्हाने

- **बिबट्यांच्या संख्येत देशात द्वितीय क्रमांक**
- **कृषी क्षेत्रे व मानवी वस्तीलगतच्या अधिवासांमध्ये लक्षणीय उपस्थिती**

## मानव-बिबट संघर्ष व्यवस्थापनास विशेष प्राधान्य

- **जुन्नर वनविभागात ५० AI-आधारित कॅमेऱ्यांद्वारे बिबट्या पूर्वसूचना प्रणाली कार्यान्वित; डिसेंबर २०२५–मार्च २०२६ ९० अलर्टमुळे वेळेवर प्रतिसाद व जोखीम क्षेत्रांची ओळख**
- **कोंकणातील प्रत्येक जिल्ह्यात बिबट सफारीचे नियोजन**
- **अतिरिक्त बिबट निवारा केंद्र तसेच माणिकडोह येथील बिबट बचाव केंद्राची क्षमता वाढवण्याचे काम प्रगतीपथावर**
- **मानव–बिबट संघर्ष निवारणासाठी व त्यांची प्रजननक्षमता कमी करणे इम्युनोकॉन्ट्रासेप्शन (Immunocontraception) तंत्राचा जुन्नर येथे प्रायोगिक अभ्यास सुरू. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाची (MoEF&CC) १७ नोव्हेंबर २०२५ रोजी मान्यता**
- **USDA–NWRC विकसित GnRH-आधारित प्रजननक्षमता कमी करणाऱ्या लसीचा वापर**
- **उच्च-संघर्ष क्षेत्रांमध्ये या अहिंसक तंत्राच्या उपयुक्ततेचे मूल्यमापन सुरू**



# १.५ कांदळवने व त्यासाठी राबवलेले उपक्रम

- **महाराष्ट्रातील किनारपट्टीची एकूण लांबी : ८७८ किमी**
- **महाराष्ट्रातील एकूण कांदळवन आच्छादन क्षेत्रफळ : ३१५.०९ चौ.कि.मी.**
- **महाराष्ट्रात आढळणाऱ्या एकूण कांदळवन प्रजाती : १८**
- **भारतीय वन स्थिती अहवालानुसार महाराष्ट्रातील कांदळवन आच्छादन क्षेत्रात वाढ – १२.३९ चौ.कि.मी.**

| | | |
|---|---|---|
| **५०**<br>ठिकाणी घरट्यांचे संवर्धन | **२२७**<br>कासवमित्र नियुक्त | **८**<br>कासवांना सॅटेलाइट टॅग |
| **२९२९**<br>कासव घरटे संख्या | **१,७१,२४५**<br>कासवांची पिल्ले समुद्रात सुरक्षित सोडली | **४६८**<br>कासवांच्या सुटकेसाठी मच्छीमारांना नुकसान भरपाई |



## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी कांदळवन उद्यान










# ०२

# वर्तमान व भविष्यातील आव्हाने



# २.१ मानव–वन्यजीव संघर्ष

### प्रमुख बाबी

**८८ संरक्षित क्षेत्रे**

| ०६ | ५४ | २८ |
|---|---|---|
| राष्ट्रीय उद्याने | अभयारण्ये | संवर्धन राखीव क्षेत्रे |

**४४४ वाघ (२०२२)** – २००६ मधील १०३ वरून वाढ

**१,९८५ बिबटे (२०२२)** – २०१८ मधील १,६९० वरून वाढ

### मानव–वन्यजीव संघर्ष

राज्यात वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ, वनक्षेत्रांचे विखंडीकरण, मानवी लोकसंख्येत वाढ आणि वनांवरील वाढते अवलंबित्व यांमुळे मानव–वन्यजीव संघर्ष वाढत असल्याचे दिसून येते. राज्यात मुख्यतः **मानव–वाघ**, **मानव–इतर मांसभक्षक व तृणभक्षक प्राणी** तसेच **मानव–जंगली हत्ती** असे तीन प्रकारचे संघर्ष आढळतात. या संघर्षाचे व्यवस्थापन व कमी करण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

### मानव–वन्यजीव संघर्ष निवारणासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना

**जुन्नर वन विभागात** मानव–बिबट संघर्ष कमी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित बिबट मागोवा व पूर्वसूचना प्रणाली **(AI-based Leopard Tracking & Early Warning System)** कार्यान्वित.

**५०** — AI-सक्षम कॅमेरे, एज एआय **(Edge AI)**, हूटर इशारे **(Hooter Alerts)** व **GSM** सूचना प्रणालीद्वारे बिबट्यांच्या हालचालींचे रिअल-टाइम निरीक्षण.

**१०००** — गावांमध्ये सदर प्रणाली प्रस्तावित; त्वरित प्रतिसाद, सार्वजनिक सुरक्षा व उच्च-जोखीम क्षेत्रांची ओळख करून मानव वन्यजीव संघर्षाला आळा

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित मानव–वन्यजीव संघर्ष निवारण प्रणाली **(AI-based Human–Wildlife Conflict Mitigation System)** कार्यान्वित.

**IP-सक्षम कॅमेरा** (IP-enabled Camera Network), **क्लाउड-आधारित विश्लेषण** (Cloud-based Analytics) व यंत्र-अध्ययन मॉडेल्स (Machine Learning Models) द्वारे **वाघ, बिबट व अस्वल** यांचे **रिअल-टाइम निरीक्षण.**

**१५+ गावांमध्ये ७५९ वन्यजीव चेतावणी**

| ४२३ | २१३ | १२३ |
|---|---|---|
| वाघ | बिबट | अस्वल |

वेळेवर पूर्वसूचना व क्षेत्रीय पथकांचा त्वरित प्रतिसाद; संघर्षाचा धोका कमी व समुदाय सुरक्षेत वाढ.

# २.२ वन संरक्षण : वन-वणवा उपाययोजना

महाराष्ट्रातील वनक्षेत्र विविध वनप्रकार, हवामान आणि भौगोलिक परिस्थितींमध्ये विस्तारलेले असल्याने वनवा व्यवस्थापन हे वनसंवर्धनासमोरील एक महत्त्वाचे आव्हान आहे. सन २०२३-२४ मधील वनवा हंगामात राज्यातील **४,०९५.०४ चौ.कि.मी.** वनक्षेत्र वनव्यांमुळे प्रभावित झाले. विशेषतः गडचिरोली, गोंदिया, ठाणे, चंद्रपूर आणि पुणे जिल्ह्यांमध्ये वनव्यांचा तुलनेने अधिक प्रभाव दिसून आला. बदलते हवामान, विस्तीर्ण वनक्षेत्र आणि दुर्गम भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता वनव्यांचे वेळेवर निदान, प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी तंत्रज्ञानाधारित उपाययोजनांची आवश्यकता अधिक अधोरेखित होते.

**४,०९५** चौ.कि.मी
वनव्यामुळे प्रभावित वनक्षेत्र (२०२३-२४)

**२,६८१** चौ.कि.मी
प्रभावित क्षेत्र–(२०२३-२४) गडचिरोली जिल्ह्यात

**०५**
(गडचिरोली, गोंदिया, ठाणे, चंद्रपूर व पुणे) सर्वाधिक प्रभावित जिल्हे

---

## वणवा व्यवस्थापनासाठी नाविन्यपूर्ण दृष्टिकोन

### AI आधारित वणवा शोध प्रणाली – पेंच व्याघ्र प्रकल्प

वनव्यांचे वेळेवर निदान व त्वरित नियंत्रण सुनिश्चित करण्यासाठी पेंच व्याघ्र प्रकल्पात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आधारित वनवा शोध व देखरेख प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये दीर्घ-पल्ल्याचे PTZ कॅमेरे (Pan-Tilt-Zoom Cameras) आणि अवरक्त कॅमेरे (Infrared Cameras) वापरून संवेदनशील वनक्षेत्रांवर सतत देखरेख ठेवली जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित धूर व अग्नि ओळख मॉडेल्स (Smoke & Fire Recognition Models) द्वारे वास्तवकालीन (Real-time) विश्लेषण करून काही मिनिटांत नियंत्रण कक्षास सूचना पाठविल्या जातात, ज्यामुळे वनवा प्रतिसाद यंत्रणेची कार्यक्षमता अधिक बळकट झाली आहे.

**४७६**
अग्नी-सतर्कता (Fire Alerts) (डिसेंबर 2025 – एप्रिल 2026)

**AI-आधारित**
धूर व आग ओळख प्रणालीद्वारे काही मिनिटांत नियंत्रण कक्षाला सूचना

**PTZ व IR**
कॅमेऱ्यांद्वारे 24x7 आणि रात्रीच्या वेळेतील सक्षम निगराणी

०३

# २०२९ पर्यंतचा विषयवार कृती आराखडा



# ३.१ वनांचे संवर्धन



## #१

१४,५२४.८८ चौ.कि.मी. वृक्षावरण व २१३.९३ दशलक्ष घनमीटर वाढीव वृक्षसाठ्यासह भारतातील क्रमांक १ राज्य ( 2023).

## २१.५%

राष्ट्रीय वन धोरणातील ३३% हरित आच्छादनाच्या उद्दिष्टाच्या तुलनेत महाराष्ट्राचे विद्यमान वन व वृक्षावरण.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

वनांचे संरक्षण आणि संवर्धन हे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. वाढते शहरीकरण आणि विकास प्रकल्पांमुळे वनजमिनींवर अतिक्रमण होण्याचा आणि त्यांचे अवैध वाटप होण्याचा धोका वाढला आहे. जैवविविधता टिकवण्यासाठी, हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी आणि वन्यजीवांच्या अधिवासाचे रक्षण करण्यासाठी या वनजमिनींची सुरक्षितता (Securing forest land) सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- भारतातील सर्वाधिक वृक्षाच्छादन असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राने १४,५२४.८८ चौ.कि.मी. वृक्षाच्छादन आणि २१३.९३ दशलक्ष घनमीटर वाढीव वृक्षसाठा (Growing Stock) नोंदविला आहे (ISFR 2023).
- महाराष्ट्रातील सध्याचे वन व वृक्षाच्छादन २१.२५% असून, राष्ट्रीय वन धोरणानुसार निर्धारित ३३% हरित आच्छादनाच्या उद्दिष्टाकडे राज्याची वाटचाल सुरू आहे.
- वनसंरक्षण व अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी राज्यातील महत्त्वाच्या ठिकाणी ४५७ वन तपासणी नाके (Check Posts) कार्यरत आहेत.
- वनक्षेत्रावर प्रभावी देखरेख व संवर्धनासाठी राज्यभरात ८४५ निरीक्षण मनोरे (Observation Towers) कार्यरत आहेत.
- वनगुन्ह्यांना प्रतिबंध व त्वरित प्रतिसाद देण्यासाठी राज्यात ८० फिरते अंमलबजावणी पथके (Mobile Enforcement Teams) कार्यरत आहेत.
- अवैध वृक्षतोड व वनउत्पादनांच्या बेकायदेशीर वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यभरात ६८१ वन संरक्षण कुट्या (Forest Protection Huts) कार्यरत आहेत.

**विधानसभेतील प्रश्नांतून समोर आलेल्या प्रणालीगत त्रुटी.** *(Challenges)*

- वनविभागाच्या नोंदी आणि महसूल विभागाच्या ७/१२ उताऱ्यांमधील विसंगती आणि समन्वयाचा अभाव. विहीत कार्यपद्धती शिवाय विविध प्रयोजनाकरीता झालेले वन जमीनींचे वाटप
- अद्ययावत एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्मचा अभाव, ज्यामुळे विकास प्रकल्प, शहरी नियोजन आणि जमीन नोंदणी (Registration) प्रक्रियेत वनजमिनींचे उल्लंघन होते.



## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • वनविभागाच्या जमिनींची महसूल विभागाच्या ७/१२ उताऱ्यांसोबत पडताळणी करण्यासाठी एक विशेष ॲप (App) विकसित करणे.<br><br>• उपवनसंरक्षक (DCF) त्यांच्याकडील वनजमिनींच्या सर्व्हे क्रमांकाची यादी या ॲपवर अपलोड करतील<br><br>• हे ॲप 'महाभूलेख' (Mahabhulekh) च्या ७/१२ API द्वारे माहिती मिळवून वनविभागाच्या नोंदींशी त्याची तुलना करेल.<br><br>• एका क्लिकवर उपवनसंरक्षकांना ७/१२ आणि वनविभागाच्या नोंदींमधील तफावत समजेल, ज्यामुळे वनजमिनींचे अवैध वाटप त्वरित शोधता येईल. | • MRSAC ने तयार केलेल्या महसूल डिजिटल नकाशाच्या धर्तीवर सर्व वनजमिनींच्या डिजिटल मॅप लेयर्सचे (layers) एकत्रीकरण करणे.<br><br>• वनजमिनींची ही सर्व डिजिटल माहिती 'पीएम गती शक्ती' (PM GATI SHAKTI) पोर्टलवर अपलोड करणे.<br><br>• नागरिकांसाठी एका क्लिकवर कोणताही सर्व्हे क्रमांक वनजमीन आहे की नाही, हे तपासण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.<br><br>• प्रकल्प विकासक (Project proponents), नगररचना विभाग आणि जमीन नोंदणी विभागांना या पोर्टलशी जोडणे, जेणेकरून भविष्यात वनजमिनींचे उल्लंघन होणार नाही. | • वनविभागाच्या प्रत्येक उप-विभागाला (Sub-wing) या एकात्मिक पोर्टलशी जोडणे.<br><br>• पोर्टलवर वनजमिनीच्या कोणत्याही भागावर (Patch of forest) क्लिक केल्यास त्या जमिनीची मूळ अधिसूचना, संरक्षण आणि वृक्षारोपणासाठी खर्च झालेला निधी, आणि जमिनीचे काही वळतीकरण (Diversion) झाले असल्यास त्याची संपूर्ण माहिती उपलब्ध करून देणे.<br><br>• संपूर्ण वनविभागाचे कामकाज एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मशी जोडणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)

*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- नगररचना विभाग, महसूल विभाग आणि नोंदणी (Registration) विभागांसाठी एकात्मिक डिजिटल पोर्टलचा वापर अनिवार्य करणारे धोरण तयार करणे.
- कोणतीही जमीन विकसित करण्यासाठी मंजुरी देण्यापूर्वी किंवा तिची खरेदी-विक्री नोंदणी करण्यापूर्वी ती वनजमीन नसल्याची खात्री या एकात्मिक पोर्टलद्वारे करणे बंधनकारक करणे.

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)*

- महाभूलेख (Mahabhulekh) API इंटिग्रेशन आणि रिअल-टाइम पडताळणीसाठी मोबाईल/वेब ॲप डेव्हलपमेंट.
- GIS आणि सॅटेलाईट मॅपिंगचा वापर करून वनजमिनींचे डिजिटायझेशन आणि पीएम गती शक्ती (PM GATI SHAKTI) पोर्टलशी एकात्मीकरण.
- वनविभागाच्या सर्व उप-विभागांना जोडणारे आणि एका क्लिकवर संपूर्ण माहिती देणारे अत्याधुनिक 'वन व्यवस्थापन पोर्टल' (Integrated Forest Management Portal) विकसित करणे.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1. **प्रकल्पाचे नाव:** **वनजमीन आणि ७/१२ उतारा पडताळणी ॲप (Forest Land & 7/12 Reconciliation App)**
**कालावधी :** २०२६-२०२७
**जबाबदारी :** माहिती तंत्रज्ञान कक्ष आणि संबंधित उपवनसंरक्षक (DCF)

---

2. **प्रकल्पाचे नाव:** **वनजमिनींचे संपूर्ण डिजिटायझेशन आणि 'पीएम गती शक्ती' इंटिग्रेशन**
**कालावधी :** २०२७-२०२८
**जबाबदारी :** वनविभाग (GIS Cell) आणि MRSAC

---

3. **प्रकल्पाचे नाव:** **वनविभागाचे एकात्मिक व्यवस्थापन आणि माहिती पोर्टल** (Integrated Forest Management Portal)
**कालावधी :** २०२८-२०२९
**जबाबदारी :** प्रशासन आणि तंत्रज्ञान कक्ष, वनविभाग

---

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- १००% वनजमिनींच्या ७/१२ उताऱ्यांची डिजिटल पडताळणी आणि त्रुटींचे निराकरण. वनजमिनींचे अवैध वाटप आणि अतिक्रमणांची नवीन प्रकरणे शून्यावर (Zero instances) आणणे
- सर्व वनजमिनींच्या डिजिटल नकाशांचे 'पीएम गती शक्ती' आणि इतर विकास नियोजन पोर्टलवर यशस्वी एकत्रीकरण
- एकात्मिक पोर्टलच्या माध्यमातून प्रशासकीय पारदर्शकता वाढणे आणि नागरिकांचा वनविभागावरील विश्वास दृढ होणे.

## मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना. राज्यात **२०४७ पर्यंत 300 कोटी** वृक्ष लागवडीकरिता महत्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम. पायाभूत सुविधा उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी आयोग काम करणार. **(वन विभाग)**

**शासन निर्णय:** (सावहव-2025/प्र.क्र.11/वि-11) **दि.०७.०५.२०२६**

## २०४७ पर्यंत वृक्षलागवडीसाठी उपलब्ध जमीन

| | |
|---|---|
| **९,४८,३१४** | **लागवडीयोग्य वनक्षेत्र (हेक्टरमध्ये)** |
| **२९,००,५५६** | **शासकीय पडीत जमीन (हेक्टरमध्ये)** |

## २०२९ पर्यंतचे लक्ष्य

| | |
|---|---|
| **५७ कोटी रोपे** | **२०२९ पर्यंतची एकूण वृक्षलागवड उद्दिष्ट** |



# अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६

**अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६** हा वनांमध्ये वास्तव्यास असलेल्या अनुसूचित जमाती (Forest Dwelling Scheduled Tribes - **FDST**) तसेच इतर परंपरागत वननिवासी (Other Traditional Forest Dwellers - **OTFD**) यांचे वनजमीन, वनसंसाधने व वनव्यवस्थापनाशी संबंधित हक्कांना कायदेशीर मान्यता प्रदान करणारा ऐतिहासिक कायदा आहे. या अधिनियमाचा उद्देश वननिवासी समुदायांवर झालेल्या ऐतिहासिक अन्यायाचे निवारण करून त्यांना जमीन, वनसंसाधने आणि स्थानिक स्तरावरील वनव्यवस्थापनाशी संबंधित हक्क बहाल करणे हा आहे.

## अधिनियमांतर्गत मान्य करण्यात आलेले प्रमुख हक्क

### १. वैयक्तिक वनहक्क (Individual Forest Rights – IFR)

वनजमिनीवर पारंपरिकरीत्या शेती करणाऱ्या पात्र कुटुंबांना कमाल **४ हेक्टर** क्षेत्रापर्यंत वनजमिनीवरील वैयक्तिक हक्क प्रदान केले जातात. हे हक्क **वारसाहक्काने हस्तांतरित** होऊ शकतात; मात्र ते **विक्रीयोग्य किंवा अन्य व्यक्तीस हस्तांतरणीय नाहीत**.

**मार्च २०२६ अखेर उपलब्ध क्षेत्र :**

**एकूण प्राप्त प्रकारणांपैकी एकूण निकाली काढलेल्या दाव्यांची संख्या: ९८.५५%**

**वाटप केलेल्या टायटल चे एकूण वन क्षेत्र (हेक्टर मध्ये) : १३४६९७.३३**

### २. सामुदायिक वनहक्क (Community Forest Rights – CFR)

ग्रामसमुदायाला **गौण वनोपज संकलन, वापर व विक्री**, **जनावरांच्या चाराईचे हक्क**, तसेच **जलस्रोतांच्या वापराचे हक्क** प्रदान केले जातात.

**मार्च २०२६ अखेर उपलब्ध क्षेत्र :**

**एकूण प्राप्त प्रकारणांपैकी एकूण निकाली काढलेल्या दाव्यांची संख्या: ९७.६८%**

**वाटप केलेल्या टायटल चे एकूण वन क्षेत्र (हेक्टर मध्ये) : १३३९१६०.८१**



# ३.२ वन्यजीव व्यवस्थापन



**०६**

व्याघ्र प्रकल्प अधिसूचित

**व्याघ्र प्रकल्पांमध्ये**

- **०५** राष्ट्रीय उद्याने व
- **१७** अभयारण्ये

**व्याघ्र प्रकल्पाबाहेर**

- **०१** राष्ट्रीय उद्याने व
- **३७** अभयारण्ये
- **२८** संवर्धन राखीव क्षेत्रे

राज्याच्या **३.५८%** भौगोलिक क्षेत्र वन्यजीव संरक्षित क्षेत्राखाली

**०४** व्याघ्र प्रकल्पांमध्ये प्रत्येकी **११२** कर्मचाऱ्यांचे विशेष व्याघ्र संरक्षण दल

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- महाराष्ट्र राज्यात वन विभागात वन्यजीव व्यवस्थापनासाठी एक स्वतंत्र शाखा स्थापित करण्यात आलेली असून सदर शाखेच्या अधिन राज्यातील बहूतेक वन्यजीव संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन करण्यात येत आहे. संरक्षित क्षेत्रबाहेरील वन्यजीव व्यवस्थापनाकरिता संबंधित राज्याचे

- वन्यजीव शाखेचे प्रमुख "प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)" हे मुख्य संयोजक आहेत.

- राज्यात खालील प्रमाणे संरक्षित क्षेत्र अधिसुचित झालेली आहे.

| संरक्षित क्षेत्र प्रकार | संख्या | क्षेत्र (चौ.किमी) |
|---|---|---|
| राष्ट्रीय उद्यान | ६ | १२६९.२७ |
| अभयारण्य | ५४ | ७९४४.५६ |
| संवर्धन राखीव | २८ | १८७७.९१ |
| **एकूण** | **८८** | **११०९१.७४** |

- वरील प्रमाणे राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्राचे ३.५८ % क्षेत्र वन्यजीव संरक्षित क्षेत्राखाली आहे. एकूण वनक्षेत्राचे १५% वन क्षेत्र हे वन्यजीव क्षेत्राखाली आहे.

- वरील वन्यजीव संरक्षित क्षेत्रा पैकी राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य तसेच इतर वनक्षेत्र सामाविष्ट करून खालील प्रमाणे ६ व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती झालेली आहे.

| व्याघ्र प्रकल्पाचे नाव | कोर क्षेत्र (चौ.किमी) | क्षेत्रबफर क्षेत्र चौ.किमी) (चौ.किमी) | एकूण क्षेत्र (चौ.किमी) |
|---|---|---|---|
| **मेळघाट** | १५००.४९ | १२६८.०४ | २७६८.५३ |
| **ताडोबा-अंधारी** | ६२५.८२ | ११०१.७७ | १७२७.५९ |
| **पेंच** | ४३०.१२ | ३११.१० | ७४१.२२ |
| **नवेगाव-नागझिरा** | ६५६.३६ | १२४१.२७ | १८९७.६३ |
| **बोर** | १३८.१२ | ६७८.१४ | ८१६.२६ |
| **सह्याद्री** | ५११.८७ | ५६५.४५ | १०७७.३२ |

**Eco-Sensitive Zone यातील सद्यस्थिती**

| एकूण संरक्षित क्षेत्र | घोषित करावयाचे ESZ | अंतिमतह घोषित | मसूदा अधिसूचित | केंद्रशास नाला सादर | राज्याकडे प्रंलबित |
|---|---|---|---|---|---|
| ६० | ४३ | ३५ | ०० | ०१ | ०७ |

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- राष्ट्रीय स्तरावर दर चार वर्षांनी करण्यात येणारी व्याघ्र प्रगणनेनुसार महाराष्ट्रात वाघाची/बिबट संख्या खालील प्रमाणे आहे.

| प्रगणना वर्ष | २०१८ | २०२२ |
|---|---|---|
| वाघ | ३१२ | ४४४ |
| बिबट | १६९० | १९८५ |

- वाघ/बिबट व्यतिरिक्त महाराष्ट्रात गौर, आस्वल, रानकूत्रे, कोल्हा, लांडगा, खोकड, सांबर, चितळ, निलगाय, रानडूक्कर, चौसिंगा, भेकर इत्यादी अनेक वन्यप्राणी असून पक्षी, सांप व इतर प्रजातीची जैवविविधता राज्याला लाभलेली आहे. मागील काही वर्षा पासून राज्यातील दक्षिण भागात कर्नाटक व गोवा राज्यामधून व राज्यातील पूर्व भागात छत्तीसगढ राज्यामधुन स्थालांतरीत होऊन आलेले रान हत्तींनी आपले आश्रय स्थळ बनविलेले आहे.

**विधान सभेतील प्रश्नातून समोर आलेल्या प्रणालीगत त्रूटी**

- मानव वन्यप्राणी संघर्ष संदर्भात राज्यात बहूतेक भागात प्राथमिक प्रतिसाद दल (PRT), द्रूत प्रतिसाद दल (RRT), बचाव केंद्र (Rescue Centre) ची कमतरता तसेच नियमित पशु वैद्यकिय चिकित्सक यांची कमतरता.
- वन्यजीव संरक्षित क्षेत्रा व्यतिरिक्त इतर वनक्षेत्रातील अधिवास सुधारणा कामातील त्रूटी.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०-१२ महिने (अल्पकालीन): | १२-२४ महिने (मध्यम मुदत): | २४-४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • राज्यात नवीन ८ रेस्क्यू सेंटर प्रस्तावित. मुख्यमंत्री वन व पर्यावरण संवर्धन योजना | • प्रत्येक जिल्हयात व्याघ्र/बिबट सफारी, बचाव केंद्रांची उभारणी. | • भ्रमण मार्ग मजबुती करणे / मुख्यमंत्री वन व वन्यजीव संवर्धन विकास योजना कार्यन्वीत करणे. |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • राज्यात ३ नवीन वाघ व बिबट सफारी स्थापित करणे<br>• वन्यजीव संवर्धनासाठी वन्यजीव निधी तयार करणे.<br>• शिकार प्रतिबंधनासाठी वन्यजीव विशेष कार्य बल (SIT) स्थापित करणे<br>• समुद्री वन्यजीव बाबत अभ्यासासाठी प्रकल्प राबविणे .<br>• पशु वैद्यकिय चिकित्सक संबंधी मंजुर पदावर भरती प्रक्रिया पूर्ण करणे. बोर व्याघ्र प्रकल्पातील ३ गावांची पुर्नवसन प्रक्रिया पूर्ण करणे.<br>• व्याघ्र प्रकल्प क्षेत्राला पर्यावरण संरक्षण अधिनियम अंतर्गत शांतता क्षेत्र घोषित करणे. | • प्रत्येक संरक्षित क्षेत्रात अत्याधुनिक यंत्रणा (अग्नि सुरक्षा, प्राणी सुरक्षा) उभारणे.<br>• व्यवस्थापनसंबंधी संशोधन प्रकल्प राबविणे.<br>• पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर व्याघ्र प्रकल्प व उमरेड-पवनी-क-हाडला अभयारण्य मधील ७ गावांचे पूर्नवसन करणे. | • संरक्षित क्षेत्रातील शिल्लक सर्व गावांचे पूर्नवसन करून संरक्षित क्षेत्राला पूर्णपणे अबाधित करणे.<br>• अस्तित्वात असलेले रेखीय पायाभूत सुविधा वर उपशमन उपाययोजना तयार करणे. (उदा. कालवे/रस्ते/रेल्वे लाईन वर अंडरपास /ओवरपास).<br>• पर्यावरण पुरक वन्यजीव व्यवस्थापना साठी धोरण तयार करणे.<br>• वन्यजीव (संरक्षण ) अधिनियमाच्या तरतूदीनुसार सर्वकष विचार करुन संरक्षित क्षेत्राचे जाळे मजबुत करणे.<br>• राज्याला वन्यजीव व्यवस्थापनात देशातील अग्रणी राज्य म्हणून पुढे आणणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

| | |
|---|---|
| **धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)* | • स्थितीनुरुप वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, महाराष्ट्र वन्यजीव (संरक्षण) नियम, विविध मार्गदर्शक सुचना मध्ये सुधारणा करणे किंवा केंद्र शासनाकडे तशी विनंती करणे<br>• विशेष व्याघ्र संरक्षण दल (STPF) च्या वेतन योग्य वेळी प्राप्त होईल यासाठी पध्दतीत धोरणात्मक सुधारणा करणे. |

| | |
|---|---|
| **तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)* | • AI-आधारित मागोवा पध्दतीचा अवलंब.<br>• ड्रोन, थर्मल कॅमेराद्वारे सर्वेक्षण यंत्रणा उभारणे.<br>• वन्यजीव गुन्हयांच्या प्रकरणांच्या तपासासाठी डिजिटल फॉरेन्सिक तंत्रांचा वापर<br>• GIS-आधारित व्यवस्थापन प्रणाली मजबुत करणे. |

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

**1.**

**प्रकल्पाचे नाव :** **१० नवीन जलद उपचार केंद्र (TTC) उभारणे**
**अंदाजे किंमत :** ५०.०० कोटी


**2.**

**प्रकल्पाचे नाव :** **संरक्षित क्षेत्रातील १० गावाचे पूर्नवसन पूर्ण करणे**
**अंदाजे किंमत :** ५००.०० कोटी






# ३.३ मानव-वन्यजीव संघर्ष व त्यावरील उपाययोजना



## AI Based Alert System

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित वन्यजीव संनियंत्रण (Monitoring), मागोवा व पूर्वसूचना प्रणाली

## ८४९

डिसेंबर २०२५ पासून आढळून आलेल्या वाघ, बिबट व अस्वलांबाबत आलेल्या अलर्ट

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

वन्यजीव हे परिसंस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक असून देशातील जैवविविधता समृद्ध ठेवण्यात त्यांचे अनमोल योगदान आहे. वनात वन्यजीव अनेक नैसर्गिक भूमिका निभावतात व वनाला समृद्ध बनवून ते चिरकाल टिकवून ठेवण्यास मदत करतात. वाघ-बिबटांसारखे सर्वोच्च-भक्षक परिसंस्थेचे आरोग्य दर्शवतात. जैवविविधता टिकवणे, हवामान बदलाचे परिणाम कमी करणे, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे व पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी वन्यप्राण्यांचे संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापन आवश्यक आहे. म्हणूनच राज्याच्या धोरणात या विषयाला प्राधान्य देण्यात आले आहे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

महाराष्ट्र राज्यात वन विभागामध्ये वन्यजीव व्यवस्थापनासाठी एक स्वतंत्र शाखा स्थापन करण्यात आली असून, या शाखेच्या अधीन राज्यातील बहुतेक वन्यजीव संरक्षित क्षेत्रांचे व्यवस्थापन करण्यात येते. संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीव व्यवस्थापनाच्या संदर्भात राज्याच्या वन्यजीव शाखेचे प्रमुख "मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)" हे मुख्य संयोजक आहेत.

**अ. राज्यातील अधिसूचित संरक्षित क्षेत्र**

| संरक्षित क्षेत्र प्रकार | संख्या | क्षेत्र (चौ.किमी) |
|---|---|---|
| राष्ट्रीय उद्यान | ६ | १२६९.२७ |
| अभयारण्य | ५४ | ७९४४.५६ |
| संवर्धन राखीव | २८ | १८७७.९१ |
| एकूण | ८८ | ११०९१.७४ |

राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३.६०% क्षेत्र वन्यजीव संरक्षित क्षेत्राखाली असून, एकूण वनक्षेत्रापैकी १५% वन वन्यजीव क्षेत्राखाली आहे.

**ब. राज्यातील व्याघ्र प्रकल्प (क्षेत्र चौ.किमी)**

| व्याघ्र प्रकल्प | कोर | बफर | एकूण |
|---|---|---|---|
| मेळघाट | १५००.४९ | १२६८.०४ | २७६८.५३ |
| ताडोबा-अंधारी | ६२५.८२ | ११०१.७७ | १७२७.५९ |
| पेंच | ४३०.१२ | ३११.१० | ७४१.२२ |
| नवेगाव-नागझिरा | ६५६.३६ | १२४१.२७ | १८९७.६३ |
| बोर | १३८.१२ | ६७८.१४ | ८१६.२६ |
| सह्याद्री | ५११.८७ | ५६५.४५ | १०७७.३२ |

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

**क. वाघ व बिबट प्रगणना (राष्ट्रीय स्तरावरील दर चार वर्षांची प्रगणना)**

| प्रजाती | सन २०१८ | सन २०२२ | वाढ |
|---|---|---|---|
| **वाघ** | ३१२ | ४४४ | +१३२ (≈४२%) |
| **बिबट** | १६९० | १९८५ | +२९५ (≈१७%) |

वाघ व बिबटाव्यतिरिक्त राज्यात गौर, अस्वल, रानकुत्रे, कोल्हा, लांडगा, खोकड, सांबर, चितळ, नीलगाय, रानडुक्कर, चौसिंगा, भेकर असे अनेक वन्यप्राणी आहेत. राज्याच्या दक्षिण भागात कर्नाटक व गोवा राज्यांमधून, तर पूर्व भागात छत्तीसगडमधून स्थलांतरित झालेल्या रानहत्तींनीही आश्रयस्थळ बनवले आहे.

**राज्यामध्ये मागील वर्षामध्ये मनुष्य हानी, पशु हानी व पिक हानीच्या खालील घटना झाल्या आहेत.**

| वर्ष | मानव हानी | पशु हानी | पिक हानी |
|---|---|---|---|
| **2020-21** | 82 | 3274 | 35100 |
| **2021-22** | 86 | 2771 | 37644 |
| **2022-23** | 111 | 3855 | 41897 |
| **2023-24** | 64 | 7138 | 211618 |
| **2024-25** | 67 | 6484 | 153989 |
| **2025-26** | 91 | 6675 | 61458 |

**महाराष्ट्रातील मानव वन्यजीव संघर्ष मध्ये देण्यात आलेले सानुग्रह अनुदान *(रुपये लाखात मध्ये)***

| वर्ष | मानव हानी | पशु हानी | पिक हानी |
|---|---|---|---|
| **२०२१-२२** | ९७९ | ३८३३ | २२६६ |
| **२०२२-२३** | १६१९ | २५६० | ३१६० |
| **२०२३-२४** | २५४१ | ३२५४ | ३८२५ |
| **२०२४-२५** | १८९९ | १३६७१ | ७०१२ |
| **२०२५-२६** | १७६० | १०९८७ | ६३७० |

**भारत सरकारचे केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण यांच्या तर्फे राज्यामध्ये ८ ठिकाणी रेस्कू सेंटर (बचाव केंद्र) उभारण्याची संमती मिळाली आहे.**

| अ. क्र. | बचाव केंद्राचे नाव | विभाग | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | बिबट बचाव केंद्र, खानापूर | जुन्नर विभाग | पुणे |
| २ | बिबट बचाव केंद्र, न्हावरे | जुन्नर विभाग | पुणे |
| ३ | वाघ बचाव केंद्र, मालडोंगरी, ब्रह्मपुरी | ब्रह्मपुरी विभाग | चंद्रपूर |
| ४ | बिबट बचाव केंद्र, कळंब, आंबेगाव | जुन्नर विभाग | पुणे |

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

### विद्यमान परिस्थिती *(Existing Scenario)*

| अ. क्र. | बचाव केंद्राचे नाव | विभाग | वनवृत्त |
|---|---|---|---|
| ५ | बिबट बचाव केंद्र, पिंपळखेड | जुन्नर विभाग | पुणे |
| ६ | बिबट बचाव केंद्र, सांतवाडी | जुन्नर विभाग | पुणे |
| ७ | बिबट बचाव केंद्र, म्हसरूळ | नाशिक पश्चिम विभाग | नाशिक |
| ८ | बिबट बचाव केंद्र, बरागाव नांदूर | अहिल्यानगर विभाग | नाशिक |

केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण (CZA) यांनी महाराष्ट्र राज्यातील तीन सफारी पार्क (जुन्नर बिबट सफारी पार्क, चंद्रपूर व्याघ्र सफारी पार्क व बारामती सफारी पार्क) प्रस्तावांना मंजुरी प्रदान केली आहे.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

### ०–१२ महिने (अल्पकालीन):

- राज्यात ३ नवीन वाघ व बिबट सफारी स्थापन करणे.
- वन्यजीव संवर्धनासाठी स्वतंत्र वन्यजीव निधी तयार करणे.
- शिकार प्रतिबंधासाठी वन्यजीव विशेष कार्यबल (SIT) स्थापन करणे.
- सागरी वन्यजीवांच्या अभ्यासासाठी प्रकल्प राबविणे.
- पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर पदांवरील भरती प्रक्रिया पूर्ण करणे.
- बोर व्याघ्र प्रकल्पातील ३ गावांची पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करणे.

### १२–२४ महिने (मध्यम मुदत):

- प्रत्येक जिल्ह्यात बचाव केंद्रासह वाघ/बिबट सफारी उभारणे.
- प्रत्येक संरक्षित क्षेत्रात अत्याधुनिक यंत्रणा (अग्नि सुरक्षा, प्राणी सुरक्षा) उभारणे.
- व्यवस्थापनासंबंधी संशोधन प्रकल्प राबविणे.
- राज्यात ५ नवीन बचाव केंद्रे (Rescue Centre) उभारणे.
- पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर व्याघ्र प्रकल्प व उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील ७ गावांचे पुनर्वसन करणे.
- मानव-वन्यजीव संघर्षास "नैसर्गिक आपत्ती" म्हणून अधिसूचित करण्याचा प्रस्ताव
- बिबट्याचा वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ मधील अनुसूची-१ मधून अनुसूची-२ मध्ये समावेश करण्यासाठी आवश्यक कार्यवाही

### २४–४० महिने (दीर्घकालीन):

- भ्रमणमार्ग बळकट करणे / मुख्यमंत्री वन विकास योजना कार्यान्वित करणे.
- संरक्षित क्षेत्रातील शिल्लक सर्व गावांचे पुनर्वसन करून संरक्षित क्षेत्र पूर्णपणे अबाधित करणे.
- अस्तित्वात असलेल्या रेखीय पायाभूत सुविधांवर उपशमन उपाययोजना तयार करणे (उदा. कालवे/रस्ते/रेल्वे मार्गांवर अंडरपास/ओव्हरपास).
- पर्यावरणपूरक वन्यजीव व्यवस्थापनासाठी धोरण तयार करणे.
- बिबट्यांची नसबंदी (Sterilization) व इम्युनो-कॉन्ट्रासेप्टिव्ह प्रायोगिक प्रकल्प

# ३.४ महाराष्ट्र वन विकास महामंडळ (FDCM)



## ०३ कार्यक्षेत्र

- नागपूर
- चंद्रपूर
- नाशिक

## अयोध्या श्रीराम मंदिर, नवीन संसद भवन, भारत मंडपम

यांना FDCM सागवान लाकडाचा पुरवठा.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

**महाराष्ट्र वन विकास महामंडळ** (FDCM) हे महाराष्ट्राच्या जैवविविधता, ग्रामीण उपजीविका आणि हरित अर्थव्यवस्था यांचा कणा आहे. वनसंपत्तीचे शास्त्रीय व्यवस्थापन, मूल्यवर्धित वनउद्योग आणि हवामान बदलास प्रतिरोधक वनीकरण यांमध्ये या संस्थेची अपरिहार्य भूमिका आहे.

महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित (FDCM) ची स्थापना १६ फेब्रुवारी १९७४ रोजी कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत करण्यात आली. सन १९६९ मध्ये स्थापन झालेल्या वन विकास मंडळाच्या संकल्पनेतून या महामंडळाची निर्मिती झाली. आज FDCM हे भारतातील अग्रगण्य राज्य वन महामंडळांपैकी एक असून उत्पादन वनीकरण आणि शाश्वत वन व्यवस्थापनाच्या क्षेत्रात आदर्श संस्था म्हणून ओळखले जाते.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- वनसंपत्तीचे शास्त्रीय व्यवस्थापन व विकास
- सागवान व बांबू यांच्या उच्च दर्जाच्या लागवडीची निर्मिती व संवर्धन
- लाकूड व इतर वनउत्पादनांचे शाश्वत संकलन व विपणन
- ग्रामीण भागात रोजगार व उपजीविकेच्या संधी निर्माण करणे
- पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेचे संरक्षण.
- पर्यावरणपूरक पर्यटन (Eco-Tourism) व निसर्गाधारित मनोरंजनाचा विकास
- शाश्वत वन व्यवस्थापनासाठी जागतिक दर्जाच्या मानकांचा अवलंब (FSC प्रमाणपत्र).

**कार्यक्षेत्र**

- **नागपूर** – विदर्भातील सागवान व बांबू वनक्षेत्र
- **चंद्रपूर** – उत्पादन वनीकरण व औद्योगिक केंद्र
- **नाशिक** – पश्चिम घाटातील जैवविविधता क्षेत्र
- अयोध्या श्रीराम मंदिर, नवीन संसद भवन, भारत मंडपम यांना FDCM सागवान लाकडाचा पुरवठा.
- महाराष्ट्र शासनाला सातत्यपूर्ण नफा व लाभांश वितरण.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • टॉल सिडलिंग रोपवाटिका क्षमतेचे सर्वसमावेशक मूल्यांकन व विस्तार. | • फॉरेस्ट इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, चंद्रपूर – बांधकाम व कार्यान्वयन | • पुणे, नागपूर, मुंबई, ठाणे, नाशिक येथे FDCM चे शोरूम स्थापन करणे. |
| • FSC प्रमाणपत्र नूतनीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापन आराखड्याची अंमलबजावणी सुरू. | • ताडाळी व वाढवण येथे फर्निचर उत्पादन केंद्रांची उभारणी. | • IPO व Green Bonds द्वारे निधी उभारणी. |
| | • शिटाके मशरूम व ऑर्किड्स उत्पादन प्रकल्पाची चाचणी. | • ३०० कोटी वृक्षलागवड अभियानासाठी रोपांचा पूर्ण पुरवठा. |
| • टिश्यू कल्चर प्रयोगशाळेचे बांधकाम व उपकरण संस्थापन. | | |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- महाराष्ट्र शासनाच्या ३०० कोटी वृक्षलागवड अभियानासाठी FDCM रोपवाटिकांमधून मोठ्या आकाराची उच्च दर्जाची उंच रोपे उपलब्ध करणे.
- IPO व Green Bonds द्वारे हरित वित्तपुरवठ्याचे नाविन्यपूर्ण मॉडेल विकसित करणे ₹१०,००० – ११,००० कोटी मूल्याच्या प्लांटेशन मालमत्तेचा प्रभावी उपयोग
- मंजूर दहा वर्षीय व्यवस्थापन आराखड्यानुसार वैज्ञानिक वन व्यवस्थापन कार्यक्रमांची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करणे.
- या हरित संपत्तीचा प्रभावी वापर करून IPO व Green Bonds द्वारे भविष्यातील विस्तार प्रकल्पांसाठी निधी उभारणी प्रस्तावित असून यासाठी मंत्रिमंडळाच्या (Cabinet) मंजुरीची आवश्यकता. प्राप्त निधी वृक्षलागवड, वनाधारित उद्योग, मूल्यवर्धित प्रकल्प व पर्यावरण पर्यटनासाठी वापरला जाणार.

**वनक्षेत्र भरपाई**

- FDCM च्या व्यवस्थापनाखालील लक्षणीय वनक्षेत्र अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने व संरक्षित क्षेत्रांसाठी वन्यजीव शाखेकडे हस्तांतरित करण्यात आले; मात्र त्या बदल्यात समतुल्य वनक्षेत्र उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.
- परिणामी व्यवस्थापनाखालील वनक्षेत्र व महसूल क्षमतेत घट होत आहे. समतुल्य वनक्षेत्र अथवा योग्य भरपाई यंत्रणा विकसित करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

| | |
|---|---|
| *तंत्रज्ञानाधारित उपाययोजना (Technological Interventions* | • आधुनिक जैवतंत्रज्ञानाचा वापर करून टिश्यू कल्चर प्रयोगशाळेद्वारे ऑर्किड्स, औषधी वनस्पती व दुर्मिळ प्रजातींचे व्यावसायिक संवर्धन<br>• अहेरी (आलापल्ली) व बल्लारपूर येथील सॉ-मिलचे आधुनिकीकरण व मूल्यवर्धित लाकूड उत्पादन वाढवणे.<br>• शिटाके मशरूम उत्पादन प्रकल्पाद्वारे ग्रामीण भागात महिला स्वयंसहाय्यता गटांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे |

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1 **प्रकल्पाचे नाव:** फॉरेस्ट इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, चंद्रपूर – स्थापना व
**कालावधी :** २०२५–२०२९
**जबाबदारी :** FDCM

2 **प्रकल्पाचे नाव:** : ताडाळी व वाढवण येथे आधुनिक फर्निचर उत्पादन केंद्रे
**कालावधी :** २०२५–२०२८
**जबाबदारी :** FDCM

3 **प्रकल्पाचे नाव:** चंद्रपूर, पुणे, नागपूर, मुंबई, ठाणे, नाशिक येथे FDCM शोरूम
**कालावधी :** २०२५–२०२९
**जबाबदारी :** FDCM

4 **प्रकल्पाचे नाव:** अत्याधुनिक टिश्यू कल्चर प्रयोगशाळा — ऑर्किड्स व औषधी वनस्पती उत्पादन
**कालावधी :** २०२५–२०२७
**जबाबदारी :** FDCM

5 **प्रकल्पाचे नाव:** शिटाके मशरूम उत्पादन प्रकल्प — ग्रामीण उद्योजकता विकास
**कालावधी :** २०२५–२०२८
**जबाबदारी :** FDCM + महिला स्वयं-सहाय्यता गट

6 **प्रकल्पाचे नाव:** महाराष्ट्र ३०० कोटी वृक्षलागवड अभियानासाठी उंच रोपे रोपवाटिका विस्तार
**कालावधी :** २०२५–२०२९
**जबाबदारी :** FDCM + वन विभाग

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

7 **प्रकल्पाचे नाव :** IPO व Green Bonds द्वारे हरित वित्तपुरवठा – हरित संपत्ती मुद्रीकरण
**कालावधी :** २०२६–२०२९
**अंदाजे किंमत :** १०,०००+ कोटी
**जबाबदारी :** FDCM + वित्त विभाग

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- महाराष्ट्राच्या ३०० कोटी वृक्षलागवड अभियानासाठी उच्च दर्जाच्या उंच रोपांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन व पुरवठा सुनिश्चित करणे
- FDCM ब्रँड अंतर्गत चंद्रपूर, पुणे, नागपूर, मुंबई, ठाणे व नाशिक येथे आधुनिक शोरूम स्थापन; लाकूड, फर्निचर व वनउत्पादने विक्री.
- शिटाके मशरूम उत्पादन प्रकल्पाची अंमलबजावणी; महिला स्वयंसहाय्यता गटांसाठी रोजगार व उद्योजकतेच्या संधी निर्माण करणे.
- मंजूर दहा वर्षीय व्यवस्थापन आराखड्यानुसार पुनरुत्पादन, बांबू व्यवस्थापन, जल व मृदसंवर्धन उपक्रमांची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी.
- फॉरेस्ट इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, चंद्रपूर प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी; रोजगारनिर्मिती व स्थानिक आर्थिक विकासाला चालना.
- टिश्यू कल्चर प्रयोगशाळेचे पूर्ण कार्यान्वयन; ऑर्किड्स, औषधी वनस्पती, दुर्मिळ प्रजातींचे व्यावसायिक उत्पादन व संवर्धन.

# ३.५ उत्पादन वानिकी




**५७,०००**

- चौ.कि.मी. वन विभागाच्या ताब्यातील वनक्षेत्र (१८%)

**६५ – ८५%**

- इमारती लाकूड विक्रीचा वन विभागाच्या महसुलातील वाटा

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्वाचे का आहे** *(Why it matters)*

भारत हा आजही Timber Deficient (इमारती लाकडाची तूट असलेला) देश आहे. वर्ष २०१५ ते २०१९ या कालावधीत देशाला सुमारे १ लाख घ.मी. सागवान इमारती लाकूड आयात करावे लागले. केंद्र शासनाने स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षी — सन २०४७ पर्यंत — सागवान इमारती लाकडासाठी देश स्वयंनिर्भर करण्याचे उद्दिष्ट निर्देशित केले असून संशोधन, संवर्धन, उत्पादन व विपणन या सर्व स्तरांवर प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे.

### देशातील प्रमुख सागवान उत्पादक राज्ये :

मध्यप्रदेश | **महाराष्ट्र** | कर्नाटक | छत्तीसगड | केरळ

### उत्पादन वानिकीचे महत्त्व:

राज्यातील विदर्भ भागात वनक्षेत्रात आढळणारी प्रमुख प्रजाती म्हणजे सागवान होय. सागवान प्रजातीचे वैशिष्ट्य असे की, तिला भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक असतो. त्यादृष्टीने मध्य भारतात स्थित विदर्भ प्रदेशाचे हवामान सागवान उत्पादनासाठी अत्यंत अनुकूल आहे.

तथापि, पुरेसा सूर्यप्रकाश व पाऊस यांमुळे वनक्षेत्रात सागवान रोपांबरोबरच इतर प्रजातींच्या वनस्पतींचीही वाढ होते. त्यामुळे सागवान रोपांना मिळणाऱ्या सूर्यप्रकाशात अडथळा निर्माण झाल्यास त्यांचा विकास खुंटतो आणि अपेक्षित टिंबर उत्पादन होत नाही. यादृष्टीने सागवान रोपवनातील इतर प्रजातींच्या वनस्पतींची शास्त्रोक्त प्रगणनेनुसार वेळोवेळी छाटणी करणे आवश्यक असते.

साग रोपवनाचा जीवनकाळ ८० वर्षांचा असतो. या कालखंडात सुमारे १४ ते १५ वेळा रोपवनाची विरळणी (Thinning) करावी लागते.

### विरळणीच्या कामामुळे होणारे फायदे :

- विदर्भातील दुर्गम वनक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या व वानिकी कामांवर उदरनिर्वाह अवलंबून असणाऱ्या गोरगरीब लोकांना गावाजवळच रोजगाराची संधी मिळते.
- साग रोपवनापासून प्राप्त होणाऱ्या टिंबर उत्पादनात भरीव वाढ होते.
- निष्कासित मालाच्या विक्रीतून शासनास महसूल प्राप्त होतो.
- निष्कासित मालाची विक्री नंतर त्याचे दुय्यम रुपांतरण आणि मुल्य वृद्धि (secondary conversion and value addition) मुळे आर्थिक घडामोडींना (Economic activities) ला भर मिळते.
- जमिनीवर अधिक प्रमाणात सूर्यप्रकाश पोहोचत असल्याने गवत उत्पादन होते, त्यामुळे तृणभक्षी प्राण्यांचा अधिवास विकसित होतो आणि परिणामतः वाघासारख्या दुर्मीळ वन्यप्राण्यांसाठी पोषक अधिवास तयार होतो. थोडक्यात, उत्पादन वानिकीबरोबरच वन्यजीव संवर्धनही आपोआप होत असते.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

सध्या विदर्भात प्रामुख्याने **गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, यवतमाळ** तसेच अमरावती जिल्ह्यातील मेळघाट वनक्षेत्रात साग रोपवनापासून टिंबर उत्पादनाची कामे केली जातात. निष्कासित लाकूड माल विक्रीसाठी विक्री आगारावर आणला जातो. इमारती लाकूड नाशवंत असून ते आगारावर निसर्गाच्या प्रभावाखाली उघड्यावर राहते; तसेच मध्य प्रदेश व छत्तीसगडमधील उत्पादनामुळे बाजारपेठेत तीव्र स्पर्धा असते. लाकूड-निर्मित उत्पाद कार्बन स्थिरीकरणास (carbon sequestration) सहाय्यक ठरतात. वर्ष २०१६-१७ पासून वनोपजाची विक्री ई-लिलाव पद्धतीने केली जाते, **मात्र मागील २-३ वर्षांत इमारती लाकडाची बाजारपेठ घसरत असल्याचे दिसून येते.**

| ~७३,००० | ~१,००,००० | ~१,३०,००० |
|---|---|---|
| घन मीटर | घन मीटर | घन मीटर |
| सागवान इमारती लाकूड | सागेतर इमारती लाकूड | जळाऊ लाकूड |

मागील ५-६ महिन्यांत वैश्विक परिस्थितीमुळे उत्पादनाच्या बाजारभावावर विपरीत परिणाम झाला आहे. या अविक्रीत मालाची विक्री करणे हे वन विभागासाठी मोठे आव्हान असून क्षेत्रीय पातळीवर त्यासाठी कसोशीने प्रयत्न सुरू आहेत.

**विधानसभेतील प्रश्नांतून समोर आलेल्या प्रणालीगत त्रुटी.** *(Challenges)*

वानिकी कामांसाठी वेळेवर अनुदान उपलब्ध न झाल्याने कार्य आयोजनेशी निगडित कामे पूर्ण करण्यात अडचणी येतात. साग रोपवनाची कामे पूर्णतः कालबद्ध स्वरूपाची असतात — कोणत्याही टप्प्यावर विलंब झाल्यास रोपवन यशस्वी होत नाही.

### साग रोपवनाची कालबद्धता — एक उदाहरण

- **साग बियाणे संकलन** — लागवडीच्या सुमारे अडीच वर्षे आधी करावे लागते.
- **बियांचे संस्करण** — ३ ते ४ महिने लागतात.
- **साग जडी तयार करणे** — बियांपासून जडी तयार होण्यास सुमारे दीड वर्ष लागते.
- **लागवड, निंदणी व नियमित विरळणी** — ही कामे रोपवनाच्या संपूर्ण ८० वर्षांच्या जीवनकाळात सुरू राहतात.

### अभिसरण (Convergence) प्रणालीतील व्यावहारिक अडचणी

मागील २–३ वर्षांपासून वनीकरणाची कामे अभिसरण (Convergence) प्रणालीद्वारे केली जात असून अर्थसंकल्पीय अनुदान उपलब्ध नाही. वेळेवर मजूर उपलब्ध न झाल्याने साग रोपवनाची कामे विहित मुदतीत पूर्ण होत नाहीत. साग रोपवन व कार्य आयोजनासाठी वन विभागास अर्थसंकल्पीय निधीतून थेट अनुदान उपलब्ध करण्या बाबत उपाययोजना.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • अविक्रीत इमारती व जळाऊ लाकडापैकी किमान **२५%** मालाची विक्री करणे. | • अविक्रीत इमारती व जळाऊ लाकडापैकी किमान **५०%** मालाची विक्री करणे. | • उर्वरित **संपूर्ण** अविक्रीत इमारती व जळाऊ मालाची विक्री करणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- कार्य आयोजनाशी निगडित व विशेषतः साग रोपवनाच्या कामांसाठी मनरेगा (MGNREGS) सारख्या Demand Driven योजनांवर अवलंबून न राहता वन विभागासाठी उपलब्ध **अर्थसंकल्पीय तरतुदीतून अनुदान** उपलब्ध करावे.

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)*

- प्रचलित **e-Auction** पद्धत कायम ठेवणे.
- **AI-आधारित** साधनांद्वारे बाजारपेठ विश्लेषण करून तत्पर विक्री.
- खरेदीदार व व्यापाऱ्यांशी सातत्यपूर्ण संवाद साधून अविक्रीत मालाचा लिलाव पूर्ण करणे.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

TARGET
**२०२९**

**२०२९ पर्यंतचे उद्दिष्ट**

सध्या विक्रीसाठी शिल्लक राहिलेल्या संपूर्ण लाकूड मालाची लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे व अविक्रीत साठा निकाली काढणे.

## विरळणी (Thinning) :

वनपिकातील (Stand) निवडक झाडे शास्त्रोक्त पद्धतीने काढून उर्वरित झाडांच्या गुणवत्तापूर्ण वाढीसाठी आवश्यक मोकळी जागा उपलब्ध करून देण्याची वनसंवर्धनात्मक प्रक्रिया.

## फायदे :


**उर्वरित वृक्षांच्या वाढीस चालना मिळून उच्च प्रतीचे इमारती लाकूड (Timber) उत्पादन होते.**

**वनोत्पादनाचे शाश्वत व्यवस्थापन साध्य होत असून विरळणीतून प्राप्त गौण उत्पन्नाबरोबरच भविष्यातील अंतिम उत्पन्नात वाढ होते.**

**निकृष्ट, रोगग्रस्त व अविकसित वृक्ष काढून टाकल्यामुळे वनपिकाचे आरोग्य, स्थैर्य व उत्पादकता सुधारते.**




**विरळणीपूर्वी**




**विरळणीनंतर**



पांढरी चिपी
*(Sonneratia alba)*

# ३.६ कांदळवन संवर्धन



**११,३९२**
**हेक्टर**

कांदळवन क्षेत्र आरक्षित वन म्हणून अधिसूचित करण्यात आले असून, किनारी परिसंस्थांच्या कायदेशीर संरक्षणास बळकटी प्राप्त झाली आहे.

**पांढरी चिपी**

*(Sonneratia alba)*
महाराष्ट्राचा राज्य कांदळ वृक्ष

## **धोरणात्मक पार्श्वभूमी** *(Strategic Context)*

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters):*

कांदळवने ही अत्यंत महत्त्वाची ब्ल्यू कार्बन परिसंस्था असून इतर अनेक परिसंस्थांच्या तुलनेत अधिक प्रमाणात कार्बन शोषून दीर्घकाळ साठवून ठेवण्याची क्षमता त्यांच्यात आहे. किनारपट्टीचे संरक्षण, समृद्ध जैवविविधतेचे संवर्धन, स्थानिक समुदायांसाठी शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे तसेच हवामान बदलाच्या दुष्परिणामांना तोंड देण्यासाठी परिसंस्थेची प्रतिरोधक क्षमता वाढविणे यामध्ये कांदळवनांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आणि बहुआयामी आहे. महाराष्ट्रातील एकूण वनक्षेत्रापैकी कांदळवनांचे क्षेत्रफळ केवळ ०.५० टक्के इतके मर्यादित आहे. त्यामुळे ही परिसंस्था अत्यंत संवेदनशील आणि पर्यावरणीयदृष्ट्या मौल्यवान असल्याने तिचे प्रभावी संरक्षण, संवर्धन आणि शाश्वत व्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- महाराष्ट्र हे स्वतंत्र कांदळवन कक्ष (2012) आणि कांदळवन प्रतिष्ठान (2015) असलेले देशातील एकमेव राज्य आहे.
- **११,३९२ हेक्टर** कांदळवन क्षेत्र राखीव वन म्हणून अधिसूचित.
- सध्या कांदळवन कक्षाच्या अखत्यारित सात किनारी जिल्ह्यांमध्ये एकुण **२७,४६९ हेक्टर कांदळवन क्षेत्र आहे.**
- **२,७२७ हेक्टर अवनत कांदळवन** क्षेत्राचे आतापर्यंत पुनरुज्जीवन.
- मँग्रोव्ह सुरक्षा ॲपद्वारे तंत्रज्ञानाधारित कांदळवनांचे संवर्धन.
- भारतीय वन सर्वेक्षण अहवाल २०२३ नुसार कांदळवन आच्छादन क्षेत्रात (Cover) **१२.३९ चौ.कि.मी. वाढ.** राज्याचे एकुण कांदळवन आच्छादन क्षेत्र सुमारे ३१५ चौ.कि.मी.
- **राज्य कांदळवन वृक्ष** म्हणून पांढरी चिपी (Sonneratia alba) घोषित.
- २८१ किनारी गावांमध्ये शाश्वत उपजिविका उपक्रम.
- कांदळवन कार्यक्षेत्रात मालवण सागरी अभयारण्य व ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य अधिसूचित.
- ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य क्षेत्र तीन महानगरांच्या मध्ये वसलेले भारतातील एकमेव जागतिक स्तरावरील रामसार स्थळ आहे. (2022 मध्ये घोषित)



## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

| | |
|---|---|
| **विधानसभेतील प्रश्नांतून समोर आलेल्या प्रणालीगत त्रुटी.**<br>*(Assembly questions derived systemic gaps)* | • **किनारी परिसंस्था संरक्षणातील आव्हाने.**<br>• कांदळवन जमिनीच्या वापरातील मानवी दबाव<br>• कांदळवन क्षेत्रांतील होणारी अतिक्रमणे.<br>• प्रदूषण, अवैध भराव व कचरा व्यवस्थापनातील त्रुटीमुळे कांदळवनांचा होणारा ऱ्हास.<br>• स्थलांतरित पक्ष्यांच्या अधिवासांचा ऱ्हास.<br>• सागरी व किनारी प्रदूषणांमुळे सागरी प्राण्यांच्या मृत्यू प्रतिबंधासाठी उपाययोजनांची गरज.<br>• सागरी प्राण्यांच्या मृत्यू प्रतिबंधासाठी उपाययोजनांची गरज. |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • राष्ट्रीय स्तरावरील कांदळवन संवर्धन विषयी सर्वोत्तम पद्धतींच्या आदानप्रदानासाठी मुंबई येथे राष्ट्रीय मॅन्ग्रोव्ह परिषदेचे आयोजन.<br>• अवनत झालेल्या कांदळवन क्षेत्रांचे पुनर्स्थापन व लागवड कार्यक्रम राबविणे.<br>• संवेदनशील किनारी भागांचे सर्वेक्षण करून प्रदूषण व कचरा साचणाऱ्या ठिकाणांची ओळख पटविणे.<br>• स्थानिक स्वराज्य संस्था, मत्स्यव्यवसाय विभाग व स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयाने नियमित स्वच्छता मोहिमा राबविणे.<br>• स्थलांतरित पक्ष्यांच्या महत्त्वाच्या अधिवासांची नोंदणी व निरीक्षण व्यवस्था विकसित करणे. | • कांदळवन क्षेत्रांतील बेकायदेशीर घनकचऱ्याची प्रत्यक्ष स्थळपडताळणी करून त्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेऊन प्रभावी व्यवस्थापन करणे.<br>• स्थलांतरित पक्ष्यांसाठी महत्वाच्या अधिवासांमध्ये संरक्षणात्मक उपाययोजना व मानवी हस्तक्षेपाचे नियमन करणे.<br>• मत्स्यव्यवसाय समुदायासाठी शाश्वत मासेमारी व सागरी संवर्धन विषयक प्रशिक्षण आयोजित करणे.<br>• सागरी प्रदूषणाचे स्रोत ओळखून संबंधित विभागांच्या समन्वयाने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे.<br>• महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर हरित समुद्र कासव आणि हंपबॅक डॉल्फिनचे सॅटेलाइट टॅगिंग योजना राबविणे. | • किनारी परिसंस्था व्यवस्थापनासाठी एकात्मिक व बहुविभागीय व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे.<br>• मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कांदळवन क्षेत्रांचे तंत्रज्ञानाधारित (GIS, ड्रोन, मोबाईल ॲप) सतत निरीक्षण व मूल्यांकन करणे.<br>• राज्यातील २८१ किनारी गावांमध्ये समुदाय-आधारित शाश्वत उपजीविका उपक्रमांचे बळकटीकरण करून स्थानिक समुदायांचे आर्थिक सक्षमीकरण, कौशल्यविकास, बाजारपेठेशी जोडणी आणि पर्यावरणपूरक उत्पन्ननिर्मिती करणे.<br>• स्थलांतरित पक्षी व सागरी जीव संवर्धनासाठी दीर्घकालीन संशोधन व मॉनिटरिंग कार्यक्रम विकसित करणे. |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • किनारी गावांमध्ये जनजागृती अभियान, शाळा-महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.<br>• सागरी प्राण्यांच्या मृत्यूच्या घटनांसाठी तात्काळ प्रतिसाद यंत्रणा (Rapid Response Mechanism) कार्यान्वित करणे. | • अशासकीय संस्थाना दिलेल्या निधीमधून प्रलंबित/चालू संशोधन प्रकल्प पूर्ण करणे<br>• सिंधुदुर्ग किनारपट्टीवर प्रवाळ पुनर्संचयन योजना राबविणे.<br>• M-shore, MISTI, NCM 2.0 इत्यादि योजनेखालील प्रस्तावित कामे सुरु करणे<br>• कांदळवन क्षेत्राची स्वतंत्र कार्य आयोजना (वर्किंग प्लान) तयार करणे<br>• न्यायालयीन निर्णयानुसार इतर शासकीय यंत्रणांकडे असलेले कंदळवन क्षेत्र ताब्यात घेणे | • किनारी जिल्ह्यात पप्रत्येकी दोन कांदळवन निसर्ग उद्याने (Mangrove Parks) उभारणे.<br>• मुंबई-ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किनारी जिल्ह्यांमध्ये कासव उपचार व संक्रमण केंद्रे (Turtle Treatment & Transit Centres) स्थापन करणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- खाजगी कांदळवन जमिनींवरील गुन्ह्यांविरुद्ध/वृक्षतोडी विरुद्ध कारवाई करण्यासाठी वन अधिकाऱ्यांना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ आणि महाराष्ट्र (शहरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ अन्वये उचित अधिकार प्राप्त होण्यासाठी धोरणात्मक बाबी.
- खाजगी कांदळवन जमिनींच्या संपादनासाठी एक सर्वसमावेशक धोरण प्रस्तावित करणे. यामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या २००५ निर्देशानुसार महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ अन्वये किंवा टीडीआर/ ग्रीन टीडीआर कार्यपद्धतींचा समावेश.
- किनारपट्टीलगतच्या सागरी पाण्यापर्यंत कांदळवन कक्षाचे सागरी वन्यजीव संवर्धन व संरक्षणाचे अधिकारक्षेत्र विस्तारित करण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक धोरणात्मक आराखडा तसेच प्रभावी संस्थात्मक यंत्रणा विकसित करणे.

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)*

- AI, जिओस्पेशिअल (Geospatial), लिडार (Lidar) आणि ड्रोन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कांदळवन क्षेत्रांमधील अतिक्रमणांवर रिअल-टाइम देखरेख करणे.
- खड्यामधील सांडपाणी, तसेच रासायनिक आणि घनकचरा विसर्जनाच्या समस्यांच्या उपाययोजनेवर आधारित तंत्रज्ञान विकसित करणे.
- महाराष्ट्र राज्यातील कांदळवनांच्या 'कार्बन क्रेडिट' क्षमतेचा अभ्यास करणे.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1. **प्रकल्पाचे नाव: कांदळवन क्षेत्रांच्या प्रभावी संरक्षणासाठी आवश्यकतेनुसार संरक्षक भिंती व चेन-लिंक फेन्सिंग उभारणी**
   कालावधी : २०२६-२०२९
   अंदाजे लांबी : १० किमी

2. **प्रकल्पाचे नाव: अवनत झालेल्या कांदळवन क्षेत्रांचे पुनर्स्थापन व लागवड कार्यक्रम राबविणे**
   कालावधी : २०२६-२०२९
   अंदाजे क्षेत्र : ५२४ हेक्टर

3. **प्रकल्पाचे नाव: दहिसर, ऐरोली आणि घणसोली कांदळवन उद्यानाची स्थापना**
   कालावधी : २०२६-२०२९

4. **प्रकल्पाचे नाव: सिंधुदुर्ग किनारपट्टीवर प्रवाळ पुनर्संचयन**
   कालावधी : २०२६-२०२९
   अंदाजे क्षेत्र : १४ हेक्टर

5. **प्रकल्पाचे नाव: उभादांडा, वेंगुर्ला येथे मल्टीस्पेसिज हॅचरी निर्मिती**
   कालावधी : २०२६-२०२९

6. **प्रकल्पाचे नाव: मुंबई-ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किनारी जिल्ह्यांमध्ये कासव उपचार आणि संक्रमण केंद्रे (टीटीसी) ची स्थापना.**
   कालावधी : २०२६-२०२९

7. **प्रकल्पाचे नाव: महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर ग्रीन सी टर्टल्स आणि हंपबॅक डॉल्फिनचे सॅटेलाइट टॅगिंग**
   कालावधी : २०२६-२०२९

8. **प्रकल्पाचे नाव: मुंबई महानगर प्रदेशातील संवेदनशील खारफुटी भागात सीसीटीव्ही बसवणे**
   कालावधी : २०२६-२०२९
   सीसीटीव्ही संख्या : ६६९

9. **प्रकल्पाचे नाव: LiDAR आणि सखोल शिक्षण तंत्रज्ञान वापरून कांदळवनांच्या सीमांचे मॅपिंग आणि सीमांकन आणि कांदळवनांच्या आवरणाचे विश्लेषण**
   कालावधी : २०२६-२०२९

10. **प्रकल्पाचे नाव: कार्बन स्तर मोजणी निष्कर्ष आणि कार्बन क्रेडिट बाबत प्रस्ताव**
    कालावधी : २०२६-२०२९

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- संरक्षक भिंती व चेन-लिंक फेन्सिंगद्वारे १० किमी लांबी मधील कांदळवन क्षेत्राचे संरक्षण होऊन अतिक्रमण व मानवी हस्तक्षेपात घट होईल.
- ५२४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे पुनर्स्थापन व लागवड करून ७०–८०% रोपांचे अस्तित्व सुनिश्चित होईल व जैवविविधता वाढेल.
- दहिसर, ऐरोली व घणसोली येथे कांदळवन उद्यानांमुळे पर्यावरणीय जागरूकता, पर्यावरण-पर्यटन व सामुदायिक सहभागाला चालना मिळेल.
- सिंधुदुर्ग येथे १४ हेक्टर प्रवाळ पुनर्संचयनामुळे प्रवाळभित्तीचे आरोग्य, सागरी जैवविविधता व हवामान अनुकूलन क्षमता वाढेल.
- उभादांडा, वेंगुर्ला येथील बहु-प्रजाती मत्स्यबीज केंद्रामुळे मत्स्यसंपदा संवर्धन व किनारी समुदायांच्या उपजीविकेला बळ मिळेल.
- १९६ संवेदनशील कांदळवन क्षेत्रांमध्ये ६५० हून अधिक सीसीटीव्हीमुळे अतिक्रमण व बेकायदेशीर कारवायांवर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल.
- ४ कासव उपचार व संक्रमण केंद्रांमुळे जखमी सागरी कासवांचे उपचार, पुनर्वसन व संरक्षण अधिक प्रभावी होईल.
- ५ हिरव्या सागरी कासवांचे आणि हंपबॅक डॉल्फिनचे सॅटेलाइट टॅगिंग, ज्यामुळे त्यांच्या हालचालींचा रिअल-टाइम मागोवा घेणे आणि अधिवासाच्या वापराचा अभ्यास करणे शक्य होईल.
- LiDAR व डीप लर्निंग आधारित सीमांकनामुळे खारफुटी क्षेत्रांचे अचूक मॅपिंग होऊन अतिक्रमण प्रतिबंध व विज्ञानाधारित व्यवस्थापन सुलभ होईल.
- किनारी संशोधन प्रकल्पात वाढ तसेच उपयुक्त माहितीत भर.
- कांदळवन कार्य आयोजना तयार होणे



# ३.७ निसर्ग पर्यटन



**५७५**

पर्यटन विकास आराखड्यांना कार्यकारी समितीची मंजुरी.

**१५३**

पर्यटन प्रकल्पांसाठी निधी वाटप.

**१०० नवीन व ५३ सुरू** असलेल्या पर्यटन स्थळांच्या विकासास मंजुरी.

**२००.०० कोटी** रुपयांचा नियत व्यय (२०२५–२६).

पर्यटकांची संख्या व पर्यटन महसूल सातत्याने वाढत आहे.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्वाचे का आहे** *(Why it matters)*

- निसर्ग पर्यटनामुळे वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यास प्रोत्साहन मिळते.
- यामुळे स्थानिक समुदायांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होते. तसेच मानव-वन्यजीव संघर्ष ने उद्भवनारी समस्या यामुळे स्थानिक लोकांमध्ये वनविभागाबाबत रोष निर्माण होतो. परंतु निसर्ग पर्यटनामुळे हा रोष कमी करता येवू शकते.
- पर्यटकांना निसर्गाच्या सानिध्यात शांतता, शुद्ध हवा आणि जीवनदायनी अनुभव मिळतो.
- शाश्वत विकासाच्या दृष्टीने निसर्ग पर्यटन हे पर्यावरणपूरक आणि उत्तरदायित्वाचे भान देणारे साधन आहे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- वर्ष निहाय मंजूर केलेल्या प्रस्तावांची संख्या:-कार्यकारी समितीद्वारे आता पर्यंत 575 आराखडे मंजूर करण्यात आलेले आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये खालील प्रमाणे आराखड्यांना मान्यता देण्यात आलेली आहे.
- राज्यातील निसर्ग पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे व त्या प्रमाणे महसूलही वाढत असलेला दिसून येतो.
- सन 2025-26 मध्ये एकूण नियत व्यय रुपये 200.00 कोटी असून रुपये ७५३.९० कोटींचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी रुपये १४५.७५ कोटींच्या प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. सदर निधी १५३ प्रकल्पांसाठी वाटप करण्यात आलेला आहे. ज्यापैकी ५३ सुरु असलेले व १०० नवीन पर्यटन स्थळे आहेत.

**निसर्ग पर्यटन म्हणजे काय?**

निसर्ग पर्यटन म्हणजे नैसर्गिक स्थळांचा, वन्यजीवांचा व पर्यावरणाचा आनंद घेताना त्याचे संरक्षण करणारा प्रवास. यामुळे पर्यावरण सजगता वाढते, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते आणि निसर्गसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन होते. तसेच, हे पर्यटन मानव आणि निसर्ग यांच्यातील समतोल राखण्यास मदत करते. निसर्ग पर्यटनामुळे स्थानिकांना पर्यटन मार्गदर्शक, हॉटेल, वाहतूक, हस्तकला व वनोपज विक्री यासारख्या क्षेत्रांत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात.

**विधानसभेतील प्रश्नांतून समोर आलेल्या प्रणालीगत त्रुटी.** *(Challenges)*

- क्षमता व पर्यावरणीय मुल्य नसलेल्या निसर्ग पर्यटन स्थळावर विकास कामे करणे
- पर्यावरण मूल्य नसलेले स्थळाची निवड करून पर्यटन विकासाची कामे करणे

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०-१२ महिने (अल्पकालीन): | १२-२४ महिने (मध्यम मुदत): | २४-४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • निसर्ग पर्यटन स्थळाची जास्तीत जास्त निर्मीती करणे व आराखडयांना मंजूर देणे.<br>• गिरीभ्रमण नियमावली तयार करणे.<br>• होम स्टे करीता आधारभुत प्रमाणीत कार्यपध्दती (SOP) तयार करणे.<br>• प्लास्टिक मुक्त निसर्ग पर्यटनाकरिता (Plastic Free Ecotourism) मार्गदर्शक सुचना तयार करणे.<br>• पर्यावरण पुरक डिझाईन व स्थानिक साहित्य वापराबाबत मार्गदर्शक सुचना तयार करणे.<br>• महाराष्ट्र निसर्ग पर्यटन धोरण 2025 तयार करणे. | • सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) चा आदर्श नमुना तयार करणे.<br>• महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ करीता अद्यावत व विस्तृत अशी संकेत स्थळ (Website) तयार करणे.<br>• महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकरीता "निसर्ग पर्यटन प्रतिष्ठान" तयार करणे. | • महाराष्ट्र राज्य करीता निसर्ग पर्यटनाचा परिप्रेक्ष्य (Perspective Plan) आराखडा तयार करणे<br>• Jungle, Lodges & resorts, Karnataka च्या धर्तीवर महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकरीता अंतर्गत उपकंपनी स्थापन करणे |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

| | |
|---|---|
| **धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)* | • राज्य निसर्ग पर्यटन धोरण- 2008 लागू झाल्यानंतर केंद्र शासनाचे निसर्ग पर्यटन धोरण- 2018 ला जाहीर केले आहे. त्याच धर्तीवर राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण- 2025 चे प्रारूप तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत होती. दरम्यान केंद्र शासनाचे National Strategy For Ecotourism दिनांक 29/04/2022 ला प्रसिद्ध झाले. मात्र, कालपरत्वे निसर्ग पर्यटनात होत गेलेला बदल तसेच केंद्र शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुरूप असे राज्याचे नवीन निसर्ग पर्यटन धोरणाची आवश्यकता असल्याने 2025 च्या प्रारूपात आवश्यक बदल करून नवीन धोरण जाहिर करण्याची कार्यवाही सुरू आहे. |

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technology interventions)*

- पर्यटकांसाठी सफारी बुकिंग सोपे होण्याकरिता QR कोड निर्माण करून देणे
- अद्यावत अशी ग्राफिकली इन-बिल्ट वेबसाइट तयार करणे

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1. **प्रकल्पाचे नाव : अद्यावत अशी ग्राफिकली इन-बिल्ट वेबसाइट तयार करणे**
   कालावधी : 2026-27 ते 2028-29
   अंदाजे किंमत : 50.00 लक्ष
   जबाबदारी : महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर


2. **प्रकल्पाचे नाव : महाराष्ट्र राज्य करीता निसर्ग पर्यटनाचा परिप्रेक्ष्य (Perspective Plan) आराखडा तयार करणे**
   कालावधी : 2026-27 ते 2028-29
   अंदाजे किंमत : 20.00 लक्ष
   जबाबदारी : महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

3. **प्रकल्पाचे नाव : महाराष्ट्र राज्यात जिल्हा स्तरावर कमीत कमी एक निसर्ग निर्वाचन केंद्र व विद्यार्थ्यांकरीता कँपीग साईट विकसीत करणे**
   कालावधी : 2026-27 ते 2028-29
   अंदाजे किंमत : 2400.00 लक्ष
   जबाबदारी : महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर व संबंधीत विभागस्तरीय यंत्रणा

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाने स्थानिक रोजगार वाढेल व संवर्धनास निधी मिळेल
- अद्यावत वेबसाइटमुळे पारदर्शक बुकिंग, कार्यक्षम प्रशासन व सुलभ पर्यटक अनुभव.
- परिप्रेक्ष्य आराखड्यामुळे शाश्वत विकास, प्राधान्यक्रम व गुंतवणूक नियोजन सुनियोजित होणे.
- निसर्ग निवास व विद्यार्थी कॅम्पिंगमुळे पर्यावरण शिक्षण, जनजागृती व युवापिढीतील संवर्धन बुद्धी विकसित होणे.

# ३.८ महाराष्ट्र बांबू विकास मंडळ



*महाराष्ट्र राज्यात शेतजमीनीवर भरीव बांबू लागवडीस प्रोत्साहन देणे तसेच सुक्ष्म लघु व मध्यम (MSME) स्वरुपाचे बांबू मुल्यवर्धन प्रकल्पास प्रोत्साहनपर अनदुान दणे.*

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्वाचे का आहे** *(Why it matters)*

महाराष्ट्रातील बांबू क्षेत्राचे विकासाकरीता सुरु करण्यात आलेली ही एकमेव व अग्रणी संस्था आहे. बांबू क्षेत्राचा सर्वांगिण विकास करणे, बांबूच्या चांगल्या व उच्च दर्जाची बांबू रोपे वाजवी दरात उपलब्ध करुन देणे, शेतक-यांचे पूरक उत्पन्न वाढविणे, बांबूचा कच्चा माल उद्योगाकरीता वाढविणे.

बांबू उत्पादन व उद्योग वाढीसाठी सर्व संबंधीतामध्ये परस्पर हितवाहक संबंधाचे बळकटीकरण करणे, राज्यात उत्पादीत होणा-या बांबुच्या दर्जात व उत्पादनात भरीव वाढ करणे, बांबू आधारीत पारंपारिक व आधुनिक उद्योगासाठी उद्योजकांना प्रोत्साहन देणे, बांबू संदर्भात प्रदर्शने, परिसंवाद, चर्चासत्र आयोजीत करणे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- बांबू मंडळाचे स्थापने पासून आतापर्यंत 22661 लाभार्थी शेतक-यांच्या माध्यमातुन जवळपास 55000 एकर क्षेत्रावर बांबू लागवड करण्यात आलेली आहे.
- सन 2026 चे पावसाळ्यात बांबू लागवड करण्याकरीता अंदाजे 30000 अर्ज प्राप्त झालेले आहेत. सन 2026 चे पावसाळ्यात जवळपास 1 लक्ष एकर खाजगी क्षेत्रात बांबू लागवड करण्यात येत आहेत.
- राष्ट्रीय बांबू अभियानाच्या भांडवली गुंतवणुक अनुदान योजनेतुन 31 बांबू आधारीत उद्योजकांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आलेले आहे.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • सन 2026-27 मध्ये 1 लक्ष एकर खाजगी क्षेत्रावर बांबू लागवड करणे.<br>• सन 2026-27 मध्ये 10 बांबू आधारीत उद्योजकांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येईल. | • सन 2027-28 मध्ये 1 लक्ष एकर खाजगी क्षेत्रावर बांबू लागवड करणे.<br>• सन 2027-28 मध्ये 12 बांबू आधारीत उद्योजकांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येईल. | • 2029 पर्यंत 3.00 लक्ष एकर खाजगी क्षेत्रावर बांबू लागवड करणे व 32 बांबू आधारीत उद्योग स्थापित करणे.<br>• अधिकाधीक शेतक-यांपर्यंत अटल बांबू समृध्दी योजना व राष्ट्रीय बांबू अभियान या योजने अंतर्गत खाजगी क्षेत्रावर बांबू लागवड करण्यास प्रोत्साहन देणे.<br>• मुल्यवंर्धन साखळी तयार करणे व बांबू क्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे. |


## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

| | |
|---|---|
| **धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)* | राष्ट्रीय बांबू अभियानाच्या (केन्द्र पुरस्कृत योजना) भांडवली गुंतवणुक अनुदान योजनेच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत बांबू आधारीत उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी नविन योजना सुरु करणे. |
| **तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technology interventions)* | Geographic information system (GIS), कृषि मॅपर तसेच सॅटलाईट इमेजरीचा वापर करुन बांबू लागवडीचे नियोजन व नियंत्रण करणे. |

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*


- खाजगी क्षेत्रात बांबू कच्चा मालाची उपलब्धता वाढवणे.
- शेतक-यांचे उत्पन्नात वाढ करणे.
- बांबू उद्योगांना चालना देणे.
- पर्यावरणाचे प्रदुषण कमी होण्यास मदत.
- प्लॉस्टीकला पर्याय म्हणून बांबू आधारीत वस्तुचा उपयोग वाढवणे.





# ३.९ जैवविविधता मंडळ



## २८,६४९

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जैवविविधता व्यवस्थापन समित्या (BMC) स्थापन करून सर्व समित्यांसाठी लोक जैवविविधता नोंदवह्या (PBR) तयार करण्यात आल्या आहेत.

## ₹१२.५ कोटी

विविध जैवविविधता व्यवस्थापन समित्यांच्या (BMC) खात्यांमध्ये थेट वर्ग.

## ५

जैवविविधता वारसा स्थळे महाराष्ट्रात अधिसूचित.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्त्वाचे का आहे:** *(Why it matters)*

- महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ (MSBB) ही जैविक विविधता अधिनियम, २००२ अंतर्गत स्थापन करण्यात आलेली राज्यातील प्रमुख वैधानिक संस्था असून, राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण, संवर्धन आणि शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी कार्य करते.
- महाराष्ट्रातील वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव, त्यांच्या अधिवासांचे तसेच पारंपरिक ज्ञानाचे जतन करण्यामध्ये मंडळाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.
- स्थानिक स्तरावर जैवविविधता व्यवस्थापन समित्या (BMC) स्थापन करणे आणि लोक जैवविविधता नोंदवह्या (PBR) तयार करून जैवसंपदेचे दस्तऐवजीकरण करणे हे मंडळाचे एक महत्त्वाचे कार्य आहे.
- जैविक संसाधनांच्या व्यावसायिक वापरातून मिळणाऱ्या लाभांचे स्थानिक समुदायांमध्ये योग्य व समन्यायी वाटप (ABS) होईल यासाठी मंडळ प्रयत्नशील असते. तसेच,देवराई, दुर्मिळ व धोकाग्रस्त प्रजाती आणि इतर महत्वपूर्ण परिसंस्थांच्या संरक्षणासाठी विविध उपक्रम राबविते. जैवविविधता संवर्धना संदर्भात राज्य शासनाला धोरणात्मक मार्गदर्शन करणे, जनजागृती कार्यक्रम, प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन करणे आणि महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पांची अंमलबजावणी करणे ही देखील मंडळाची महत्वाची कार्ये आहेत.
- त्यामुळे जैविक संपत्तीचे संरक्षण, स्थानिक समुदायांचे हक्क जपणे, शाश्वत विकासाला चालना देणे आणि भावी पिढ्यांसाठी महाराष्ट्राचा नैसर्गिक वारसा सुरक्षित ठेवणे यामध्ये महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे.

**विद्यमानपरिस्थिती** *(Existing Scenario)*

- महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळामार्फत जैविक विविधता अधिनियम, २००२ (सुधारणा २०२३), जैविक विविधता नियम २०२४, जैविक संसाधन (प्रवेश व लाभ वाटप) ABS नियमय २०२५ आणि महाराष्ट्र जैविक विविधता नियम, २००८ यांची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील सर्व २८,६४९ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जैवविविधता व्यवस्थापन समित्या (BMC) स्थापन करण्यात आल्या असून सर्व समित्यांसाठी लोक जैवविविधता नोंदवह्या (PBR) तयार करण्यात आलेल्या आहेत.
- सध्या BMC पुनर्गठन व PBR अद्ययावतीकरणाची कार्यवाही सुरू आहे.
- जैविक संसाधनांच्या व्यावसायिक वापरावर देखरेख ठेवून प्रवेश व लाभवाटप (ABS) यंत्रणेची अंमलबजावणी करण्यात येत असून लाभवाटप निधी संकलन व वितरणाची प्रक्रिया सुरू आहे.
- जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना निधीचे थेट वितरण BMC च्या खात्यात करण्यात येत आहे.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

| | |
|---|---|
| **विधानसभेतील प्रश्नांतून समोर आलेल्या प्रणालीगत त्रुटी.** *(Challenges)* | • जैवविविधता संवर्धनासाठी विविध विभाग, स्थानिक संस्था आणि संशोधन संस्थांमधील समन्वय अधिक बळकट करण्याची आवश्यकता.<br>• हवामान बदल, अधिवास ऱ्हास, आक्रमक परकीय प्रजाती (Invasive Species) आणि नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण यामुळे जैवविविधतेसमोरील वाढती आव्हाने |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • राज्यातील सर्व जैवविविधता व्यवस्थापन समित्यांचे (BMC) पुनर्गठन पूर्ण करणे.<br>• लोक जैवविविधता नोंदवह्यांचे (PBR) अद्ययावतीकरण व प्रमाणीकरण पूर्ण करणे.<br>• राज्यातील देवराई, जैवविविधता वारसा स्थळे व संवेदनशील जैवविविधता क्षेत्रांचे GIS आधारित नकाशीकरण सुरू करणे.<br>• जैविक संसाधनांचा व्यावसायिक वापर करणाऱ्या संस्था व उद्योगांची सर्वंकष नोंदणी व पडताळणी करणे.<br>• प्रवेश व लाभवाटप (ABS) वसुली वाढविण्यासाठी विशेष मोहीम राबविणे | • राज्यातील सर्व देवराईंचे डिजिटल नकाशीकरण, वर्गीकरण व संवर्धन आराखडे तयार करणे.<br>• जैवविविधता व्यवस्थापन समित्यांमार्फत स्थानिक जैवसंपदेच्या संवर्धनासाठी समुदाय-आधारित व्यवस्थापन मॉडेल विकसित करणे.<br>• राज्यातील निवडक जैवविविधता समृद्ध क्षेत्रांसाठी जैवविविधता संवर्धन व पर्यावरण शिक्षण केंद्रे विकसित करणे<br>• प्रवेश व लाभवाटप (ABS) यंत्रणा अधिक प्रभावी करण्यासाठी उद्योग, संशोधन संस्था व स्थानिक समुदायांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे.<br>• राज्यस्तरीय जैवविविधता माहिती प्रणाली व मोबाईल ॲप पूर्णपणे कार्यान्वित करणे. | • राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जैवविविधता माहिती व निर्वचन केंद्रे (Biodiversity Interpretation Centres) स्थापन करणे..<br>• राज्यातील सर्व देवराईंचे डिजिटल नोंदणीकरण, संवर्धन व दीर्घकालीन व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करणे.<br>• जैवविविधता व्यवस्थापन समित्या (BMC) आणि लोक जैवविविधता नोंदवह्यांचे (PBR) पूर्णपणे डिजिटल एकत्रीकरण करणे.<br>• राज्यस्तरीय AI आणि GIS आधारित जैवविविधता निरीक्षण व निर्णय सहाय्य प्रणाली विकसित करणे. |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • जैवविविधता व्यवस्थापन समित्या, स्थानिक स्वराज्य संस्था व संबंधित भागधारकांसाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण आयोजित करणे.<br><br>• राज्यस्तरीय जैवविविधता माहिती प्रणाली (Biodiversity Information System) विकसित करण्याची कार्यवाही सुरू करणे.<br><br>• जैवविविधता मोबाईल ॲप व ई-PBR प्रणालीचे सशक्तीकरण करणे.<br><br>• दुर्मिळ, धोकाग्रस्त व संकटग्रस्त (RET) प्रजातींची अद्ययावत राज्यस्तरीय यादी तयार करणे.<br><br>• जैवविविधता संवर्धन व ABS संदर्भात जनजागृती आणि प्रसार कार्यक्रम राबविणे.<br><br>• महाराष्ट्र जनुक कोष तृतीय टप्प्याबाबत निर्णय घेणे व वाटचाल. | • जैवविविधता वारसा स्थळे (Biodiversity Heritage Sites) घोषित करण्यासाठी पात्र स्थळांची निवड व प्रस्ताव प्रक्रिया गतीमान करणे.<br><br>• दुर्मिळ, धोकाग्रस्त व संकटग्रस्त (RET) प्रजातींसाठी प्राधान्य संवर्धन कार्यक्रम राबविणे.<br><br>• शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जैवविविधता व्यवस्थापन आराखडे (Biodiversity Management Plans) तयार करणे.<br><br>• महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पांतर्गत संशोधन, संवर्धन व जनजागृती उपक्रमांचा विस्तार करणे.<br><br>• शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था व स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून नागरिक विज्ञान (Citizen Science) आधारित जैवविविधता दस्तऐवजीकरण उपक्रम विकसित करणे.<br><br>• महाराष्ट्र जनुक कोषच्या तृतीय टप्प्याची (आराखडा, संशोधन, प्रकल्प ई.) तयारी करणे | • महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पांतर्गत जैविक संसाधनांचे दीर्घकालीन संवर्धन व संशोधन नेटवर्क उभारणे.<br><br>• राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जैवविविधता व्यवस्थापन आराखड्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.<br><br>• जैविक संसाधनांवरील प्रवेश व लाभवाटप (ABS) व्यवस्थेचे संपूर्ण डिजिटल व्यवस्थापन व पारदर्शक निधी वितरण प्रणाली विकसित करणे.<br><br>• जैवविविधता वारसा स्थळे (BHS) आणि इतर महत्वपूर्ण जैवविविधता क्षेत्रांचे राज्यव्यापी जाळे विकसित करणे.<br><br>• हवामान बदल अनुकूलन, परिसंस्था पुनर्स्थापना आणि जैवविविधता संवर्धन यांचे एकात्मिक मॉडेल राज्यभर राबविणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Context)*

**धोरणात्मक सुधारणा**

*(Policy reforms)*

- महाराष्ट्र जैविक विविधता नियम, २००८ यामध्ये सुधारणा करून प्रवेश व लाभवाटप (ABS), डिजिटल अनुपालन आणि जैविक संसाधनांच्या वापराचे प्रभावी नियमन करण्यासाठी अद्ययावत तरतुदी समाविष्ट करणे.
- राज्यातील देवराईंची ओळख, नोंदणी, संरक्षण, व्यवस्थापन व पुनर्स्थापना यासाठी स्वतंत्र महाराष्ट्र देवराई संवर्धन धोरण तयार करणे.
- लोक जैवविविधता नोंदवही (PBR) तयार करणे व अद्ययावतीकरणासाठी एकसमान राज्यस्तरीय मानके व कार्यपद्धती अधिसूचित करणे.
- दुर्मिळ, धोकाग्रस्त व संकटग्रस्त(RET) वनस्पती आणि प्राणी प्रजातींच्या संवर्धनासाठी राज्यस्तरीय धोरण व कृती आराखडा अधिसूचित करणे.
- जैवविविधता वारसा स्थळे (Biodiversity Heritage Sites) घोषित करणे, व्यवस्थापन करणे व स्थानिक समुदायांचा सहभाग वाढविण्यासाठी सुलभ धोरण विकसित करणे.
- जैविक संसाधनांशी संबंधित पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण, दस्तऐवजीकरण व न्याय्य लाभवाटप सुनिश्चित करण्यासाठी राज्यस्तरीय मार्गदर्शक तत्वे तयार करणे.
- महाराष्ट्र राज्य जैवविविधता रणनिती व कृती आराखडा (MS-SAP) प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी विभागीय समन्वय व उत्तरदायित्वाची धोरणात्मक चौकट विकसित करणे.
- स्थानिक स्वराज्य संस्था, जैवविविधता व्यवस्थापन समित्या आणि विविध शासकीय विभागांमधील समन्वय बळकट करण्यासाठी जैवविविधता मुख्यप्रवाहीकरण (Biodiversity Mainstreaming) धोरण विकसित करणे.
- हवामान बदल, परिसंस्था पुनर्स्थापना व जैवविविधता संवर्धन यांचा एकात्मिक विचार करणारे राज्यस्तरीय जैवविविधता अनुकूलन धोरण तयार करणे.
- महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पांतर्गत निर्माण होणाऱ्या जैविक व जनुकीय संसाधनांच्या दीर्घकालीन संवर्धन, माहिती व्यवस्थापन व संशोधनासाठी धोरणात्मक चौकट विकसित करणे.
- महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पाचे कालावधी वाढविणेबाबत नियोजन करणे. तसेच महाराष्ट्र जनुक कोष (MGB) प्रकल्प निरंतर सुरू ठेवणेसाठी सदरची व्यवस्था कायमस्वरूपी ठेवण्यासाठी महाराष्ट्र जनुक कोष (MGB) ही महाराष्ट्र जैव विविधता मंडल अंतर्गत स्वतंत्र संस्था म्हणुन उभारणे
- महाराष्ट्र जनुक कोष (MGB) अंतर्गत सात थीम्स करीता विविध विभागांच्या अभिसरणातून तसेच CSR निधीद्वारे अतिरिक्त आर्थिक संसाधने उपलब्ध करण्यासाठी नियोजन करणे.

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Context)*

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना**

*(Technology interventions)*

- राज्यातील देवराई, जैवविविधता वारसा स्थळे (BHS) व इतर महत्त्वपूर्ण जैवविविधता क्षेत्रांचे GIS आणि Remote Sensing तंत्रज्ञानाद्वारे डिजिटल नकाशीकरण व नियमित निरीक्षण करणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित राज्य जैवविविधता माहिती प्रणाली विकसित करून जैवविविधतेतील बदल, धोकाग्रस्त प्रजाती व संवेदनशील अधिवासांचे विश्लेषण करणे.
- दुर्मिळ, धोकाग्रस्त व संकटग्रस्त (RET) प्रजाती DNA प्रयोगशाळा उभारणे
- ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून देवराई, जैवविविधता वारसा स्थळे व परिसंस्था पुनर्स्थापना क्षेत्रांचे सर्वेक्षण व देखरेख करणे.
- ई-PBR (Electronic People's Biodiversity Register) प्रणालीचे राज्यव्यापी एकत्रीकरण करून सर्व लोक जैवविविधता नोंदवह्यांचे डिजिटल व्यवस्थापन करणे.
- नागरिक सहभाग वाढविण्यासाठी मोबाईल आधारित जैवविविधता ॲप विकसित करून प्रजाती नोंदणी, छायाचित्र अपलोड व स्थानाधारित माहिती संकलनाची सुविधा उपलब्ध करणे.
- जैविक संसाधनांच्या वापरासंदर्भातील प्रवेश व लाभवाटप (ABS) व्यवस्थापनासाठी ऑनलाइन अनुपालन, पडताळणी व निधी वितरण प्रणाली विकसित करणे.
- दुर्मिळ, धोकाग्रस्त व संकटग्रस्त (RET) प्रजातींच्या नोंदी, वितरण व संवर्धनासाठी राज्यस्तरीय डिजिटल डेटाबेस तयार करणे.
- DNA बारकोडिंग, डिजिटल सिक्वेन्स इन्फॉर्मेशन (DSI) व जनुकीय माहिती व्यवस्थापन प्रणालींचा वापर करून जैविक संसाधनांचे वैज्ञानिक दस्तऐवजीकरण करणे
- क्लाऊड आधारित जैवविविधता डेटा रिपॉझिटरी विकसित करून संशोधन संस्था, शासकीय विभाग व स्थानिक संस्थांमध्ये माहितीची देवाणघेवाण सुलभ करणे.
- AI, GIS व मोबाईल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने राज्यातील जैवविविधता संवर्धन प्रकल्पांचे रीयल टाइम मॉनिटरिंग व निर्णय सहाय्य प्रणाली विकसित करणे.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1. **प्रकल्पाचे नावः महाराष्ट्र राज्य जैवविविधता माहिती प्रणाली (State Biodiversity Information System - SBIS) व जैवविविधता मोबाईल ॲप विकास**
   **कालावधी** : २०२६-२०२९
   **जबाबदारी** : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

**2.** प्रकल्पाचे नाव: **: राज्यव्यापी देवराई नकाशीकरण, पडताळणी व संवर्धन कार्यक्रम**
कालावधी : २०२६–२०२९
अंदाजे किंमत: : : रु. १०० कोटी
जबाबदारी : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ / वन विभाग

---

**3.** प्रकल्पाचे नाव: **महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प बळकटीकरण व संशोधन उपक्रम**
कालावधी : : २०२६–२०२९
अंदाजे किंमत: : : रु. २८६ कोटी
जबाबदारी : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ/ महाराष्ट्र राज्य जनुक कोष

---

**4.** प्रकल्पाचे नाव: **दुर्मिळ, धोकाग्रस्त व संकटग्रस्त (RET) प्रजाती संवर्धन व पुनर्स्थापना मिशन**
कालावधी : २०२६–२०२९
अंदाजे किंमत: : : रु. १५० कोटी
जबाबदारी : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ/ महाराष्ट्र राज्य जनुक कोष

---

**5.** प्रकल्पाचे नाव: **जैवविविधता वारसा स्थळे (BHS), जैवविविधता निर्वचन/माहिती केंद्रे व जनजागृती नेटवर्क विकास कार्यक्रम**
कालावधी : २०२६–२०२९
अंदाजे किंमत: : रु. ७५ कोटी
जबाबदारी : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ

---

**6.** प्रकल्पाचे नाव: **: ई-PBR, BMC सक्षमीकरण व प्रवेश व लाभवाटप (ABS) डिजिटल व्यवस्थापन प्रणाली**
कालावधी : २०२६–२०२८
अंदाजे किंमत: : : रु. ३० कोटी
जबाबदारी : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ

---

**7** प्रकल्पाचे नाव: **महाराष्ट्र जैवविविधता निरीक्षण व निर्णय सहाय्य प्रणाली (AI-GIS आधारित Monitoring Platform)**
कालावधी : २०२७–२०२९
अंदाजे किंमत: : रु. ४० कोटी
जबाबदारी : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ / NIC / तांत्रिक भागीदार संस्था



*Bicolor Skullcap*
*लाही*



*Cynoglossum amabile*
*काळी निसुर्डी*



*Calotis Versicolor*
*सरडा*



*Fan throated lizard*



*Indian Pitta*
*नवरंग*



*Black-naped Blue Flycatcher*
*नीलमणी*



# ३.१० गौण वनोपज (NTFP)



**गौण वनोपज म्हणजे काय?**

- **गौण वनोपज (MFP) म्हणजे वनस्पतीजन्य सर्व अकाष्ठ (Non-Timber) वन उत्पादने.**
- **या कायदेशीर व्याख्येत स्थानिक समुदायांकडून संकलित केल्या जाणाऱ्या नवीकरणीय संसाधनांचा समावेश होतो; व्यावसायिक इमारती लाकूड व काष्ठ वगळण्यात येते.**
- **पाने:** तेंदूपत्ता (स्थानिक बिडी वळण्यासाठी वापरली जाणारी).
- **गवत व तंतू:** बांबू व बेत — चटई, फर्निचर व हस्तकला विणकामासाठी.
- **वन्य अन्नपदार्थ:** मोहाची फुले, चारोळी बिया व विविध वनफळे/कंदमुळे.
- **प्राणिजन्य उत्पादने:** रानमध, मेण, लाख व टसर रेशीम कोश.
- **औषधी वनस्पती:** अश्वगंधा, गुळवेल (गिलॉय) व आवळा — पारंपरिक आयुर्वेद औषधनिर्मितीत वापर

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

**उत्पन्न सुरक्षा:** गौण वनोपज आदिवासी कुटुंबांच्या वार्षिक रोख उत्पन्नात २०% ते ४०% योगदान देतात आणि शेतीच्या मंद हंगामात महत्त्वाचे आर्थिक सुरक्षाकवच ठरतात.

**महिला सक्षमीकरण:** संकलन व प्राथमिक प्रक्रिया प्रामुख्याने महिलांकडून केली जाते; त्यामुळे हे क्षेत्र ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा प्रमुख आधार आहे.

**अन्न व आरोग्य सुरक्षा:** वनजन्य अन्नपदार्थ, फळे व औषधी वनस्पती समाजातील दुर्बल घटकांना आवश्यक सूक्ष्म पोषकद्रव्ये व पारंपरिक आरोग्य साधने थेट उपलब्ध करून देतात.

**रोजगार निर्मिती:** महाराष्ट्रातील अनुसूचित, बिगर-अनुसूचित व पेसा (PESA) क्षेत्रांत हे क्षेत्र रू. ४००–५०० कोटींपेक्षा अधिक रोजगार निर्माण करण्याची क्षमता बाळगते, ज्यामुळे दुर्गम वनक्षेत्रांतून होणारे स्थलांतर रोखता येते.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

महाराष्ट्रात सध्या केवळ तेंदूपत्ता व आपटा पाने संघटित पद्धतीने संकलित केली जातात.

**तक्ता १ : मागील ५ वर्षांतील तेंदूपत्ता संकलन, स्वामित्वधन, मजुरी व मजूर तपशील**

| क्र. | तेंदू हंगाम | विक्रीसाठी ठेवलेली एकके (तेंदू युनिट) | विक्रीसाठी ठेवलेली (अधि. प्र.गोणी) | विकली एकके (तेंदू युनिट) | विक्री (प्र.गोणी) | स्वामित्वधन (रू.कोटी) | प्रत्यक्ष उत्पादन (प्र.गोणी) | मजूर (हजारात) | मजुरी (रू.कोटी) | तेंदू बोनस (रू.कोटी) | एकूण मजुरी+बोनस (रू.कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2021 | 278 | 305990 | 231 | 266917 | 52.17 | 223896 | 160 | 53.57 | 19.68 | 73.25 |
| 2 | 2022 | 276 | 302445 | 255 | 288077 | 72.50 | 255583 | 165 | 75.45 | 72.06 | 147.51 |
| 3 | 2023 | 264 | 290409 | 212 | 241171 | 35.56 | 136371 | 106 | 39.17 | 35.46 | 74.63 |
| 4 | 2024 | 268 | 262690 | 235 | 238590 | 42.13 | 196106 | 127 | 57.12 | 42.13 | 99.25 |
| 5 | 2025 | 263 | 254960 | 213 | 215660 | 36.28 | 161147 | 120 | 52.78 | 36.28 | 88.61 |
| 6 | 2026 | 262 | 225870 | 211 | 194202 | 26.88 | 102770 (१.०६.२०२६ पर्यंत) | हंगाम सुरू आहे | | | |

**तक्ता २ : तेंदूपत्ता व्यतिरिक्त इतर गौण वनोपजाचे मागील ५ वर्षांतील उत्पादन व मूल्य**

| अ. क्र. | गौण वनोपज | एकक | 2021-22 | | 2022-23 | | 2023-24 | | 2024-25 | | 2025-26 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उत्पादन | मूल्य (लाख) | उत्पादन | मूल्य (लाख) | उत्पादन | मूल्य (लाख) | उत्पादन | मूल्य (लाख) | उत्पादन | मूल्य (लाख) |
| 1 | आपटा | क्विंटल | 244.16 | 5.607 | 251.39 | 5.679 | 300.50 | 5.829 | 259.00 | 4.767 | 262.50 | 4.514 |
| 2 | गवत | मे.टन | 500.00 | 0.110 | 210.00 | 0.42 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 3 | डिंक | क्विंटल | 1805.00 | 14.172 | 5018.38 | 33.067 | 1079.10 | 13.75 | 1669.05 | 29.16 | 1669.05 | 29.16 |
| 4 | लाख | क्विंटल | 0.00 | 0.00 | 21.00 | 4.20 | 21.00 | 4.20 | 0.00 | 0.00 | 21.00 | 4.20 |
| 5 | हिरडा | क्विंटल | 3.00 | 0.310 | 16.80 | 0.472 | 8.80 | 0.30 | 0.00 | 0.00 | 8.80 | 0.30 |
| 6 | इतर गौण वनोपज | क्विंटल | 1219.4 | 41.99 | 4661.3 | 96.05 | 2503.6 | 28.01 | 277.55 | 9.83 | 277.55 | 9.83 |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • स्वयं-सहाय्यता गट (SHG) द्वारे संकलन व प्राथमिक मूल्यवर्धन. | • त्रिस्तरीय गौण वनोपज महासंघाची स्थापना व प्रमुख शहरांत विक्रीसाठी स्वतंत्र दालने उभारणे. | • औषधी व इतर मौल्यवान गौण वनोपज प्रजातींची मोठ्या प्रमाणावर लागवड मोहीम. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- कार्य आयोजनेत (Working Plan) गौण वनोपज लागवडीचा समावेश करून प्रस्ताव शासनास सादर करणे.
- गौण वनोपज महासंघाची स्थापना करणे.
- गौण वनोपज प्रक्रिया युनिट सुरू करण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समिती (JFM) / SHG ना बीज भांडवल देणे.
- प्रत्येक जिल्ह्यात केवळ गौण वनोपज रोपवाटिका सुरू करणे.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1. **प्रकल्पाचे नाव: गौण वनोपज महासंघाची स्थापना.**

2. **प्रकल्पाचे नाव: पालघर जिल्ह्यातील बहाडोली जांभूळ प्रक्रिया युनिट व गडचिरोली जिल्ह्यातील बेडगाव जांभूळ प्रक्रिया युनिटची उभारणी.**

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- गौण वनोपज महासंघाची स्थापना.
- गौण वनोपज संकलन केंद्रे व प्रक्रिया युनिटची स्थापना.
- मूल्यवर्धित उत्पादनांच्या विक्रीसाठी दालनांची स्थापना.
- JFM समित्या व स्वयं-सहाय्यता गटांची (SHG) नोंदणी.
- ५ लाख लोकांना रोजगार निर्मिती.

## कायदेशीर व आर्थिक संरक्षण *(Legal & Economic Safeguards)*

- **वन हक्क कायदा (FRA), २००६:** अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासींना लागू असून, सदर कायदा त्यांना गौण वनोपजावर मालकी, संकलन, उपलब्धता व विल्हेवाटीचे हक्क प्रदान करतो. तसेच हा कायदा ग्रामसभांना व्यवस्थापन व संरक्षणाचे अधिकार प्रदान करतो.


- **पेसा कायदा (PESA), १९९६:** अनुसूचित क्षेत्रांत ग्रामसभांना गौण वनोपजावर संपूर्ण स्थानिक मालकी देतो.

- **MSP for MFP योजना:** TRIFED मार्फत राबविली जाणारी किमान आधारभूत किंमत योजना; संकलकांना रास्त भाव मिळवून देऊन मध्यस्थांकडून होणारे शोषण कमी करते. (संकलन, प्रक्रिया, मूल्यवर्धन व विल्हेवाटीसाठी गौण वनोपज महासंघ रचना आवश्यक.)

## गौण वनोपज महासंघ — पायाभूत सुविधा व आस्थापना खर्च

| अ.क्र. | बाब / तपशील | अंदाजे संख्या | प्रति युनिट अंदाजे खर्च | एकूण रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|---|
| 1 | तेंदूपत्ता संकलन मजुरांना मजुरी अदा करणे | 2,50,000 प्र.गोणी | रू. 4,000 / प्र.गोणी | 100 |
| 2 | वन धन विक्री केंद्रासाठी पायाभूत सुविधा व परिचालन खर्च (47 विभागांसाठी प्रति विभाग 5) | 200 | रू. 30 लाख / युनिट | 60 |
| 3 | गौण वनोपज प्राथमिक संकलन केंद्रे | 1,000 | रू. 10 लाख / युनिट | 100 |
| 4 | विक्री केंद्रे | 50 | रू. 50 लाख / युनिट | 25 |
| 5 | राज्य महासंघाचे कंत्राटी कर्मचारी खर्च | 15 | रू. 4 लाख / युनिट | 0.6 |
| 6 | विभागीय महासंघ कंत्राटी कर्मचारी | 235 | रू. 3 लाख | 7.05 |
| 7 | राज्य महासंघाचा परिचालन, प्रसिद्धी व जाहिरात खर्च | एकत्रित | एकत्रित | 10 |
| | | | **एकूण** | **302.65** |

# ३.११ तंत्रज्ञानाधारित वनीकरण



**"राज्यात GIS, Remote Sensing, Artificial Intelligence व Geospatial Analytics आधारित Digital Forest Governance System विकसित करणे."**

- उपग्रहाधारित पर्यवेक्षण
- GIS नकाशांकन व विश्लेषण
- AI आधारित निर्णय सहाय्य
- वनवणवा पूर्वसूचना व अलर्ट
- रोपवन व वनक्षेत्र पर्यवेक्षण
- जैवविविधता संवर्धन

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

| | |
|---|---|
| **हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)* | वनवणवा, अवैध वृक्षतोड, अतिक्रमण, जैवविविधता संवर्धन, रोपवनाची कामे, जल व मृद संधारणची कामे इत्यादीवर योग्य नियंत्रण ठेवुन शासनाचा निधी योग्य प्रकारे वापरल्या जाण्याकरीता Digital पर्यवेक्षण व सनियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्याकरिता क्षेत्रीय स्तरावरुन विविध वाणिकी कामाची Digitally माहिती संकलित करणे, विश्लेषण करणे, संकलित माहिती Dashboard उपलब्ध करुन निर्णय सहाय्यभुत क्षमतेचे (DSS) बळकटीकरण करणे आवश्यक आहे. |
| **विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)* | • जिओ-पोर्टल वर 40 पेक्षा जास्त GIS Data Layers अपलोड करण्यात आले आहेत. त्यापैकी २९ GIS Data Layers ह्या पीएम-गतीशक्ती पोर्टल वर अपलोड करण्यात आलेल्या आहेत.<br>• वन विभागाकडे वृक्षारोपण, वनगुन्हे, लोकसेवा हमी कायदा, प्रशासन व वित्तीय व्यवस्थापन व इतर वानिकी कार्यक्रमांशी निगडीत ३० पेक्षा अधिक MIS आधारित संगणकीय प्रणाली उपलब्ध आहेत.<br>• विविध Web Applications, Mobile Applications व्दारे क्षेत्रीय स्तरावरून माहिती Upload केली जाते. |
| **विधानसभेतील प्रश्नांतून समोर आलेल्या प्रणालीगत त्रुटी.** *(Challenges)* | • वनजमिनीवरील अतिक्रमण प्रकरणांची वाढती संख्या.<br>• वन वनवा घटनांबाबत विलंबाने माहिती प्राप्त होणे.<br>• क्षेत्रीय कर्मचारी मुख्यालयात उपस्थित न राहणे.<br>• रोपवनाच्या जीवंत रोपांची टक्केवारी कमी असणे.<br>• मजुरांना वेळेवर मजुरी न मिळणे.<br>• विविध वाणिकी कामात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी प्राप्त होणे |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| **०–१२ महिने (अल्पकालीन):** | **१२–२४ महिने (मध्यम मुदत):** |
|---|---|
| • Digital Labour Payment App विकसित करणे.<br>• विद्यमान MIS प्रणालींचे GIS प्लॅटफॉर्मशी एकत्रीकरण करणे | • Forest Guard ते RFO स्तरासाठी "Maha-Forest Super App" विकसित करणे.<br>• वन वनवा पूर्वसूचना प्रणालीची स्थापना करणे. |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): |
|---|---|
| • Asset mapping प्रणाली विकसित करुन वित्तीय प्रणालीशी जोडणे.<br>• वन अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित बदलीकरीता ऑनलाईन प्रणाली विकसीत करणे. | • Plantation प्रणाली मध्ये Drone आधारीत सर्वेक्षण समाविष्ट करणे<br>• राज्यातील सर्व वनक्षेत्रांचे GIS आधारित डिजिटल मॅपिंग पूर्ण करणे.<br>• AI आधारित अतिक्रमण शोध प्रणाली कार्यान्वित करणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

| | |
|---|---|
| **धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)* | • महाराष्ट्र डिजिटल फॉरेस्ट गव्हर्नन्स धोरण जाहीर करणे. |
| **तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technology interventions)* | • Strengthening of existing GIS Platform.<br>• AI आणि ML (Machine learning) आधारीत निर्णय सहाय्यभुत यंत्रणा (DSS) स्थापित करणे. |

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1 **प्रकल्पाचे नाव :** **महाराष्ट्र एकात्मिक डिजिटल फॉरेस्ट प्लॅटफॉर्म (MIDFP)**
**कालावधी :** २०२६–२०२९
**अंदाजे किंमत :** रु. १०.०० कोटी
**जबाबदारी :** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (IT व Policy)

2 **प्रकल्पाचे नाव :** **राज्यव्यापी GIS आधारित वन सीमा डिजिटल मॅपिंग प्रकल्प**
**कालावधी :** २०२६–२०२८
**अंदाजे किंमत :** रु. 10.00 कोटी
**जबाबदारी :** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (IT व Policy)

3 **प्रकल्पाचे नाव :** **महाफॉरेस्ट सुपर ॲप मोबाईल प्रणाली**
**कालावधी :** २०२६–२०२८
**अंदाजे किंमत :** रु. ५०.०० कोटी
**जबाबदारी :** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (IT व Policy)

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- Labour Payment मध्ये १००% पारदर्शकता आणणे.
- Maha-Forest Super App विकसित करून निर्णय सहाय्यभूत यंत्रणा (DSS) उभारणे
- सर्व MIS व GIS प्रणालींचे संलग्नीकरण करणे.
- AI तसेच ML प्रणालीचा वापर करणे
- डेटा आधारित वन व्यवस्थापन निर्णयप्रक्रिया पूर्णपणे कार्यान्वित करणे
- वन अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित बदली प्रक्रियेत १००% पारदर्शकता आणणे.

# ३.१२ कॅम्पा




**76,468+**
**हेक्टर**

वन संवर्धन कायदा 1980 नुसार सन 1980 पासून वनेत्तर कामाकरिता वळती करण्यात आलेले क्षेत्र

**1,10,874+**
**हेक्टर**

पर्यायी वनीकरण घेणेकरिता सन 1980 पासून 2025 पर्यंत प्रस्तावित क्षेत्र

**1,04,822+**
**हेक्टर**

सन 1980 पासून 2025 चे पावसाळ्यापर्यंत पर्यायी वनीकरणांतर्गत रोपवन घेण्यात आलेले क्षेत्र

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

- वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत जेवढे वनक्षेत्र वळती केले जाते, तेवढे वनेतर क्षेत्र वन विभागास उपलब्ध करुन देणे व त्यावर वनीकरण करण्यासाठी आवश्यक खर्च उपलब्ध करुन देणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक असते. उक्त प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या वनेतर क्षेत्रास पर्यायी जमीन तसेच त्यावर करण्यात येणारे रोपवनास पर्यायी वनीकरण (Compensatory Afforestation) असे संबोधले जाते.

- वनीकरणासाठी पर्यायी जमीन, तसेच त्यावर वनीकरण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याव्यतिरीक्त वन्यजीव व्यवस्थापन, जल व मृद संधारण तसेच इतर पर्यावरण पोषक कामांसाठी सुध्दा परिस्थितीनुरुप निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सुध्दा केंद्र शासनाकडून अटी घातल्या जातात. तसेच वनक्षेत्रापासून मिळणाऱ्या पर्यावरणीय फायद्यापासून वनक्षेत्र वंचित होत असल्यामुळे त्याची किंमत म्हणून नक्त वर्तमान मुल्य (Net Present Value) सुध्दा संबंधीत प्रकल्प यंत्रणेकडून आकारल्या जाते.

- अशाप्रकारे प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त होणाऱ्या निधीस Compensatory Afforestation Fund (पर्यायी वनीकरण निधी) म्हणतात.

- मा.सर्वोच्च न्यायालयात पुर्वी पासून दाखल रिट याचिका क्र.202/95 च्या संदर्भात, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 30/10/2002 रोजी असे निर्देश दिले की, एकत्रित पर्यायी वनीकरण निधी तयार करुन वनसंवर्धन नियम 1980 अंतर्गत प्रकल्प यंत्रणेकडुन प्राप्त होणारी रक्कम त्यामध्ये जमा करण्यात यावी.

- मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने संसदेने वर्ष 2016 मध्ये पर्यायी वनीकरण निधी नियम (Compensatory Afforestation Fund Act, 2016) पारित केला व त्यात प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त रक्कमेचे व्यवस्थापन, विनियोजन व संनियंत्रण इत्यादी साठी दिशानिर्देश जारी केले. निधीचे व्यवस्थापनासाठी वर्ष 2018 मध्ये उक्त नियमांतर्गत केंद्र शासनाने नियमावली तयार केली. [(Compensatory Afforestation Accounting Procedure) Rule 2018] व ती 30 सप्टेंबर, 2018 पासून अंमलात आलेली आहे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

कॅम्पा अधिनियम पारित झाल्यानंतर Ad-hoc CAMPA, नवी दिल्ली यांचे राष्ट्रीयकृत बँक खात्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील प्रकल्प यंत्रणेकडून जमा करण्यात आलेल्या रक्कमेचा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कडून ताळमेळ करण्यात येतो व त्यानंतर त्यामधून पर्यायी वनीकरण निधी कायदा 2016 च्या कलम 5 नुसार 10% निधी केंद्रशासनाकडे ठेवून उर्वरीत 90% निधी राज्य शासनास उपलब्ध करुन दिला जातो.

राष्ट्रीय प्राधिकरण कॅम्पा, नवी दिल्ली यांना महाराष्ट्र राज्याकडून प्राप्त झालेल्या रक्कमेपैकी महाराष्ट्र राज्याचा 90% हिस्सा म्हणून राज्य शासनास खालील प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

| अ. क्र. | कालावधी | पत्र दिनांक | रक्कम (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| 1 | 07.02.2019 पर्यंत | 29.08.2019 | 3844.24 |
| 2 | 08.02.2019 ते 31.03.2020 | 24.03.2022 | 285.22 |
| 3 | 01.04.2020 ते 31.03.2022 | 10.01.2024 | 211.02 |
| 4 | 01.04.2022 ते 31.03.2023 | 12.08.2024 | 259.37 |
| 5 | 01.04.2023 ते 31.08.2024 | 15.01.2025 | 433.52 |
| 6 | 01.09.2024 ते 31.12.2024 | 07.04.2025 | 256.87 |
| 7 | 01.04.2019 ते 31.03.2024 पर्यंतचे राष्ट्रीय प्राधिकरणाकडील व्याज | 09.06.2025 | 141.22 |
| | **एकुण** | | 5431.46 |

- सदर निधी महाराष्ट्र राज्याच्या Public Accounts Major Head - 8121 अंतर्गत व्यपगत न होणारा व व्याज देणारा निधी असून, त्याबाबतची तरतूद पर्यायी वनीकरण नियम 2016 च्या कलम 4(5) व 4(6) मध्ये विहित आहे.

- उपरोक्त तरतुदीनुसार राज्य शासनाच्या Public Account मध्ये जमा रकमेवर सन 2019-20 पासून व्याज प्राप्त होत आहे.

- राष्ट्रीय प्राधिकरण (National Authority) कॅम्पा, भारत सरकार यांनी कळविलेल्या Applicable Rate of Interest नुसार शिल्लक रकमेवरील व्याज परिगणनेचा प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात आला आहे.

- त्याअनुषंगाने राज्य शासनाकडे जमा असलेल्या रक्कमेवर देय असलेल्या व्याजाच्या रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | अर्थिक वर्ष | केंद्र शासनाने मंजूर केलेल व्याजाचा दर | व्याजाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 2019-20 | 5.50% | 124.03 कोटी |
| 2 | 2020-21 | 3.40% | 122.61 कोटी |
| 3 | 2021-22 | 3.35% | 109.40 कोटी |
| 4 | 2022-23 | 3.35% | 102.22 कोटी |
| | **एकुण** | | **458.26 कोटी** |

- उपरोक्त तपशिलानुसार दिनांक 29.08.2019 ते 31.03.2023 पर्यंत एकुण रू. 458.26 कोटी निधी कॅम्पाचे लेखाशिर्ष Major Head: 8121-General & Other Reserve Funds, Minor Head: 129-State Compensatory Afforestation Fund (SCAF), Detailed Head: (00)(05)Interest (8121584301) या मध्ये वळती करण्यात आलेला आहे.

- सन 2023-24 व 2024-25 या कालावधीत राज्य शासनाकडे जमा असलेल्या रक्कमेवर देय असलेल्या व्याजाच्या रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

| अ. क्र. | अर्थिक वर्ष | केंद्र शासनाने मंजूर केलेल व्याजाचा दर | व्याजाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 2023-24 | 3.35% | 129.81 कोटी |
| 2 | 2024-25 | 3.35% | 107.73 कोटी |
| | **एकुण** | | **237.54 कोटी** |

- उपरोक्त तपशिलानुसार सन 2023-24 व 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता एकुण रू. 237.54 कोटी निधीचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे मार्फत दिनांक 26.05.2025 रोजी शासनास सादर करण्यात आलेला होता. त्यास अर्थसंकल्पीय अधिवेशन 2026 मध्ये सन 2026-27 करिता मंजूरी प्राप्त झालेली आहे.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

**०–१२ महिने (अल्पकालीन):**

- कॅम्पाच्या 6 लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनास सादर करणे.
- सर्व कार्यकारी यंत्रणांकडून वार्षिक नियोजन आराखड्याबाबत विहित प्रपत्रात प्रस्ताव मागविणे.
- प्राप्त प्रस्तावांची पडताळणी करणे व वार्षिक नियोजन आराखडा तयार करणे.

**१२–२४ महिने (मध्यम मुदत):**

- वार्षिक नियोजन आराखडा राज्य प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करणे.
- कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर राज्य प्राधिकरणाच्या सुकाणू समितीकडे मंजुरीसाठी सादर करणे.
- सुकाणू समितीच्या मान्यतेनंतर राष्ट्रीय प्राधिकरण कॅम्पा यांच्या कार्यकारी समितीकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करणे.

**२४–४0 महिने (दीर्घकालीन):**

- राष्ट्रीय प्राधिकरण कॅम्पा यांच्या कार्यकारी समितीकडून मंजुरी प्राप्त झाल्यानंतर मंजूर आराखडा कार्यकारी यंत्रणांना अंमलबजावणीसाठी पाठविणे.
- मंजूर कामांसाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त करणे.
- ई-निविदा मागवून इतर आवश्यक कार्यवाहीद्वारे वार्षिक नियोजन आराखड्याची अंमलबजावणी करणे.

| **धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)** *(Strategic Interventions)* | |
|---|---|
| **धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)* | • कॅम्पा अंतर्गत रोपवनाच्या संगोपन व देखभाल कामारिता माहे-एप्रिल पासून कार्यरत मजूरांची मंजूरी अदायकी करण्याकरिता कॅम्पा प्राधिकरणाकडे शिल्लक असलेल्या रक्कमेचे योग्य नियोजन करून त्याचा विनियोग करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी (महा कॅम्पा) यांना आवश्यक अधिकार प्रदान करणे. |
| **तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)* | • कॅम्पा प्राधिकरणामार्फत मंजूर वार्षिक नियोजन आराखड्याअंतर्गत कार्यकारी यंत्रणांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे वरिष्ट स्तरावरून मासिक लेखा तपासणी करीता व **660 घटकांच्या जमा** व खर्चाचे संनियंत्रण (Monitoring) करिता Web Portal तयार करणे. |

# ३.१३ समुदायाधारित शाश्वत वनविकास









## **धोरणात्मक पार्श्वभूमी** *(Strategic Context)*

**हे महत्वाचे का आहे** *(Why it matters)*

- **समुदाय आधारित शाश्वत वन व्यवस्थापन (Community-Based Sustainable Forest Management – CBFM)** ही एक अशी व्यवस्थापन पद्धती आहे, जिच्याद्वारे स्थानिक समुदायांना वनजमिनींच्या व्यवस्थापनाचे अधिकार व जबाबदाऱ्या तसेच त्यासाठी आवश्यक साधनसंपत्ती प्रदान केली जाते. ही पद्धती पर्यावरणीय संवर्धनाची स्थानिक उपजीविकेशी सांगड घालते आणि वनावर प्रत्यक्ष अवलंबून असलेले समुदाय हेच वनाचे सर्वांत प्रभावी व दीर्घकालीन रक्षक असतात, या तत्त्वावर आधारित आहे.

- **समुदाय आधारित वनीकरण (Community-Based Forestry – CBF)** ही एक व्यापक संकल्पना असून, त्यामध्ये सामूहिक कृतीसाठी आवश्यक असलेल्या सामुदायिक भूधारणेवरील सहयोगी व्यवस्थापन (collaborative regimes) तसेच प्रामुख्याने खाजगी मालकीच्या जमिनीवर अल्पधारकांकडून केले जाणारे अल्पधारक वनीकरण (smallholder forestry) यांचा समावेश होतो. वनस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि वन व्यवस्थापन करणाऱ्या समुदायांची उपजीविका बळकट करणे ही याची दोन प्रमुख उद्दिष्टे आहेत.

- ही पद्धती महत्त्वाची आहे, कारण यामुळे वनप्रशासन हे दूरस्थ व वरपासून खालपर्यंत (top-down) चालणाऱ्या शासकीय नियंत्रणाकडून स्थानिक आदिवासी व वनाधारित समुदायांकडे हस्तांतरित होते. या समुदायांकडे पारंपरिक ज्ञानाचा खोल वारसा असतो आणि ज्या साधनसंपत्तीवर त्यांची उपजीविका अवलंबून असते, तिच्या संरक्षणाची त्यांना थेट व दैनंदिन प्रेरणा असते. हवामान बदलाशी सामना, जैवविविधतेचे संवर्धन, वनतोड रोखणे, वाळवंटीकरणास प्रतिबंध आणि शाश्वत उपजीविकेची निर्मिती यांसारख्या अनेक शाश्वत विकास उद्दिष्टांच्या (SDGs) पूर्ततेसाठी CBF हे एक महत्त्वाचे माध्यम मानले जाते.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

**सद्यस्थितीत राज्यात समुदाय आधारित वन व्यवस्थापनासाठी खालील प्रकारच्या समित्या व यंत्रणा कार्यरत आहेत:**

- संयुक्त वन व्यवस्थापन समित्या – नागरी व ग्रामीण (Joint Forest Management Committees)
- पर्यावरण विकास समित्या (Eco Development Committees)
- वन विकास अभिकरणे (Forest Development Agencies)
- जैवविविधता व्यवस्थापन समित्या (Biodiversity Management Committees)

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१८ महिने (अल्पकालीन): | १८–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|
| • सर्व समित्यांची नोंदणी करणे.<br>• उपलब्ध साधनसंपत्तीबाबत आधारभूत माहिती (baseline data) संकलित करणे.<br>• समित्यांची क्रमवारी निश्चित करणे (ranking). | • समित्या व समुदाय आत्मनिर्भर (self-sufficient) करणे, जेणेकरून ते स्वतःहून वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन करू शकतील. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत समाविष्ट करावयाच्या)

*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- प्रभावी समुदाय आधारित वन व्यवस्थापनासाठी पोषक वातावरण निर्माण करणारे धोरण तयार करणे.
- हवामान बदलाचे प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी, तसेच जैवविविधता संवर्धन, परिसंस्था पुनर्स्थापना व ग्रामीण परिवर्तनाद्वारे दारिद्र्य निर्मूलन यांसारख्या आंतरराष्ट्रीय धोरण उपक्रमांना हातभार लावण्यासाठी समुदाय आधारित वनीकरणाच्या क्षमतेबाबत धोरणकर्ते व नागरी समाजामध्ये जनजागृती करणारे धोरण तयार करणे.
- बदलत्या जागतिक संदर्भात उद्भवणाऱ्या समस्यांवर समुदाय आधारित वनीकरणाद्वारे तोडगा काढण्यासाठी आवश्यक दृष्टिकोन व साधने विकसित करून त्यांचा प्रसार करणारे धोरण तयार करणे.
- मोठ्या प्रमाणावरील परिसंस्था पुनर्स्थापना, जैवविविधता संवर्धन, हवामान बदल शमन व अनुकूलन तसेच ग्रामीण परिवर्तन यांच्या चौकटीत अल्पधारक वनीकरण व समुदाय वनीकरण उपक्रमांना क्षेत्रस्तरावर पाठबळ देणारे धोरण तयार करणे.

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)*

- सर्व समित्यांची नोंदणी, आधारभूत माहिती व क्रमवारीकरण यांसाठी डिजिटल व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) / संकेतस्थळ विकसित करणे.
- वनआच्छादनातील बदल व अधिवासाच्या स्थितीच्या संनियंत्रणासाठी जीआयएस (GIS) व सुदूर संवेदन (Remote Sensing) तंत्रज्ञानाचा वापर करणे.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

1. प्रकल्पाचे नाव: • **संबंधित अर्थसंकल्पीय लेखाशीर्ष 1521 अंतर्गत निधीमध्ये वाढ करणे.**

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

**१. पर्यावरणीय आरोग्य व जोम** *(Ecological Health & Vitality)*

**हे दर्शक वन परिसंस्थेचे जतन व पुनर्निर्मिती मोजतात.**

- **वनआच्छादनातील बदल :** कालांतराने वनक्षेत्र (हेक्टर) किंवा वृक्षछत्र घनतेतील निव्वळ बदल.
- **जैवविविधता निर्देशांक :** स्थानिक वनस्पती व प्राणी यांची वारंवारता, विविधता व उपस्थिती, तसेच संकटग्रस्त व संरक्षित प्रजातींचा मागोवा.
- **पुनर्निर्मिती दर :** नैसर्गिकरीत्या रुजलेल्या किंवा पुनर्लागवड केलेल्या रोपांची घनता व जगण्याचा दर.
- **उपद्रव व आरोग्य (Disturbance & Health) :** रोग, आक्रमक प्रजाती किंवा अवैध वृक्षतोड यांमुळे बाधित झालेले क्षेत्र किंवा लाकडाचे परिमाण.
- **मृद व जल संधारण :** मृदेची धूप होण्याचे प्रमाण आणि लगतच्या प्रवाहांतील पाण्याची गुणवत्ता व प्रवाह यांचे जतन.

**२. सामाजिक-आर्थिक लाभ** *(Socio-Economic Benefits)*

**हे दर्शक स्थानिक समुदायाला वनसंरक्षणातून थेट लाभ होत असल्याची खात्री करतात.**

- **उपजीविकेत सुधारणा :** वनीकरणाद्वारे उत्पन्नवाढ किंवा दारिद्र्य निर्मूलन झालेल्या कुटुंबांची संख्या.
- **आर्थिक परतावा :** शाश्वत लाकूडतोड किंवा गौण वनोपज (NTFPs) – उदा. राळ, मध, औषधी वनस्पती – यांतून मिळणारे उत्पन्न.
- **रोजगार निर्मिती :** समुदाय गस्त, रोपवाटिका व्यवस्थापन व प्रक्रिया यांसह निर्माण झालेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची एकूण संख्या.
- **मूलभूत गरजांची पूर्तता :** साधनसंपत्ती न संपवता समुदाय वनातून स्थानिक पातळीवर मिळवलेले सरपण, चारा व बांधकाम साहित्य यांचे परिमाण.

**३. समुदाय सहभाग व प्रशासन** *(Community Participation & Governance)*

**हे दर्शक स्थानिक व्यवस्थापन गटाची सक्षमता, न्याय्यता व समावेशकता मोजतात.**

- **निर्णयप्रक्रियेतील समावेशकता :** नेतृत्व समित्या व समुदाय मतदानात महिला व उपेक्षित गटांच्या सहभागाची पातळी.
- **लाभ-वाटप समानता :** शाळा, आरोग्य केंद्रे, पायाभूत सुविधा यांसारख्या समुदाय विकासात थेट पुनर्गुंतवणूक केलेल्या वन उत्पन्नाचे प्रमाण.
- **नियम पालन :** नियमभंगाचे प्रमाण, लागू केलेले दंड आणि भूधारणा किंवा वापर-हक्कविषयक तंट्यांचे निराकरण.

# ३.१४ सामाजिक वनीकरण विभाग







**११,४००**

**इको-क्लब शाळांची राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये केंद्र** शासनाच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमाच्या पोर्टलवर नोंदणी करण्यात आली आहे.

**४.४० लाख**

विद्यार्थ्यांचा विद्यार्थी हरित सेनेत समावेश करण्यात आला आहे.

### विषयगत क्षेत्रे

(अ) हरित महाराष्ट्राच्या दिशेने

(ब) कृषीवानिकी

(क) गुणवत्तापूर्ण रोप निर्मिती

(ड) जनजागृती व विस्तार कार्य

# (अ) हरित महाराष्ट्राच्या दिशेने



- **रस्ता/कालवा/रेल्वे दुतर्फा लागवड :**

सामाजिक वनीकरण विभागामार्फत विविध योजनेंतर्गत शासकीय मालकीचे असलेले रस्ते/कालवा/रेल्वे यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड केली जाते. सन 2016- 17 पासून सन 2025- 2026 पर्यंत 45525 किमी रस्ता दुतर्फा 227.63 लाख रोपे लावण्यात आली आहेत.



- **गट लागवड** :

सामाजिक वनीकरण विभागामार्फत विविध योजनेंतर्गत विविध शासकीय विभागांच्या पडीक जमिनीवर वृक्ष लागवड केली जाते. सन 2016- 17 पासून सन 2025- 2026 पर्यंत 30417 हेक्टरवर, 329.80 लाख रोपे लावण्यात आली आहेत

| वर्ष | हेक्टर | रोपे संख्या हजारात |
|---|---|---|
| **2020-21** | 211 | 132 |
| **2021-22** | 169 | 105 |
| **2022-23** | 00 | 00 |
| **2023-24** | 00 | 00 |
| **2024-25** | 15 | 9 |
| **2025-26** | 50 | 31 |

- **टेकड्यांचे हरितीकरण :**

सामाजिक वनीकरण विभागांमार्फत महत्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा असणाऱ्या टेकड्यांचे वृक्षारोपण करुन हरितीकरण करण्यात येत आहे. सदर योजनेचे प्रमुख उदिष्ट स्थानिक जैव विविधतेचे जतन करणे, उघड्या आणि मोकळ्या टेकड्यांवर वृक्ष आच्छादन वाढविणे व अतिक्रमण रोखणे हा आहे.

- **कै. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान :**



जैवविविधतेचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्रात विविध ठिकाणी 67 जैवविविधता उद्याने निर्माण करण्यात आली आहेत. ही उद्याने स्थानिक लोकांसाठी मनोरंजन व जनजागृती केंद्र म्हणून कार्य करतात. या उद्यानांना सर्व बाजूंनी कुंपण घालण्यात आले असून, त्यांची उभारणी राज्य शासनाच्या निधीच्या सहाय्याने करण्यात आली आहे.

**ही योजना सन 2024-25 मध्ये संपुष्टात आली असून, सदर योजनेच्या मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.**



**पाणथळ जागा व्यवस्थापन :** जलाशयातील प्रदुषणास आळा घालणे, जलाशय व परिसरातील पशु, पक्षी, वृक्ष, झुडपे यांचे संवर्धन करणे, स्थानिक लोकांमध्ये जलाशय व त्यामधील जैवविविधता बाबत जनजागृती करणे, स्थानिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करणे व त्यांचे जीवनमान उंचावणे तसेच जलाशयाचा परिसर इको टुरिझमसाठी विकसित करणेकामी सदर योजना राबविण्यात येत आहे.

**ही योजना सन 2024-25 मध्ये संपुष्टात आली असून, सदर योजनेच्या मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.**

**बेल वन :**
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वन विभागामार्फत राज्यातील 75 धार्मिक स्थळांच्या ठिकाणी बेल, सीता अशोक, रुद्राक्ष, बोर, पळस, पारीजात, पांढरा चाफा, पांढरी कण्हेर, पांढरा धोत्रा व स्वास्तिक या वृक्षांची लागवड करुन बेल वन निर्माण करण्याची योजना राबविण्यात येत आहे.

**अमृत वन :**
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वन विभागामार्फत शहरी भागामधील औद्योगिकीकरण, नागरीकरण,हरितगृह वायू, वाढते प्रदुषण आणि तापमानात होणारी वाढ यांचा मानवी आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम कमी करणेकामी तसेच दुर्मिळ औषधी, प्राचीन यांचे संवर्धन करणेकामी राज्यातील 75 शहरात अमृत वन निर्माण करण्याची योजना राबविण्यात येत आहे.

**कन्या वन समृध्दी योजना :**
वनक्षेत्राव्यतिरिक्त जास्तीत जास्त वनेतर क्षेत्र वनाखाली आणणेकामी ज्या कुटुंबामध्ये मुलीचा जन्म झाला आहे अशा शेतकरी दांम्पत्याला 10 रोपे विनामूल्य देऊन त्यांच्यामध्ये पर्यावरण, वृक्ष लागवड व संगोपन / जैव विविधताबाबत आवड व रुची निर्माण करण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे.

**वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना योजना :**
राज्यातील वनक्षेत्र 20 टक्केवरुन 33 टक्केपर्यंत नेण्यासाठी हरित महाराष्ट्रात या महत्त्वकांक्षी उपक्रमांतर्गत रानमाळा ग्रामपंचायतीच्या धर्तीवर राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना योजना राबविण्यात येत आहे.

## धोरणात्मक पार्श्वभूमी : हरित महाराष्ट्राच्या दिशेने – धोरणात्मक संदर्भ

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

- राष्ट्रीय वन धोरण 1988 नुसार भौगोलिक क्षेत्राच्या 33% वर वन व वृक्ष आच्छादन आवश्यक. महाराष्ट्रात सध्या 20% वनक्षेत्र असल्याने उर्वरित 13% वाढ हे सामाजिक वनीकरणाचे प्रमुख लक्ष्य आहे. सामाजिक वनीकरण हे राज्यातील वनक्षेत्र वाढविणे, पर्यावरणीय संतुलन राखणे, कार्बन शोषण वाढविणे, हवामान बदलाचा परिणाम कमी करणे आणि ग्रामीण भागातील इंधन, चारा, लाकूड व पर्यावरणीय गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि तापमानवाढ यामुळे वनेतर क्षेत्रावर वृक्षाच्छादन वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**विद्‌यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- सन 2016- 17 पासून सन 2025- 2026 पर्यंत 45525 किमी रस्ता दुतर्फा 227.63 लाख रोपे लावण्यात आली आहेत.
- सन 2016- 17 पासून सन 2025- 2026 पर्यंत 30417 हेक्टरवर, 329.80 लाख रोपे लावण्यात आली आहेत.
- टेकड्यांवर वृक्षारोपण करुन सुमारे 445 हेक्टरवर, 2.77 लाख रोपे लावण्यात आली आहेत.
- जैवविविधतेचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्रात विविध ठिकाणी 67 जैवविविधता उद्याने निर्माण करण्यात आली आहेत.
- पाणथळ जागा व्यवस्थापन योजनेअंतर्गत 10 पाणथळ क्षेत्रांचे व्यवस्थापन करण्यात आले आहे.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • Satellite/GIS + Soil Depth + Slope Analysis – राज्यातील सर्व लागवडयोग्य शासकीय जमिनीचे मॅपिंग.<br>• सर्व जिल्ह्यांमध्ये वृक्षलागवडीसाठी लँड बँक तयार करणे.<br>• समृद्धी महामार्ग हरितीकरणाचे प्राधान्याने काम सुरू करणे.<br>• पंचायत वन, बेल वन व अमृत वन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.<br>• पडीक, ओसाड, खराब जमीन चिन्हांकन – Wasteland Atlas अद्ययावत. | • दुर्मिळ व संकटग्रस्त वनस्पतींचे संवर्धन प्रकल्प सुरू करणे.<br>• Land Bank आधारे विभागनिहाय 5-year Plantation Plan तयार.<br>• अतिक्रमण झालेल्या जमिनी सोडवून हरितीकरण.<br>• Revenue, PWD, Forest – त्रिविभागीय जमीन डेटाबेस एकत्रित. | • सर्व सामाजिक वनीकरण प्रकल्पांचे AI आधारित मॉनिटरिंग.<br>• गवत कुरण व औषधी वनस्पती या घटकांसाठी स्वतंत्र जिल्हानिहाय वार्षिक लक्ष्य निश्चित करणे.<br>• AI आधारित Optimal Species Selection – जमीन, हवामान, बाजारपेठ विचार. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- देवराई संवर्धन व विस्तार करणेसाठी विशेष देवराई संरक्षण, संवर्धन व विस्तार धोरण तयार करणे.
- गवत कुरण लागवड : सार्वजनिक- खाजगी भागीदारीव्दारे (PPP) खाजगी भूखंडावर शासनामार्फत गवत लागवड करणे, प्रोत्साहन देणे व त्यासाठी सहाय्यक अनुदान उपलब्ध करणे जेणेकरुन पशुधनांसाठी चाऱ्याची उपलब्धता होऊन जंगलातील चराई कमी मदत होईल.
- खाजगी पडीक जमीन वृक्षलागवडीखाली आणण्याकामी – वनविभाग जमीनमालक आणि वनाधारीत उद्योग यांच्यात त्रिपक्षीय करार करुन कराराधारीत वृक्षशेतीला प्रोत्साहन देणे या अंतर्गत वनविभागाकडून सवलतीच्या दरात दर्जेदार रोपे व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येईल, शेतकरी वृक्षलागवड व संगोपण करतील, तर वनाधारीत उद्योगांकडून उत्पादीत मालाची खरेदीची हमी दिली जाईल.
- औषधी वनस्पतींचे मुल्यवर्धन करून त्यांच्या लागवडीस प्रोत्साहन देणेकामी कृषी विभागाच्या आखत्यारीत असलेले राज्य औषधी वनस्पती मंडळ हे सामाजिक वनीकरण विभागाच्या आखत्यारीत आणणे आवश्यक आहे.

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

| | |
|---|---|
| **तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)* | • Lidar आधारीत ड्रोनद्वारे मोठ्या रोपवनांची जिवंतता, वाढ व संरक्षण स्थिती इ. बाबी तपासणे<br>• Remote Sensing + AI द्वारे कार्बन स्टॉक चे वार्षिक मोजमाप |

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

- दुर्मिळ लुप्तप्राय आणि संकटात असलेल्या (Rare, Endangered And Threatened) वनस्पती प्रजातींचे लागवड
- देवराई संवर्धन व विस्तार
- गवत कुरण लागवड
- औषधी वनस्पतींच्या लागवडीस प्रोत्साहन
- पडीक जमीनी वृक्षलागवडीखाली आणणे.

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- सर्व लागवडयोग्य शासकीय जमिनीचे मॅपिंग व अद्यावत लँण्ड बँक बाबत माहिती
- दुर्मिळ लुप्तप्राय आणि संकटात असलेल्या (Rare, Endangered And Threatened) वनस्पती प्रजातींचे लागवडीखालील क्षेत्र
- गवत कुरण लागवडीखालील क्षेत्र
- वृक्षलागवडीखाली आलेले एकुण क्षेत्र.
- अद्ययावत Wasteland Atlas

## (ब) कृषीवानिकी



**कृषीवानिकी :** शेतकऱ्यांच्या शेतावर / बांधावर / पडीक जमिनीवर विविध फळझाडे / वनातील वृक्ष प्रजातींची लागवड करुन त्यांना अधिक आर्थिक उत्पन्न मिळणेकामी प्रोत्साहनात्मक रोहयो अंतर्गत योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत सन 2025- 26 पर्यंत एकूण 19.09 लक्ष रोपे एकूण 6052 लाभार्थ्यांमध्ये वितरीत करण्यात आली आहेत.



**राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) :** केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या आर्थिक साहाय्याने कृषि वानिकीला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागामार्फत योजनेची सन 2023- 24 या वर्षापासून अंमलबजावणी करण्याच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

2025- 26 या वर्षासाठी महाराष्ट्र राज्यासाठी PM- RKVY वार्षिक कृती आराखडा प्रकल्प मंजुरी समिती (PAC) यांनी एकूण रक्कम रु. 1390 लक्षचे कामांस मान्यता प्रदान केलेली आहे.

तसेच 2026 -27 या वर्षासाठी महाराष्ट्र राज्यासाठी PM- RKVY वार्षिक कृती आराखडा प्रकल्प मंजुरी समिती (PAC) यांनी एकूण रक्कम रु.1507.00 लक्षचे कामांस मान्यता प्रदान केलेली आहे.

| **सन 2025 -26 करिता प्राप्त अनुदान** | **वितरित निधी (लाखात)** | | |
|---|---|---|---|
| | **केंद्र हिस्सा 60 टक्के** | **राज्य हिस्सा 40 टक्के** | **एकूण** |
| | 834 | 556 | 1390 |

**वर्धा, अकोला, पुणे व रत्नागिरी या ठिकाणी सदर योजनेंतर्गत कृषी वानिकीचे विविध रोपवन नमुने (Agroforestry Systems) चे डेमो प्लॉट निर्माण करण्यात येत आहे.**

## धोरणात्मक पार्श्वभूमी : कृषीवानिकी

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

**कृषिवनशेतीचे (Agroforestry) महत्त्व**

- शेतात झाडे व पिके एकत्र घेऊन उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण होतात.
- जमिनीची सुपीकता व मृदा संरक्षण होते.
- पाणी संवर्धनास मदत होते.
- जैवविविधता वाढते.
- दुष्काळ व हवामान बदलाच्या परिणामांपासून शेती अधिक सक्षम बनते.
- इंधन, चारा, फळे, लाकूड आणि औषधी वनस्पतींचे उत्पादन मिळते.

**कृषिवनशेतीतील कार्बन क्रेडिटचे महत्त्व**

- झाडे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून साठवतात.
- कार्बन साठवणुकीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळू शकतो.
- शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते.

**कृषिवनशेती उत्पादनांचे मूल्यवर्धन (Value Addition)**

- कच्च्या उत्पादनांवर प्रक्रिया करून त्यांचे बाजारमूल्य वाढवणे.
- बांबूपासून फर्निचर व हस्तकला वस्तू तयार करणे.
- औषधी वनस्पतींपासून तेल, पावडर व अर्क निर्मिती.
- मूल्यवर्धनामुळे रोजगार निर्मिती व अधिक नफा मिळतो.

**क्लस्टर पद्धतीचा (Cluster Approach) महत्त्व**

- एकाच भागातील शेतकरी एकत्र येऊन समान उत्पादन घेतात.
- उत्पादन, प्रक्रिया, साठवण व विक्री सुलभ होते.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- RKVY 2025-26: केंद्र रु. 834 लाख + राज्य रु. 556 लाख = एकूण रु. 1,390 लाख.
- RKVY 2026-27: एकूण रु. 1,507 लाख मंजूर.
- 6,052 लाभार्थ्यांना 19.09 लाख रोपे वितरित (2019-26).
- Demo Plots – वर्धा, अकोला, पुणे, रत्नागिरी.
- महाराष्ट्र कृषी वानिकी धोरण तयारीच्या अंतिम टप्प्यात.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • कृषी वानिकीतील सार्वजनिक- खाजगी भागीदारीव्दारे (PPP) खाजगी भूखंडावर शासनामार्फत कृषी वानिकी प्रजातींच्या वृक्षांची लावगड करुन आर्थिक उत्पन्नाचे भागीदारी स्वरुपात विभाजन करणेबाबत | • शेतकऱ्यांसाठी Carbon Credit नोंदणी Pilot (5 जिल्हे) सुरू करणे.<br>• शेतकरी-Carbon Buyer थेट बाजारपेठ उभारण्यासाठी आराखडा तयार करणे. Carbon Measurement Protocol अंतिम करणे<br>• औषधी वनस्पती, बांबू, करंज प्रक्रिया Unit साठी PPP प्रस्ताव तयार करणे.<br>• प्रत्येक जिल्ह्यात 2-3 Agroforestry Clusters निश्चित करणे (भूगोल, प्रजाती, बाजारपेठ एकत्रित विचार).<br>• Cluster-level Nursery + Technical Support Centre उभारणे. | • Carbon Credit महाराष्ट्र कृषी वानिकी धोरणाचा अविभाज्य घटक बनवणे.<br>• राज्य Carbon Market – महाराष्ट्र State Carbon Exchange स्थापना प्रस्तावित.<br>• प्रत्येक विभागात किमान 1 Agro-Forest Produce Processing Centre उभारणे.<br>• Agri-Market Portals वर कृषी वानिकी उत्पादने नोंदणी.<br>• GI Tag – स्थानिक वन उत्पादनांसाठी (आवळा, मोहा, तेंदू) Geographic Indication.<br>• विभागांमध्ये मूल्यवर्धन Clusters पूर्णपणे कार्यान्वित.<br>• ग्रामीण रोजगार: 5,000+ कुटुंबांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार<br>• Cluster FPOs द्वारे एकत्रित खरेदी, विक्री व Credit उपलब्धता.<br>• प्रत्येक Cluster मध्ये Demo Farm स्थापन – शेतकऱ्यांना प्रशिक्षण.<br>• Cluster Carbon + Value Addition + Market Linkage – एकात्मिक मॉडेल |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- सद्या चालू असलेल्या RKVY योजनेंतर्गत कृषी वानिकी अंतर्गत अल्प भूधारकास लाभ देण्यात येत असून सदर योजनेचे विस्तारीकरण करुन लहान, मध्यम व मोठे भूधारक लाभार्थ्यांचा समावेश करणेबाबत धारेणात्मक निर्णय आवश्यक.
- कृषी वानिकीतील सार्वजनिक- खाजगी भागीदारीव्दारे (PPP) खाजगी भूखंडावर शासनामार्फत कृषी वानिकी प्रजातींच्या वृक्षांची लावगड करुन आर्थिक उत्पन्नाचे भागीदारी स्वरुपात विभाजन करणे.
- कृषी वानिकी उत्पादनांवर MSP (Minimum Support Price) धोरण विचाराधीन.
- Vanaushadhi (औषधी) प्रजाती लागवडीस RKVY अंतर्गत विशेष अनुदान.
- Cluster आधारित RKVY निधी वाटप – एकल शेतकऱ्यापेक्षा Cluster ला प्राधान्य.
- PPP: खाजगी कंपन्यांशी Cluster-level Contract Farming करार.
- महाराष्ट्र कृषी वानिकी धोरण अधिसूचित करणे.

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)*

- Satellite Land Bank – लागवडयोग्य जमीन मॅपिंग.
- Mobile App – लाभार्थी नोंदणी.
- GIS Cluster Mapping – प्रजाती, मृदा, बाजारपेठ एकत्रित विश्लेषण.
- Cluster Management Software – रोपे, उत्पादन, विक्री ट्रॅकिंग.
- Digital Market Linkage App – शेतकरी ते ग्राहक थेट विक्री.
- QR Code आधारित Product Traceability – सेंद्रिय प्रमाणीकरण.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

- प्रकल्प: RKVY AF विस्तार 2026-29 | खर्च: रु. 60 कोटी
- प्रकल्प: Carbon Credit Pilot → State Exchange | खर्च: रु. 5 कोटी
- प्रकल्प: 5 Value Addition Centres | खर्च: रु. 10 कोटी
- प्रकल्प: 36 Agroforestry Clusters | खर्च: रु. 25 कोटी

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- 2029 पर्यंत 1 लाख+ Agroforestry शेतकरी लाभार्थी.
- 5,000 हेक्टर+ कृषी वानिकीखाली.
- शेतकरी Carbon Credits नोंदणी.
- 36 Clusters; 5 Value Addition Centres कार्यान्वित.

## (क) गुणवत्तापूर्ण रोप निर्मिती




**रोपे निर्मिती-** सामाजिक वनीकरण विभागामार्फत विविध योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या रोपवन कामांसाठी तसेच वनमहोत्सव कालावधीत अल्प दरात रोपे उपलब्ध करून देणेकरिता शासकीय रोपवाटिकेमध्ये विविध प्रजातीच्या रोपांची निर्मिती करण्यात येत आहे. सन 2025- 26 मध्ये मागील शिल्लक व नव्याने तयार करण्यात आलेली असे एकूण 279.55 लक्ष रोपे उपलब्ध आहेत

**जिल्हानिहाय एकिकृत रोपवाटिका (Integrated Nursery) राबविण्याबाबत** : राज्यातील वन विभागातील सर्व शाखांसाठी (वन विकास महामंडळ, प्रादेशिक वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग) एकिकृत रोपवाटिका (Integrated Nursery) स्थापित करण्याच्या दृष्टीने एकूण 47 एकिकृत रोपवाटिकांना मान्यता देण्यात आलेली आहे. 47 एकिकृत रोपवाटिकांच्या (Integrated Nursery) व्यवस्थापनाकरिता मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. निवडण्यात आलेल्या 47 एकिकृत रोपवाटिकेमध्ये उच्च दर्जेदार रोपे (QPM) निर्मितीसाठी मूलभूल पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येणार आहे.



**नर्सरींचे मानकीकरण आणि आधुनिकीकरण :** सामाजिक वनीकरण विभागांतर्गत कृषीवानिकी रोपवाटीकेला मानांकन करण्याची प्रक्रिया CAFRI, झांशी या संस्थेने ठरवून दिलेल्या मानकांनुसार प्रमाणित करण्यात येत आहे. आजपावेतो एकूण 29 नर्सरींचे मांनाकन करण्यात आले आहे. तसेच त्या मानांकनानुसार नर्सरीमध्ये आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याची कार्यवाही चालू आहे. जेणेकरून भविष्यात उच्च दर्जांच्या रोपांची निर्मिती करणे शक्य होणार आहे



**ऊती संवर्धन :**

ऊती संवर्धन तंत्रज्ञानाचा वापर करुन उच्च प्रतीच्या रोपांची निर्मिती करणेकरिता विदर्भ, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कोकण या विभागांमध्ये प्रत्येकी एक ऊती संवर्धन प्रयोगशाळांची निर्मिती करणे बाबत कार्यवाही चालू आहे.

| ऊती संवर्धन प्रयोगशाळांची संख्या | ऊती संवर्धन प्रयोगशाळांची निर्मितीकामी अपेक्षित खर्च |
|---|---|
| 5 | रु. 50 कोटी |

## धोरणात्मक पार्श्वभूमी : गुणवत्तापूर्ण रोप निर्मिती

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

गुणवत्तापूर्ण रोपे, कलमे व बियाणे ही यशस्वी वृक्षलागवडीची गुरुकिल्ली आहेत. दर्जेदार लागवडी साहित्यामुळे रोपांची जिवंतता वाढते, वाढ जोमदार होते, रोग व किडींचा प्रादुर्भाव कमी होतो आणि उत्पादनाची गुणवत्ता सुधारते. तसेच वृक्षलागवडीचा खर्च कमी होऊन पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्र वाढ आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.

**"उत्तम रोप म्हणजे यशस्वी लागवडीचा मजबूत पाया."**

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- 2025-26: 279.55 लाख रोपे उपलब्ध; 47 Integrated Nurseries मंजूर.
- 29 नर्सरींचे CAFRI मानांकन; आधुनिक पायाभूत सुविधा निर्मिती सुरू.
- 5 Tissue Culture Labs प्रस्तावित – रु. 50 कोटी; विदर्भ, खान्देश, पमहाराष्ट्र, मराठवाडा, कोकण

## कृती आराखडा *(Action roadmap)* - ऊती संवर्धन

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • विदर्भ, खान्देश, पमहाराष्ट्र, मराठवाडा, कोकण विभागात प्रत्येकी एक अशा एकूण 5 TC Labs उभारणी करणे.<br>• TC Protocol अंतिम करणे – सागवान, बांबू, चंदन, शिसम.<br>• खाजगी TC Lab भागीदारी करार – PPP मॉडेल. | • 5 TC Labs पूर्ण क्षमतेने कार्यरत; वार्षिक 50+ लाख TC रोपे उत्पादन.<br>• TC रोपांचा पुरवठा – सर्व शाखांना (वन विकास महामंडळ, प्रादेशिक वन, सामाजिक वनी करण). | • TC रोपांचे जगण्याचे दर 85%+ सुनिश्चित; वार्षिक Audit. |

## कृती आराखडा *(Action roadmap)* - कलम व लेयरिंग तंत्रज्ञान

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • आंबा, पेरू, सीताफळ, जांभूळ यांसाठी Grafting Protocol Standard करणे. | • Shield Budding, Tongue Grafting, Air Layering – कृषी वानिकी शेतकऱ्यांना प्रशिक्षण. | • सर्व 47 Integrated Nurseries मध्ये Grafting Unit कार्यान्वित. |

## कृती आराखडा *(Action roadmap)* - हाय-टेक नर्सरी

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • उर्वरित Nurseries चे CAFRI मानांकन पूर्ण करणे.<br>• Integrated Nurseries मध्ये Shade Net + Automated Drip Irrigation.<br>• QPM (Quality Planting Material) Certification System सुरू. | • Climate-Controlled Germination Chambers Integrated Nurseries मध्ये अंतर्भूत करणे.<br>• Fertigation Systems – Macro/Micronutrient automated delivery प्रणाली बसवणे. | • सर्व 47 Integrated Nurseries High-Tech मानकांनुसार पूर्णतः कार्यरत.<br>• Nursery Tourist Circuit – शालेय/सामान्य नागरिकांसाठी Nursery Tours.<br>• Private High-Tech Nurseries साठी Certification + Support Scheme. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- टिश्यू कल्चर (TC) रोपांसाठी प्रमाणन (सर्टिफिकेशन) प्रोटोकॉल विकसित करणे.
- शासकीय खरेदीमध्ये टिश्यू कल्चर (TC) रोपांना ३०% अतिरिक्त प्रोत्साहनात्मक दर (प्रीमियम) प्रदान करणे.
- कलमित (Grafted) रोपे राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत शेतकऱ्यांना ५०% अनुदानावर उपलब्ध करून देणे.
- रोपवाटिका मान्यताप्राप्ती (Nursery Accreditation) प्रक्रियेत कलम बांधणी (Grafting) क्षमता हा अनिवार्य निकष समाविष्ट करणे.
- सर्व शासकीय विभागांनी केवळ क्यूपीएम-प्रमाणित (QPM-Certified) रोपांचाच वापर करणे अनिवार्य करणे.
- खाजगी रोपवाटिकांसाठी सीएएफआरआय (CAFRI) प्रमाणन प्रोत्साहन योजना राबविणे.

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)*

- टीसी (टिश्यू कल्चर) प्रयोगशाळा व्यवस्थापन सॉफ्टवेअर –
- टीसी जर्मप्लाझ्म बँक – दुर्मिळ व मौल्यवान वनस्पती प्रजातींच्या जनुकीय (जीनोमिक) संपत्तीचे संरक्षण व संवर्धन.
- उच्च उत्पादनक्षम मातृवनस्पतींची जनुकीय निवड – अधिक दर्जेदार व उत्पादक मातृवनस्पतींची वैज्ञानिक पद्धतीने निवड.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित रोपवाटिका आरोग्य निरीक्षण प्रणाली – रोपांच्या वाढीचे व आरोग्याचे स्वयंचलित विश्लेषण व निरीक्षण.
- IoT संवेदक प्रणाली – रोपवाटिकेतील मातीतील आर्द्रता, हवेतील आर्द्रता व तापमान यांचे स्वयंचलित निरीक्षण.
- क्यूआर कोड आधारित रोप मागणी, वितरण आणि लागवडीनंतरच्या जिवंत राहण्याच्या प्रमाणाचा मागोवा.
- टिश्यू कल्चर, डिजिटल मागोवा व आयओटी निरीक्षण यांचे एकात्मिक क्यूपीएम (QPM) व्यासपीठ.
- जनुकीय माहिती भांडार (जीनोमिक डेटाबेस) – स्थानिक उच्च दर्जाच्या वनस्पती प्रजातींचे जतन, दस्तऐवजीकरण व संवर्धन.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

- प्रकल्प: 5 Tissue Culture Labs | कालावधी: 2026-28 | खर्च: रु. 5,000 लाख | जबाबदारी: सामाजिक वनीकरण विभाग
- प्रकल्प: Grafting Centres in 47 Nurseries | कालावधी: 2026-28 | खर्च: रु. 700 लाख
- प्रकल्प: 47 High-Tech Integrated Nurseries Upgrade | कालावधी: 2026-29 | खर्च: रु. 2,500 लाख
- प्रकल्प: Digital Nursery Management System | कालावधी: 2026-27 | खर्च: रु. 200 लाख

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- 5 TC Labs 2028 पर्यंत कार्यान्वित; 50 लाख TC रोपे/वर्ष.
- सर्व 47 Nurseries CAFRI-High-Tech; Survival Rate 75%+.
- 20 लाख Grafted रोपे/वर्ष.
- 500+ लाख एकूण रोपे उत्पादन क्षमता.
- 2029 पर्यंत 5 लाख+ Grafted/Layered रोपे वार्षिक.
- शेतकरी प्रशिक्षण: 10,00+ कलम तज्ञ तयार.

## (ड) जनजागृती व विस्तार कार्य



**वनमहोत्सव** : दरवर्षी 15 जून ते 30 सप्टेंबर हा कालावधी वनमहोत्सव म्हणून साजरा केला जातो. या कालावधीमध्ये लोकांना वृक्ष लागवडीसाठी उद्युक्त करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत सवलतीच्या दराने रोपे पुरवठा केली जातात. 2019- 20 ते 2025 -26 पर्यंत 26.31 लाख रोपे विकली गेली.

**केंद्र शासनाचा पर्यावरण शिक्षण कार्यक्रम (EEP)** : केंद्र शासनामार्फत शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय हरित सेना योजना राबविण्यात येत होती. सदर योजना पुनर्रचित करुन पर्यावरण शिक्षण विभागामार्फत Environment Education, Awareness, Research and Skill Development (EEARSD) या योजनेंतर्गत पर्यावरण शिक्षण कार्यक्रम सन 2022 पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेत शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण करुन त्यांना शाश्वत जीवनशैलीचा अंगिकार करणेकामी प्रोत्साहीत करण्यासाठी कार्यशाळा / शिबिर / प्रकल्प / प्रदर्शन / स्पर्धा यासारखे उपक्रम शालेय स्तरावर राबविण्यात येत आहे.







**विद्यार्थी हरित सेना योजना** :

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय हरित सेना योजनेचे बळकटीकरण करण्यासाठी राज्य शासनामार्फत सन 2017 साली सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक गोडी व जागृती निर्माण करण्यासाठी सदर योजना राबविण्यात येते.
पर्यावरण शिक्षण कार्यक्रमाचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच विद्यार्थी हरित सेना योजना पुनर्रचित करण्याच्या अनुषंगाने सुधारित विदयार्थी हरित सेना तसेच चला जाणूया वनाला या संकल्पनेची वसुंधरा मित्र उपक्रमाशी सांगड घालून "सुधारित विदयार्थी हरित सेने अंतर्गत चला जाणूया वनाला" योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.



**प्रचार प्रसिध्दी** :

वन, वन्यप्राणी, जैव विविधता, पर्यावरण आणि वृक्षाच्छादन वाढविण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण या माध्यमातून केलेले काम जाहिरातीद्वारे लोकांसमोर आणणे.

शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण विषयक चित्रकला, निबंध, वक्तृत्व आणि छायाचित्रे इ.स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

## धोरणात्मक पार्श्वभूमी : जनजागृती व विस्तार कार्य

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

वृक्षारोपण व संवर्धन हे केवळ शासनाचे काम नव्हे; समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. शालेय विद्यार्थ्यांपासून शेतकऱ्यांपर्यंत, शहरी नागरिकांपासून उद्योग क्षेत्रापर्यंत – सर्वांमध्ये पर्यावरण जागृती व कृतीक्षमता निर्माण करणे हे या थीमचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- EEP (EEARSD) 2025-26: 3,600 इको क्लब शाळा; 1.68 लाख विद्यार्थी पर्यंत पोहोच; रु. 314.65 लाख खर्च .
- विद्यार्थी हरित सेना (उच्चांक 2017-18): 7,040 शाळा ; 3.52 लाख विद्यार्थी सामावेश.
- वसुंधरा मित्र (WWF): 3,000 शाळा; 75,000 विद्यार्थी; 72 Master Trainers प्रस्तावित.
- वनमहोत्सव कालावधीत 2019-26: 26.31 लाख रोपे विक्री.
- प्रचार प्रसिध्दी 2025-26: रु. 2,072.72 लाख खर्च.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • विद्यार्थी हरित सेना + 'चला जाणूया वनाला' – एकत्रित Restructured Scheme मंजूर.<br>• वसुंधरा मित्र प्रभवी अंमलबजावणी<br>• EEP योजनेची प्रभवी अंमलबजावणी<br>• Social Media Strategy – Instagram, YouTube, X, Facebook – वनविभागाची मजबूत उपस्थिती.<br>• Doordarshan / All India Radio – साप्ताहिक 'हरित संवाद' कार्यक्रम. | • Gram Sabha Plantation Events – प्रत्येक ग्रामपंचायतीत वार्षिक 1 वृक्षारोपण सोहळा.<br>• रानमाळा / वृक्षांची जोपासना – प्रत्येक ग्रामपंचायतीत अंमलबजावणी.<br>• **डिजिटल निसर्ग शिक्षण पोर्टल** – व्हिडिओ, शैक्षणिक खेळ, प्रश्नमंजुषा (क्विझ) आणि संवर्धित वास्तव (AR) आधारित वृक्ष शिक्षण सुविधा.<br>• **वसुंधरा मित्र मोबाईल अनुप्रयोग** – विद्यार्थ्यांच्या पर्यावरणविषयक उपक्रमांचा मागोवा घेणारी आणि नोंद ठेवणारी डिजिटल प्रणाली. | • छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार – 50+ जिल्ह्यांत सोहळे.<br>• AI Chatbot – नागरिकांना रोपे, योजना, वृक्षारोपण माहिती 24x7.<br>• Podcast Series – 'जंगलाच्या गोष्टी'.<br>• State Green Media Award – पर्यावरण पत्रकारितेसाठी वार्षिक पुरस्कार. |

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): |
|---|---|
| • State-level Mascot / Brand – 'हरित महाराष्ट्र' Campaign Brand Identity. | • **वेब मालिका आणि लघुपट** – वन अधिकारी, शेतकरी आणि विद्यार्थी यांच्या प्रेरणादायी यशोगाथा व अनुभवांवर आधारित निर्मिती.<br>• **स्थानिक आशय निर्मात्यांसोबत (कंटेंट क्रिएटर्स) भागीदारी** – सामाजिक माध्यमांद्वारे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती आणि लोकसहभाग वाढविणे.<br>• **मुद्रित माध्यमांचा प्रभावी वापर** – जिल्हास्तरीय वृत्तपत्रांमध्ये दैनिक **'वन वार्ता'** सदर प्रकाशित करून वन, पर्यावरण आणि संवर्धन विषयक माहितीचा प्रसार करणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- विद्यार्थी हरित सेना साठी सातत्यपूर्ण राज्य निधी – वार्षिक किमान रु. 400 लाख निश्चित.
- निसर्ग शिक्षण धोरण – शाळांना मान्यता देण्यासाठी पर्यावरण मंडळ (इको क्लब) स्थापन करणे अनिवार्य करणे.
- वन विभाग आणि प्रसारमाध्यमांदरम्यान सामंजस्य करार (MoU) – दूरदर्शन, आकाशवाणी आणि प्रमुख वृत्तपत्रांच्या सहकार्याने पर्यावरण व वनसंवर्धन विषयक जनजागृती कार्यक्रम राबविणे.
- वन विभाग सामाजिक माध्यम धोरण – अधिकृत सामाजिक माध्यम खात्यांच्या संचालन, माहिती प्रसारण आणि आचारसंहितेसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे.
- वन विभाग, कृषी विभाग आणि आत्मा (ATMA) यांचे एकात्मिक विस्तार सेवा आराखडा – शेतकरी, ग्रामस्थ आणि इतर हितधारकांपर्यंत तांत्रिक मार्गदर्शन व सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी समन्वित व्यवस्था निर्माण करणे.
- स्वयंसेवी संस्थांसाठी (NGO) मान्यताप्रदान प्रणाली – वृक्षलागवड आणि संवर्धन उपक्रमांच्या गुणवत्तेसाठी निश्चित निकष व मानके विकसित करणे.

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)

*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा**
*(Policy Interventions)*

- विद्यार्थी हरित सेना साठी सातत्यपूर्ण राज्य निधी – वार्षिक किमान रु. 400 लाख निश्चित.
- निसर्ग शिक्षण धोरण – शाळांना मान्यता देण्यासाठी पर्यावरण मंडळ (इको क्लब) स्थापन करणे अनिवार्य करणे.
- वन विभाग आणि प्रसारमाध्यमांदरम्यान सामंजस्य करार (MoU) – दूरदर्शन, आकाशवाणी आणि प्रमुख वृत्तपत्रांच्या सहकार्याने पर्यावरण व वनसंवर्धन विषयक जनजागृती कार्यक्रम राबविणे.
- वन विभाग सामाजिक माध्यम धोरण – अधिकृत सामाजिक माध्यम खात्यांच्या संचालन, माहिती प्रसारण आणि आचारसंहितेसाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे.
- वन विभाग, कृषी विभाग आणि आत्मा (ATMA) यांचे एकात्मिक विस्तार सेवा आराखडा – शेतकरी, ग्रामस्थ आणि इतर हितधारकांपर्यंत तांत्रिक मार्गदर्शन व सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी समन्वित व्यवस्था निर्माण करणे.
- स्वयंसेवी संस्थांसाठी (NGO) मान्यताप्रदान प्रणाली – वृक्षलागवड आणि संवर्धन उपक्रमांच्या गुणवत्तेसाठी निश्चित निकष व मानके विकसित करणे.

**तंत्रज्ञानाधारित उपाययोजना**
*(Technological Interventions)*

- Digital Nature Education Portal – व्हिडिओ, Game, Quiz, AR Trees.
- Vasundhara Mitra App – विद्यार्थी पर्यावरण Activity Tracker.
- AI Content Creation – Marathi Chatbot, Multilingual Forest Info Portal.
- YouTube Agroforestry Tutorials.
- WhatsApp Groups – प्रत्येक जिल्ह्यात Farmer Forest Community.
- AR/VR Forest Experience – Biodiversity Parks व Eco-Tourism साठी.

## २०२९ पर्यंतचे प्राधान्य प्रकल्प *(Priority Projects till 2029)*

- प्रकल्प: 5 Tissue Culture Labs | कालावधी: 2026-28 | खर्च: रु. 5,000 लाख | जबाबदारी: सामाजिक वनीकरण विभाग
- प्रकल्प: Grafting Centres in 47 Nurseries | कालावधी: 2026-28 | खर्च: रु. 700 लाख
- प्रकल्प: 47 High-Tech Integrated Nurseries Upgrade | कालावधी: 2026-29 | खर्च: रु. 2,500 लाख
- प्रकल्प: Digital Nursery Management System | कालावधी: 2026-27 | खर्च: रु. 200 लाख

## मुख्य कामगिरी दर्शक *(Key Performance Indicators)*

- 5 TC Labs 2028 पर्यंत कार्यान्वित; 50 लाख TC रोपे/वर्ष.
- सर्व 47 Nurseries CAFRI-High-Tech; Survival Rate 75%+.
- 20 लाख Grafted रोपे/वर्ष.
- 500+ लाख एकूण रोपे उत्पादन क्षमता.
- 2029 पर्यंत 5 लाख+ Grafted/Layered रोपे वार्षिक.
- शेतकरी प्रशिक्षण: 10,00+ कलम तज्ञ तयार.

# ३.१५ अर्थसंकल्प, नियोजन व विकास



## धोरणात्मक पार्श्वभूमी *(Strategic Context)*


**हे महत्वाचे का आहे** *(Why it matters)*

महाराष्ट्र वनविभागासाठी अर्थसंकल्प **वनसंवर्धन, वन्यजीव संरक्षण, वृक्षारोपण मोहिमा, आणि वणवा प्रतिबंधक उपाययोजना** यांसारख्या आवश्यक कामांसाठी निधीचे नियोजन व वाटप करण्यासाठी आवश्यक असतो. यातूनच वन कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, नवीन पायाभूत सुविधा, आणि वनांचा/ पर्यटनाचा विकास केला जातो.

पुढील आर्थिक वर्षाचे नियोजन करून शिस्तबध्द पध्दतीने शासकीय निधीचा विनियोग करणे. राज्याच्या वने व पर्यावरणासाठी वन्यजीव संरक्षणासाठी आवश्यक बाबी तरतुद करून पर्यावरणाचे व वनांचे संवर्धन करणे आणि पर्यावरणात वनविभागाचे महत्व अधोरेखित करणा-या मुख्य बाबी खालीप्रमाणे आहे.

पर्यावरण संवर्धन आणि वनीकरण: जंगलतोड रोखणे, नवीन झाडे लावणे आणि हरितक्षेत्र वाढवणे यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद आवश्यक असते.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*




**विधानसभेतील प्रश्नांतून समोर आलेल्या प्रणालीगत त्रुटी.** *(Challenges)*

- **तक्रार निवारण करणे.विकासात्मक कामे वेळेत करणे.**
- **सनियंत्रण व मुल्यांकन**
- **वनांचे संवर्धन, वन्यजीव व्यवस्थापन, मानव वन्यजीव संघर्ष कमी करणे, पर्यावरण संवर्धन.**
- **वित्तीय व्यवस्थापन सुनिश्चित करणे.**

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- विविध वानिकी कामाचे अंदाजपत्रक सुधारित करणे.
- कामाचे अंदाजपत्रकाची तांत्रिक मंजुरी / प्रशासकीय मंजुरीच्या अधिकाराची सीमा वाढविणे.
- तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून वनसंवर्धनास गती देणे.
- Robust online Monitoring system चा वापर करून सनियंत्रण करणे.
- कर्मचा-यांना वेळेवर सुविधा उपलब्ध करून देणे. उदा. घरबांधणी अग्रीम रक्कम (HBA).
- वैद्यकीय उपचाराकरीता कॅशलेश सुविधा उपलब्ध करणे.


## उद्दिष्ट

- राज्य योजनेतून प्राप्त निधी वेळेवर खर्च करणे.
- मजुरांची मजुरी वेळेवर उपलब्ध करून देणे.
- महालेखाकार लेखापरीक्षण परिच्छेद वेळेवर अनुपालन करणे.
- हरित महाराष्ट्र अभियान: 300 कोटी वृक्ष लागवड
- मानव-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापन: वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांची नुकसान भरपाई प्रक्रिया जलद करणे.

## मुख्य कामगीरी दर्शक – *(Key Performance Indicators)*

- सर्व ला लागवडयोग्य शासकीय जमिनीचे मॅपिंग व अद्यावत लॅण्ड बँक बाबत माहिती
- दुर्मिळ लुप्तप्राय आणि संकटात असलेल्या (Rare, Endangered And Threatened) वनस्पती प्रजातींचे लागवडीखालील क्षेत्र
- गवत कुरण लागवडीखालील क्षेत्र
- वृक्षलागवडीखाली आलेले एकुण क्षेत्र
- अद्ययावत Wasteland Atlas

# ३.१६ मानव संसाधान व्यवस्थापन



## धोरणात्मक पार्श्वभूमी

**हे महत्त्वाचे का आहे** *(Why it matters)*

योग्य मानव संसाधन हे कोणतेही शासकीय कार्य पूर्ण करण्यासाठी सर्वोपरी आवश्यक माध्यम आहे. योग्य समर्पीत अधीकारी हे कोणत्याही शासन संस्थेचा आत्मा आहे. वन विभागातील अति दुर्गम / दुर्गम क्षेत्रात काम करणा-या सर्व संवर्गातील कर्मचारी /अधिकारी यांचे मनोबल वाढविण्यासाठी मानव संसाधनाचा पुरेपूर वापर करुन योग्य परिस्थिती निर्माण करणे.

**विद्यमान परिस्थिती** *(Existing Scenario)*

- विविध संवर्गामध्ये लक्षणीय प्रमाणात रिक्त पदे असणे.
- पदोन्नती व सेवाविषयक प्रकरण प्रलंबित असणे.
- सर्व क्षेत्रिय कर्मचा-यांसाठी निवासस्थानाची उपलब्धता नसणे.
- उपलब्ध निवास्थान नादुरूस्त असणे.
- महिला अधिकारी / कर्मचा-यांसाठी सर्व कार्यालयामंध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध नसणे.
- विभागीय चौकशी प्रकरणे दिर्घकाळापासून प्रलंबित असणे.

## कृती आराखडा *(Action roadmap)*

| ०–१२ महिने (अल्पकालीन): | १२–२४ महिने (मध्यम मुदत): | २४–४० महिने (दीर्घकालीन): |
|---|---|---|
| • नियतकालिक बदली प्रक्रिया Online पध्दतीने करणे.<br>• E-HRMS प्रणाली कार्यान्वित करणे.<br>• मानव-वन्यजीव संघर्ष लक्षात घेता अतिरिक्त पदे निर्माण करणे. | • मुख्यालयातील उपस्थिती सेवार्थ प्रणालीशी जोडणे<br>• सर्व प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणांचा विहित कालमर्यादेत निपटारा करणे. | • Amendment of IFS (Pay) Rules 2006<br>• दुयम संवर्गात नवीन स्तराची निर्मीती करणे. |

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत) *(Strategic Interventions)*

**धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)*

- E-HRMS प्रणाली कार्यान्वित करणे
- Amendment of IFS (Pay) Rules 2006
- मुख्य वनसंरक्षक व त्यावरील दर्जाचे अधिका-यांना प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांच्या स्तरावरुन मंजूर करण्यात येणारे रजेचे प्रस्तावांची विद्यमान 15 दिवसांची मर्यादा 30 दिवस पर्यंत वाढविण्यासाठी शासन निर्णयामध्ये सुधारण करणे.

## धोरणात्मक उपाययोजना (२०२९ पर्यंत)
*(Strategic Interventions)*

| | |
|---|---|
| **धोरणात्मक सुधारणा** *(Policy Interventions)* | • महाराष्ट्र वन सेवेमधुन भारतीय वनसेवेमध्ये पदोन्नती (Induction) 2023 व 2024<br>• IFS सवंर्गाचा संवर्ग आढावा (Cadre Review) 2026<br>• वाहन चालक संवर्गात नवीन वेतन स्तर निर्माण करणे.<br>• वन कर्मचारी कल्याण निधीचे बळकटीकरण करणे.<br>• पोलीस विभागाचे धर्तीवर कुटुंब आरोग्य कल्याण योजना लागु करणे. |
| **तंत्रज्ञानाधारित उपाययोजना** *(Technological Interventions)* | • E-hrms प्रणाली कार्यान्वित करणे |

## मुख्य कामगीरी दर्शक – *(Key Performance Indicators)*

- सर्व संवर्गाचे वेळेवर पदान्नती होणे.
- IFS सवंर्गाचा संवर्ग आढावा (Cadre Review) 2026 पुर्ण करणे.
- महाराष्ट्र वन सेवेमधुन भारतीय वनसेवेमध्ये पदोन्नती (Induction) 2023 व 2024 पुर्ण करणे.
- विभागीय चौकशी प्रकरणे वेळेवर पूर्ण करण्यास पाठपूरावा करणे.

# नोंदी

# नोंदी



महाराष्ट्र वन विभाग
महाराष्ट्र शासन